# मानस



उत्तुंग भविष्याचा,
उज्वल मानस ..!

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

## जनता कला व विज्ञान महाविद्यालय

रुईछत्तिसी, ता.जि. अहमदनगर – ४१४ ००२

चतुर्थ अंक : २०१९–२०

## .. क्षणचित्रे ..




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष व संस्थेचे उपाध्यक्ष मा.रा.ह.दरे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर समवेत प्रमुख पाहुणे चित्रपट गीतकार, अभिनेते मा.बाबासाहेब सौदागर, सौ.कविता सौदागर, संस्थेचे विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे, पंचायत समिती उपसभापती मा.रविंद्र भापकर व कार्यक्रमाचे समवेत मान्यवर



महाविद्यालयास विकास समितीच्या सभेत अहवाल वाचन करताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर समवेत संस्थेचे अध्यक्ष मा.आ.नंदकुमार झावरे पा., सचिव मा.जी.डी.खानदेशे, सहसचिव मा.ॲड.विश्वासराव आठरे पा. व शिक्षक प्रतिनिधी



महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र उद्यानाचे उद्घाटन करताना संस्थेचे सचिव मा.जी.डी.खानदेशे समवेत अध्यक्ष मा.आ.नंदकुमार झावरे पा., सहसचिव मा.ॲड विश्वासराव आठरे व शिक्षक



महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात मान्यवरांच्या समवेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थी - विद्यार्थीनी



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात संस्थेचे उपाध्यक्ष मा.रा.ह.दरे समवेत प्रमुख पाहुणे चित्रपट गीतकार,अभिनेते मा.बाबासाहेब सौदागर,सौ.कविता सौदागर, संस्थेचे विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे, पंचायत समिती उपसभापती मा.रविंद्र भापकर, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर व उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले



पालक मेळाव्यात सहभागी पालकास महाविद्यालयातील प्रयोगशाळेची माहिती देताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# जनता कला व विज्ञान महाविद्यालय

रुईछत्तिसी, ता.जि.अहमदनगर.

# मानस

चतुर्थ वार्षिक अंक

**सन २०१९-२०**

संपादक

**प्राचार्य डॉ.सुरेश बाबर**

कार्यकारी संपादक

**प्रा. राजेंद्र गोरे**

संपादक मंडळ

उपप्राचार्य डॉ.तळुले डी.एस.

प्रा. वाळके डी.बी.
प्रा.डॉ. आढाव ए.के.
प्रा. सुपेकर आर.बी.
प्रा. पवार एस.आर.
प्रा. कोलते ए.आर.
प्रा. ठाकरे एम.सी.
प्रा. नवले एस.एस.
प्रा. साठे जी.एम.
प्रा. काळे डी.बी.
प्रा. बोरुडे एस.आर

# वार्षिक नियतकालिक २०१९-२०

## दि प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियम, ८ फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे<br>**जनता कला व विज्ञान महाविद्यालय**<br>रुईछत्तिसी, ता.जि.अहमदनगर. |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| प्रकाशक व संपादक | : | **प्राचार्य डॉ. सुरेश बाबर**<br>जनता कला व विज्ञान महाविद्यालय<br>रुईछत्तिसी, ता.जि.अहमदनगर.<br>Fax & Tel. No. 0241 - 2670100<br>Email : janata.college@rediffmail.com<br>Website : www.janatacollegerui.com |
| कार्यकारी संपादक | : | **प्रा. राजेंद्र गोरे** |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| मालकी | : | जनता कला व विज्ञान महाविद्यालय<br>रुईछत्तिसी, ता.जि.अहमदनगर. |
| मुद्रक | : | प्रतिक प्रिंटर्स, अहमदनगर |
| फोटो सेटींग | : | एस.पी.क्रीएशन्स / ९५२७५८५९३० |
| मुखपृष्ठ | : | प्रा.डॉ.मोहनराव देशमुख |

सदर अंकात व्यक्त करण्यात आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

मी प्राचार्य डॉ.सुरेश बाबर असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# जनता कला व विज्ञान महाविद्यालय

रुईछत्तिसी, ता.जि.अहमदनगर.

(दि. ३१/०४/२०१८ ते दि. ३१/०३/२०२१)



मा.आ. नंदकुमार भाऊसाहेब झावरे पा.
अध्यक्ष



मा. रामचंद्र हरिभाऊ दरे
उपाध्यक्ष



मा. गेणूजी दगडूजी खानदेशे
सचिव



मा.ॲड. विश्वासराव दत्तात्रय आठरे
सहसचिव



मा.डॉ. विवेक प्रभाकर भापकर
खजिनदार

# श्रध्दांजली



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त,
अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष,
अखेरच्या श्वासापर्यंत सामाजिक कार्यात सक्रीय असणारे आदरणीय

## ॲड. रामनाथजी वाघ तथा अण्णा

यांचे वार्धक्याने निधन झाले.
महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व शिक्षक शिक्षकेतर वृंद आणि विद्यार्थ्यांकडून स्वर्गीय अण्णांना

## भावपूर्ण श्रध्दांजली

या शैक्षणिक वर्षात मायभूमीच्या रक्षणार्थ धारातीर्थी पडलेले शूरवीर, साहित्यिक, विचारवंत, राजकारणी, शास्त्रज्ञ, गायक, संगीतकार, नाट्य-चित्र अभिनेते, संस्थेतील व महाविद्यालयातील शिक्षक, सेवक, विद्यार्थी आणि त्यांचे आप्तेष्ठ, संस्थेवर प्रेम करणारे स्नेही आणि नैसर्गिक आपत्तीत लोप पावलेले जे देश बांधव दिवंगत झाले त्या सर्वांना '**मानस**' ची भावपूर्ण श्रध्दांजली ...

# अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

लालटाकी रोड, अहमदनगर - ४१४ ००१. फोन : (०२४१) २३२९६४९, २३२४८५०

## - कार्यकारी मंडळ (गव्हर्निंग कौन्सिल) -
(दि. ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२१)

| अ.नं. | नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.श्री. नंदकुमार भाऊसाहेब झावरे पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.श्री. रामचंद्र हरिभाऊ दरे | उपाध्यक्ष |
| ३. | मा.श्री. गेणूजी दगडूजी खानदेशे | सेक्रेटरी |
| ४. | मा.ॲड. विश्वासराव दत्तात्रय आठरे | सहसेक्रेटरी |
| ५. | मा.डॉ. विवेक प्रभाकर भापकर | खजिनदार |
| ६. | मा.डॉ. मोहनराव गंगाराम हापसे | सदस्य |
| ७. | मा.श्री. माधवराव दगडूजी मुळे | सदस्य |
| ८. | मा.ॲड. रामनाथ लक्ष्मणराव वाघ | सदस्य |
| ९. | मा.ॲड. दिपलक्ष्मी संभाजीराव म्हसे | सदस्या |
| १०. | मा.श्री. सिताराम विठ्ठलराव खिलारी | सदस्य |
| ११. | मा.डॉ. चंद्रकांत कृष्णराव मोरे | सदस्य |
| १२. | मा.ॲड. माणिकराव नामदेवराव मोरे | सदस्य |
| १३. | मा.ॲड. वसंतराव शाहूराव कापरे | सदस्य |
| १४. | मा.प्रा.श्री. अर्जुराव तात्याभाऊ पोकळे | सदस्य |
| १५. | मा.सौ. अरुणा अशोकराव काळे | सदस्या |
| १६. | मा.डॉ. अभय गेणूजी खानदेशे | सदस्य |
| १७. | मा.श्री. मुकेश माधवराव मुळे | सदस्य |
| १८. | मा.श्री. जयंत रामनाथ वाघ | सदस्य |
| १९. | मा.श्री. रावसाहेब मारुती शेळके | सदस्य |
| २०. | मा.श्री. राहुल नंदकुमार झावरे पाटील | सदस्य |
| २१. | प्राचार्य डॉ. रंगनाथ किसन आहेर | सेवक स्विकृत सदस्य |
| २२. | मा.श्री. दिलीप विनायक फलके | सेवक स्विकृत सदस्य |
| २३. | मा.प्रा.श्री. उमाजी रमाजी ठुबे | स्विकृत तज्ञ सदस्य |

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# जनता कला व विज्ञान महाविद्यालय

रुईछत्तिसी, ता.जि.अहमदनगर.

## महाविद्यालय विकास समिती

## (College Development Committee)

| अ.नं. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा.श्री. नंदकुमार भाऊसाहेब झावरे पाटील | व्यवस्थापनेचे अध्यक्ष |
| २. | मा.श्री. गेणुजी दगडूजी खानदेशे | व्यवस्थापनेचे सचिव |
| ३. | मा.श्री. रामचंद्र हरिभाऊ दरे | व्यवस्थापनेचे सदस्य |
| ४. | मा.ॲड. विश्वासराव दत्तात्रय आठरे | व्यवस्थापनेचे सदस्य |
| ५. | मा.डॉ. विवेक प्रभाकर भापकर | व्यवस्थापनेचे सदस्य |
| ६. | मा.श्री. महादेव बबनराव वाळके | माजी विद्यार्थी प्रतिनिधी |
| ७. | प्राचार्य डॉ. सुरेश जनार्दन बाबर | महाविद्यालयाचे प्राचार्य |
| ८. | प्रा.डॉ. दगडु सखाराम तळुले | विभाग प्रमुख प्रतिनिधी |
| ९. | प्रा. रविराज भानुदास सुपेकर | IQAC समन्वयक |
| १०. | प्रा. राजेंद्र लक्ष्मण गोरे | शिक्षक प्रतिनिधी |
| ११. | प्रा.डॉ. अर्चना कांतीलाल आढाव | शिक्षिका प्रतिनिधी |
| १२. | प्रा. शंकर रामदास बोरुडे | शिक्षक प्रतिनिधी |
| १३. | श्री. दादासाहेब किसन भोसले | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |
| १४. | कु. कावेरी विलास कोतकर | विद्यार्थी संसद अध्यक्ष |



# प्राचार्यांचे मनोगत ...

प्रिय विद्यार्थी मित्रांनो ...

'मानस' चा चतुर्थ वार्षिकांक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराजाचे हौतात्म व छत्रपती राजश्री शाहू महाराजांच्या प्रेरणेतून सुरु झालेल्या अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने शिक्षणाची कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसलेल्या समाजातील वंचित, आर्थिक दुर्बल घटकातील व शिक्षण प्रवाहापासून पूर्णतः उपेक्षित वर्गासाठी २० जुलै २०१२ रोजी जनता कला व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली.

ग्रामीण भागातील पूर्णतः विनाअनुदानित महाविद्यालय असताना सुध्दा महाविद्यालयातील उपलब्ध अत्याधुनिक भौतिक सुविधा व महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर पाहिल्यानंतर गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याचा संकल्प व ध्यास घेतलेल्या संस्थेच्या मा.पदाधिकाऱ्यांचा शिक्षण विषयक उदात्त व कलासुसंगत दृष्टीकोणाचा अनायास प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. संस्था पदाधिकाऱ्यांच्या सर्वोपरी सहकार्य व प्रोत्साहनाच्या आधारे महाविद्यालय नॅकला सामोरे जाण्यास सज्ज झाले आहे.

'तेजो ऽ सि तेजो मे देहि' या महाबोध वाक्याची यथार्थ प्रचीती व विद्यार्थ्यामध्ये अध्ययन, संशोधना बरोबरच सामाजिक मूल्यांच्या बीजारोपनासाठी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्षामध्ये तज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने, विविध विषयाची चर्चासत्रे व कार्यशाळा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, रक्तदान शिबीर, वृक्षारोपन, विशेष हिवाळी शिबीर, आई माझ्या महाविद्यालयात, पालक मेळावा, माजी विद्यार्थी मेळावा तसेच स्नेह संमेलनासारख्या विविध उपक्रमाचे आयोजन सुनियोजितपणे केल्यामुळेच विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षा मध्ये उत्कृष्ठ यशाबरोबर क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळविलेले यश हे ह्या महाविद्यालयाच्या उज्ज्वल भविष्याचे स्पष्ट संकेत आहेत.

'मानस' च्या सर्वांग सुंदर वार्षिकांक अंकासाठी सर्वोपरी सहकार्य करणाऱ्या प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व पालकाचे विशेष आभार, शेवटी 'मानस' च्या संबंधी उत्स्फुर्त प्रतिक्रिया व सृजनात्मक सूचनांच्या प्रतीक्षेत !

**डॉ. सुरेश बाबर**
प्राचार्य



# संपादकीय ...

प्रिय विद्यार्थी मित्रांनो ...

'मानस' या नियतकालिकाचा शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० चा चतुर्थ अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. मानस अंक प्रकाशित करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरभरुन प्रतिसाद दिला. कोरोना च्या जागतिक महामारी मुळे हा अंक नियोजित वेळेत आपल्या हाती देता आला नाही. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला, कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न यातुन केला आहे. वाचनारे हात लिहिते व्हावे या हेतूने साकार झालेल्या या अंकात विद्यार्थी रोजच्या जगण्यातील प्रश्न, समस्या, नातेसंबंध यासारख्या आशयाला स्पर्श करत नाती हरवत चाललेला समाज, महाविद्यालयाचे मनोगत, माता - पिता, स्त्री - पुरुष समानता, ग्रामीण भागातील समस्या, थोर व्यक्तित्व, बेरोजगारी, लोकशाही, पर्यावरण जागृती, औषधी वनस्पती या विविध वलयांकीत विषयाचे अंतरंग उकलण्याचा प्रयत्न 'मानस' मधून केला आहे. उत्तुंग भविष्याचा उज्ज्वल मानस साकारताना विद्यार्थ्यांकडुन आलेल्या लेखनातून निवडक लेखांना या अंकात समाविष्ट केले आहे. यात सारस्वता बरोबरच महाविद्यालयात संपन्न झालेल्या शिक्षणपुरक व समाजोपयोगी उपक्रमांचा परिचय करुन दिला आहे. त्यामुळे महाविद्यालयातील प्रत्येक घटकाशी वाचकाचे स्नेहबंध निर्माण होऊन नवे ऋणानुबंध प्रस्थापित होण्यास मदत होईल.

मानस अंक सिध्द होत असताना संस्था पदाधिकाऱ्यांचे पाठबळ, प्राचार्यांची प्रेरणा व मार्गदर्शन, उपप्राचार्यांच्या सूचना, संपादक मंडळातील सर्वांचे सहकार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांचा यासाठी लागलेला हातभार यामुळे अंकाचे संपादन करताना मला निश्चितच आनंद मिळाला.

या अंकाला आकारबध्द करणारे प्रतिक प्रिंटरचे संचालक मोहनराव देशमुख, अक्षररचना करणारे श्री.दत्ता पाचंग यांचे 'मानस' शी असणारे दृढ नातेच हा अंक नेटका करण्यास उपयोगी पडले. त्यांचे मी आभार मानतो.

धन्यवाद ..!

**प्रा. राजेंद्र गोरे**
एम.ए.(मराठी) नेट, सेट
कार्यकारी संपादक

# आमची शान - आमचा सन्मान




महाराष्ट्र केसरी स्पर्धेत कुस्ती ७० किलो वजन गटात कास्यपदक विजेता महाविद्यालयातील विद्यार्थी विकास गोरे याचा सन्मान करताना मान्यवर



राष्ट्रीय ग्रामीण कुस्ती ५७ किलो वजन गटात सुवर्णपदक विजेता महाविद्यालयातील विद्यार्थी बुध्दभूषण साळवे याचा सन्मान करताना मा.राजू थापा समवेत मान्यवर

# अभिनंदनीय



प्रा.डॉ.अर्चना आढाव
नेट (हिंदी) उत्तीर्ण



– संपादक मंडळ –
मानस २०१९ – २०२०



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश बाबर व IQAC समिती सदस्य

# विद्यार्थी संसद



**कु.कावेरी कोतकर**
विद्यापीठ प्रतिनिधी (तृतीय वर्ष-विज्ञान)



**कु.रोहीणी भांबरे**
सांस्कृतिक प्रतिनिधी (तृतीय वर्ष-विज्ञान)



**अभिजित गोरे**
क्रीडा प्रतिनिधी (द्वितीय वर्ष-कला)



**सत्यम घोडके**
रा.से.यो. प्रतिनिधी (प्रथम वर्ष-विज्ञान)



**अभय नागवडे**
वर्ग प्रतिनिधी (प्रथम वर्ष-विज्ञान)



**कु.सोनाली राऊत**
वर्ग प्रतिनिधी (द्वितीय वर्ष-विज्ञान)



**कु.कावेरी कोतकर**
विद्यापीठ प्रतिनिधी (तृतीय वर्ष-विज्ञान)



**कु.प्रिती फुलारी**
वर्ग प्रतिनिधी (प्रथम वर्ष-कला)



**कु.दिपाली बर्डे**
विद्यार्थीनी प्रतिनिधी (द्वितीय वर्ष-कला)



**कु.मनिषा वाबळे**
वर्ग प्रतिनिधी (तृतीय वर्ष-कला)

# यशवंत - गुणवंत



**बुध्दभूषण साळवे**
राष्ट्रीय ग्रामीण कुस्ती स्पर्धा सुवर्णपदक



**विकास गोरे**
खाशाबा जाधव युवा महाराष्ट्र केसरी (रौप्यपदक)- महाराष्ट्र केसरी (कांस्यपदक)



**अभिजित गोरे**
राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवड



**कु.अश्विनी मुटकुळे**
प्रथम वर्ष कला - प्रथम



**कु.सोनाली राऊत**
प्रथम वर्ष विज्ञान - प्रथम



**कु.मनिषा वाबळे**
द्वितीय वर्ष कला - प्रथम



**कु.कावेरी कोतकर**
द्वितीय वर्ष विज्ञान - प्रथम



**कु.मिनाक्षी घोगरे**
तृतीय वर्ष कला - प्रथम



**कु.प्रगती गव्हाणे**
तृतीय वर्ष विज्ञान - प्रथम



**गौरव साठे**



**करण घनवट**

आव्हान - २०१९ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर नांदेड निवड



**अर्जुन वाडगे**
उत्कृष्ठ स्वयंसेविका
रा.से.यो.



**कु.भाग्यश्री वाळके**
उत्कृष्ठ स्वयंसेविका
रा.से.यो.



**आकाश उंडे**
उत्कृष्ठ स्वयंसेवक
कमवा-शिका योजना



**कु.मंदीरा जाधव**
उत्कृष्ठ स्वयंसेविका
कमवा-शिका योजना

# वार्षिक पारितोषिक वितरण




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर समवेत प्रमुख पाहुणे चित्रपट गीताकार बाबासाहेब सौदागर, सौ.कविता सौदागर, संस्थेचे उपाध्यक्ष मा.रा.ह.दरे, विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे, पंचायत समिती उपसभापती मा.रविंद्र भापकर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभातील मान्यवरांचे स्वागत आणि परिचय करुन देताना समारंभाचे कार्याध्यक्ष प्रा.राजेंद्र गोरे समवेत मान्यवर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे मा.बाबासाहेब सौदागर यांचा सन्मान करताना संस्थेचे उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.रा.ह.दरे समवेत मान्यवर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे पाहुणे सौ.कविता सौदागर यांचा सन्मान करताना संस्थेचे उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.रा.ह.दरे समवेत मान्यवर




विद्यार्थ्यांना पारितोषिकाचे वितरण करताना संस्थेचे विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे समवेत मान्यवर




विद्यार्थ्यांना पारितोषिकाचे वितरण करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.रा.ह.दरे व संस्थेचे विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे समवेत मान्यवर

# वार्षिक पारितोषिक वितरण




विद्यार्थ्यांना पारितोषिकाचे वितरण करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.रा.ह.दरे व संस्थेचे विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे समवेत मान्यवर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलताना संस्थेचे विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे समवेत मान्यवर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात संबोधित करताना सौ.कविता सौदागर समवेत मान्यवर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात संबोधित करताना प्रमुख पाहुणे चित्रपट गीतकार, अभिनेते मा.बाबासाहेब सौदागर समवेत मान्यवर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना संस्थेचे उपाध्यक्ष मा.रा.ह.दरे समवेत मान्यवर




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभास उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त करताना उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले समवेत मान्यवर

# सांस्कृतिक अविष्कार




वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी वैयक्तिक नृत्य सादर करताना विद्यार्थी




वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी वैयक्तिक नृत्य सादर करताना विद्यार्थीनी



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी समूह नृत्य सादर करताना विद्यार्थी



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी वैयक्तिक नृत्य सादर करताना विद्यार्थीनी




वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी गीतगायन करताना विद्यार्थीनी




वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी समूह नृत्य सादर करताना विद्यार्थी व विद्यार्थीनी

# सांस्कृतिक अविष्कार



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी समाज प्रबोधनपर नाटिका सादर करताना विद्यार्थी



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी वैयक्तिक नृत्य सादर करताना विद्यार्थीनी



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी समूह नृत्य सादर करताना विद्यार्थीनी



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी समाज प्रबोधनपर गीत सादर करताना विद्यार्थी व विद्यार्थीनी



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी लोकनृत्य सादर करताना विद्यार्थीनी



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी समाज प्रबोधनपर गीत सादर करताना विद्यार्थी व विद्यार्थीनी

# विभागीय उपक्रम



मराठी पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मा.जितेंद्र निकम समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर व पत्रकार



हिंदी दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मा.प्रा.एस.बी.दहातोंडे समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्रा.डॉ.अर्चना आढाव, प्रा.रेश्मा सोनवणे



मानवी हक्क व मतदान जनजागृती कार्यक्रमात उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रा.विरेंद्र धनशेट्टी समवेत प्रा.प्रदीप पेंढारे, मा.भागा वरखडे, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकर बोरुडे



जागतिक पर्यटन दिन कार्यशाळेत उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रा.नवनाथ वाव्हळ समवेत उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले, प्रा.शंकर बोरुडे



अन्न प्रक्रिया उद्योग - संधी व आव्हाने कार्यशाळेचे मार्गदर्शन करताना मा.रामदास शिंदे, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, उपप्राचार्च डॉ.डी.एस.तळूले, प्रा.शंकर बोरुडे



भित्तीपत्रक स्पर्धेचे निरिक्षण करताना मा.रविंद्र भापकर समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, शिक्षक व विद्यार्थीनी

# विभागीय उपक्रम



महाविद्यालयाची रुई छत्तीशी - शनि शिंगणापूर - नेवासा - कृषि विद्यापीठ राहुरी - रुई छत्तीशी या शैक्षणिक सहलीत सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक




वाचन प्रेरणा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ.महेबूब सय्यद समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्रा.शुभांगी पवार



विज्ञान मंडळ उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.बी.डी.पाटील यांचा सन्मान करताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर समवेत उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले, प्रा.रविराज सुपेकर, प्रा.सिद्धेश्वर करंडे




पक्षी विविधता व पर्यावरणाशी संबंध या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.सुधाकर कुऱ्हाडे समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर




गणित दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ.एस.बी.गायकवाड समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर



काव्यवाचन स्पर्धेत कविता सादरीकरण करताना विद्यार्थीनी प्राजक्ता भांबरे समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्रा.राजेंद्र गोरे, परीक्षक प्रा.नवनाथ वाव्हळ, प्रा.डॉ.अर्चना आढाव, प्रा.नयना क्षीरसागर,प्रा.शंकर बोरुडे

# विद्यार्थी विकास मंडळ



विद्यार्थी विकास मंडळाद्वारे आयोजित अन्न प्रक्रिया उद्योग - संधी व आव्हाने कार्यशाळेचे दिपप्रज्वलन करताना मा.रामदास शिंदे, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले, विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकर बोरुडे, प्रा.मोहन पोटरे



विद्यार्थी विकास मंडळाद्वारे आयोजित आई माझ्या महाविग्गलयात कार्यशाळेत उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.सौ.आश्लेषा भांडारकर, सरपंच सौ.मीनाक्षी जगदाळे, प्रा.रुपाली कदम, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले, विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकर बोरुडे



विद्यार्थी विकास मंडळाद्वारे आयोजित मानवी हक्क व मतदान जनजागृती कार्यक्रमात उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रा.विरेंद्र धनशेट्टी समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकर बोरुडे, प्रा.सुहास नवले



विद्यार्थी विकास मंडळाद्वारे आयोजित जागतिक पर्यटन दिन कार्यशाळेत उपस्थिताना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले समवेत प्रा.नवनाथ वाव्हळ, विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकर बोरुडे



स्व.माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानद्वारे आयोजित मोफत कायदेविषयक जागृती शिबीरात उपस्थिताना मार्गदर्शन करताना मा.एम.एम.तांबे समवेत मा.मुकेशदादा मुळे, मा.बाळासाहेब पाडळकर, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर व इतर मान्यवर



विद्यार्थी विकास मंडळाद्वारे आयोजित राजकीय पत्रकारिता कार्यशाळेत उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रा.प्रदीप पेंढारे समवेत मा.भागा वरखडे, प्रा.विरेंद्र धनशेट्टी, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकर बोरुडे

# राष्ट्रीय सेवा योजना : उपक्रम




हिवाळी विशेष श्रमसंस्कार शिबिर उद्घाटनप्रसंगी पाहुण्यांचा परिचय करुन देताना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.संदीप भनगे समवेत मान्यवर



सुदृढ भारत अभियान कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ.अनिल ससाणे समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.संदीप भनगे




कोल्हापूर पूरग्रस्तांना आर्थिक मदत गोळा करताना विद्यार्थी व प्राध्यापक



हिवाळी विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांसमवेत प्राध्यापक




रा.से.यो. दिनानिमित्त कोथूळ खंडोबा मंदिर परिसर स्वच्छतेसाठी सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक



हिवाळी विशेष श्रमसंस्कार शिबिरात श्रमदान करताना विद्यार्थी

# क्रीडा विभाग



महाविद्यालयीन विद्यार्थी अभिजित गोरे याचा सन्मान करताना संस्थेचे अध्यक्ष मा.आ.नंदकुमार झावरे पा. समवेत संस्थेचे सचिव मा.जी.डी.खानदेशे आणि सहसचिव मा.विश्वासराव आठरे पा.



महाविद्यालयाचा विद्यार्थी विकास सासवडे याचे कुस्ती स्पर्धेतील यशाबद्दल अभिनंदन करताना संस्थेचे सचिव मा.जी.डी.खानदेशे साहेब



महाविद्यालयाचा विद्यार्थी श्रवण कुमार जंजाळे याला किक बॉक्सिंग स्पर्धेतील प्रमाणपत्राचे वितरण करताना संस्थेचे सहसचिव मा.ॲड.विश्वासराव आठरे पा.



महाविद्यालयाचा विद्यार्थी बुद्धभूषण साळवे मा.विकास राठोड यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना



महाविद्यालयाचा विद्यार्थी अभिजित गोरे समवेत पुणे विद्यापीठ खो-खो स्पर्धेतील सहभागी संघ

# सांस्कृतिक उपक्रम



महाविद्यालयातील वृक्षारोपन समारंभात वृक्षारोपन करताना संस्थेचे उपाध्यक्ष मा.रा.ह.दरे समवेत सचिव मा.जी.डी.खानदेशे, सहसचिव मा.ॲड.विश्वासराव आठरे पा., मा.विश्वस्त मुकेश मुळे, सदस्य मा.सिताराम खिलारी, सदस्य मा.जयंत वाघ, मा.संपतराव म्हस्के प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी



वृक्षदिंडी कार्यक्रमात सरपंच, ग्रामस्थ यांना वृक्ष वाटप करताना विद्यार्थी व प्राध्यापक



विद्यार्थी स्वागत समारंभात नव प्रवेशित विद्यार्थीनी चे स्वागत करताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले, प्रा.राजेंद्र गोरे, प्रा.दादासाहेब वाळके, प्रा.शंकर बोरूडे




पालक मेळाव्यात अध्यक्षीय भाषण करताना संस्थेचे विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्राचार्य पांडुरंग गोरे, मा.राम साबळे, मा.दत्ता पा. नारळे, मा.संजय भांबरे



भित्तीपत्रक स्पर्धेचे निरीक्षण करताना मा.रविंद्र भापकर समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, शिक्षक व विद्यार्थीनी




विद्यार्थीनीला पारितोषिकाचे वितरण करताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर समवेत प्रमुख पाहुणे चित्रपट गीतकार बाबासाहेब सौदागर, सौ.कविता सौदागर, संस्थेचे उपाध्यक्ष मा.रा.ह.दरे, विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे

# सांस्कृतिक उपक्रम




शिक्षक दिन कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना विद्यार्थीनी समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले, प्रा.राजेंद्र गोरे, विद्यार्थी प्राचार्य कावेरी कोतकर, विद्यार्थी उपप्राचार्य राहुल घाडगे



विविध रंग-वेशभूषा दिना निमित्त उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थीनी समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्राध्यापक व प्राध्यापिका



मेहंदी स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनी व प्राध्यापिका



निरोप समारंभ कार्यक्रमात प्रास्ताविक करताना कावेरी कोतकर, समवेत मा.प्रा.अर्जुनराव पोकळे, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले, प्रा.रविराज सुपेकर, प्रा.सिद्धेश्वर करंडे



काव्यवाचन स्पर्धेत कविता सादरीकरण करताना विद्यार्थीनी रोहिणी भांबरे समवेत परीक्षक प्रा.नवनाथ वाव्हळ, प्रा.डॉ.अर्चना आढाव, प्रा.नयना क्षीरसागर, प्रा.शंकर बोरुडे



शिवजयंती कार्यक्रमात प्रतिमा पुजन करताना विद्यार्थी व प्राध्यापक

# शैक्षणिक उपक्रम



सुदृढ भारत अभियानात विद्यार्थ्यांना शपथ देताना डॉ.अनिल ससाणे समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्राध्यापक व सहभागी विद्यार्थी



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उद्घाटनप्रसंगी दिपप्रज्वलन करताना **STI** मा.दत्तात्रय भिसे समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्रा.डॉ.अर्चना आढाव, प्रा.नयना क्षीरसागर, प्रा.रणशिंग



कोल्हापूर पूरग्रस्तांना आर्थिक मदत गोळा करताना विद्यार्थी व प्राध्यापक



पालक मेळाव्यात सहभागी पालकास महाविद्यालयातील संगणक प्रयोगशाळेची माहिती देताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर



मराठी पत्रकार दिनानिमित्त आयोजित पत्रकार गौरव समारंभात उपस्थित पत्रकारासमवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर व प्राध्यापक



विद्यार्थी विकास मंडळाद्वारे आयोजित 'आई माझ्या महाविद्यालयात' कार्यशाळेत उपस्थित माता समवेत प्रा.डॉ.सौ.आश्लेषा भांडारकर, सरपंच सौ.मीनाक्षी जगदाळे, प्रा.रुपाली कदम, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, उपप्राचार्य डॉ.डी.एस.तळूले, प्रा.शंकर बोरुडे

# शैक्षणिक उपक्रम



स्व.माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानद्वारे आयोजित मोफत कायदेविषयक जागृती शिबीरात उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.मुकेशदादा मुळे, समवेत मा.एम.एम.तांबे, मा.बाळासाहेब पाडळकर, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर व इतर मान्यवर




वक्तृत्व स्पर्धेत भाषण करताना विद्यार्थीनी समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, परीक्षक प्रा.नवनाथ वाव्हळ, प्रा.डॉ.अर्चना आढाव, प्रा.नयना क्षीरसागर, प्रा.शंकर बोरुडे



महाविद्यालयाची रुई छत्तीशी – कोल्हापूर – महाबळेश्वर – रुई छत्तीशी या शैक्षणिक सहलीत सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक



पुष्परचना स्पर्धेचे निरीक्षण करताना प्राचार्य डॉ.बी.ए.पाटील समवेत प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्राध्यापक व सहभागी विद्यार्थी




पालक मेळाव्यात सहभागी पालकास महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र उद्यानाची माहिती देताना प्राचार्य डॉ.सुरेश बाबर



ग्रंथदेणगी समारंभात महाविद्यालयास ग्रंथभेट देताना मा.सोमनाथ जगदाळे समवेत संस्थेचे विश्वस्त मा.मुकेशदादा मुळे, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, प्राचार्य मा.पांडुरंग गोरे, मा.दत्ता पा.नारळे, मा.दिनकर मुळे

## क्षणचित्रे ...


महाविद्यालयातील शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याचे उद्‌घाटन करताना संस्थेचे सचिव मा.जी.डी.खानदेशे समवेत अध्यक्ष मा.आ.नंदकुमार झावरे पा., सहसचिव मा.ॲड.विश्वासराव आठरे पा. समवेत मान्यवर


महाविद्यालयातील कॅन्टीनचे उद्‌घाटन करताना संस्थेचे सहसचिव मा.ॲड.विश्वासराव आठरे पा. समवेत अध्यक्ष मा.आ.नंदकुमार झावरे पा., सचिव मा.जी.डी.खानदेशे समवेत मान्यवर


महाविद्यालयातील संगणक रुमचे उद्‌घाटन करताना संस्थेचे अध्यक्ष मा.आ.नंदकुमार झावरे पा. समवेत सचिव मा.जी.डी.खानदेशे, सहसचिव मा.ॲड.विश्वासराव आठरे पा. समवेत मान्यवर



महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र उद्यानाचे निरीक्षण करताना संस्थेचे अध्यक्ष मा.आ.नंदकुमार झावरे पा. समवेत सचिव मा.जी.डी.खानदेशे, सहसचिव मा.ॲड.विश्वासराव आठरे पा. व मान्यवर


महाविद्यालयातील विद्यार्थीनींना आरोग्यविषयी मार्गदर्शन करताना प्रा.रुपाली कदम समवेत सरपंच मा.मीनाक्षी जगदाळे, प्राचार्य डॉ.सुरेश बाबर, विद्यार्थी व प्राध्यापक


महाविद्यालयातील पालक मेळाव्यास उपस्थित माता पालक भोजनाचा आस्वाद घेताना

# क्षणचित्रे ...



सांस्कृतिक विभागाद्वारे आयोजित 'पारंपारिक वेशभूषा डे' उपक्रमात सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक



सांस्कृतिक विभागाद्वारे आयोजित नवागत विद्यार्थी स्वागत समारंभात उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक



महाविद्यालयाच्या भौतिक सुविधासाठी आर्थिक मदत करताना माजी विद्यार्थी महादेव वाळके समवेत संस्थेचे अध्यक्ष मा.आ.नंदकुमार झावरे पा., सचिव मा.जी.डी.खानदेशे, सहसचिव मा.ॲड.विश्वासराव आठरे पा. समवेत प्राध्यापक



पदवीप्रदान समारंभात संस्थेचे सचिव मा.जी.डी.खानदेशे यांच्या हस्ते पदवी ग्रहण करताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी



महाविद्यालयातील IQAC समितीचे कामकाज पाहताना न्यू आर्टस् कॉलेज, अ.नगर चे परामर्श स्कीम सदस्य प्रा.डॉ.काळे व्ही.एस. समवेत प्राध्यापक



योगदिनाच्या निमित्ताने योगासने करताना महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक

## जनता महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व गणित दिनानिमित्त विशेष व्याख्यान

## जनता महाविद्यालयात पालक मेळावा उत्साहात



पुढारी

## सामाजिक ऋण फेडण्यासाठी युवकांनी रक्तदान करावे : डॉ. इंगो



मंगळवार, दि. १० डिसेंबर २०१९

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

## नगर तालुका तालिम सेवा संघातर्फे आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल बुद्धभूषण साळवेचा सत्कार



पुढारी

## जनता कॉलेजमध्ये जागतिक पर्यटन दिन कार्यशाळा उत्साहात

ऐतिहासिक वास्तूंचे अभ्यासक प्रा. नवनाथ वाव्हळ यांचे मार्गदर्शन



संक्षिप्त



वाळकी : पत्रकार दिनानिमित्त वाळकीतील (ता. नगर) महाविद्यालयात पत्रकारांचा गौरव करताना प्राचार्य सुरेश बाबर.

### जनता महाविद्यालयात पत्रकारांचा गौरव

## मुला मुलींना समानतेची वागणूक द्या : प्रा. रुपाली कदम

जनता कॉलेजमध्ये युवतींना आरोग्य विषयक मार्गदर्शन



संक्षिप्त



वाळकी : पत्रकार दिनानिमित्त वाळकीतील (ता. नगर) महाविद्यालयात पत्रकारांचा गौरव करताना प्राचार्य सुरेश बाबर.

### जनता महाविद्यालयात पत्रकारांचा गौरव

## जनता महाविद्यालयात अद्यावत संगणक प्रयोगशाळेसह विविध सुविधांचे उद्घाटन

संस्था पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वनस्पतीशास्त्र उद्यानाचे लोकार्पण



## जनता महाविद्यालयात मोफत कायदेविषयक मार्गदर्शन

## 'सुदृढ भारत' विषयावरील व्याख्यानाने जनता कॉलेजमध्ये अभियानाची सुरुवात





राष्ट्रीय सेवा योजनेच्या ८२ विद्यार्थ्यांकडून गुंडेगावातील खंडोबा मंदिर परिसराची सफाई

## ग्रंथ देणगी व सत्कार समारंभ

जनता महाविद्यालयात कार्यक्रम



## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

## पक्ष्यांचे समुद्राकडून धरणांकडे होणारे स्थलांतर धोक्याचा इशारा

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये अनेक संधी : रामदास शिंदे



## जनता कॉलेजमध्ये मतदान जनजागृती कार्यशाळा



लोकमत

## जनता महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात



## जनता महाविद्यालयात मोफत कायदेविषयक मार्गदर्शन



सुधाकर कुऱ्हाडे : जनता विद्यालयात व्याख्यान

## पक्ष्यांचे समुद्राकडून धरणांकडे होणारे स्थलांतर धोक्याचा इशारा



## जनता महाविद्यालयात 'आई माझ्या महाविद्यालयात' उपक्रम

पुढारी

## जशी मागणी तशी गाणी दिली

सौदागर; जनता महाविद्यालयात पारितोषिक वितरण





जनता महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन

## जनता महाविद्यालयात वाचक प्रेरणा दिन

## मुला मुलींना समानतेची वागणूक द्या : प्रा. रुपाली कदम

जनता कॉलेजमध्ये युवतींना आरोग्य विषयक मार्गदर्शन



रुईछत्तीशीच्या जनता कॉलेजमध्ये

## 'आई माझ्या महाविद्यालयात' कार्यशाळा



## समाजाच्या दृष्टिकोणामुळे युवक विधीक्षेत्रापासून

प्राचार्य एस. एम. तांबे : जनता कॉलेजमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर उत्साह



## सेविकांना कापडी पिशव्यांचे वाटप

# मराठी विभाग



शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्दे वाटू धन जनलोका ।।
तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव ।
शब्देची गौरव पूजा करु ।।

– संत तुकाराम

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शिर्षक | लेखक/कवी | अ. क्र. | शिर्षक | लेखक/कवी |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतातील बरोजगारीची समस्या | सोनाली राऊत | ३७ | आई थोर तुझे उपकार | शामल साळवे |
| २ | भारतातील बेरोजगारीची समस्या | रेवती निसळ | ३८ | कुष्ठरोग्यांचा देव – बाबा आमटे | स्वप्नाली वाघमोडे |
| ३ | आई | साक्षी कासार | ३९ | नोबल पारितोषिक विजेता – अमर्त्य सेन | अंबिका घोंगडे |
| ४ | महाराष्ट्रातील दारिद्र्याची कहाणी | रेश्मा पाडळकर | ४० | राजकीय आरक्षण : कुणासाठी, कशासाठी | शितल घोडेकर |
| ५ | माझा आवडता साहित्यिक : केशवसूत | अश्विनी मुटकुळे | ४१ | जीवनातील सात सत्य | साक्षी कासार |
| ६ | आईची माया | साक्षी कासार | ४२ | आई | साक्षी कासार |
| ७ | शेतकऱ्यांचे आत्मवृत्त | दिपक बोरुडे | ४३ | भारतीय लोकशाही : दशा–दिशा | प्रदीप शेळके |
| ८ | स्वप्नपुर्ती | दिपक बोरुडे | ४४ | ज्वालामुखी | शशिकांत भापकर |
| ९ | नाती हरवत चाललेला समाज | पुनम वाघ | ४५ | वेळ नाही | रोहिणी भांबरे |
| १० | स्त्री–पुरुष समानता | आकांक्षा शेलार | ४६ | पर्यावरण जागृती | वर्षा वाबळे |
| ११ | लेक वाचना | योगेश बोरुडे | ४७ | चांद्रयान – २ मोहिम | रेवती निसळ |
| १२ | राष्ट्रपती राजवट | जयश्री कासार | ४८ | औषधी वनस्पती – अननस | रेवती निसळ |
| १३ | राजमाता जिजाऊ | कोमल खाकाळ | ४९ | गझलमित्र | रेश्मा पाडळकर |
| १४ | चारोळी | अश्विनी परदेशी | ५० | बाप | सोनाली राऊत |
| १५ | मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण | आकांक्षा शेलार | ५१ | तरुणा जागा हो ... | शितल घोडेकर |
| १६ | पाहूणे | दिपाली बोरुडे | ५२ | वडील | सोनाली राऊत |
| १७ | जी.एस.टी.ची ओळख | प्रणाली बोरकर | ५३ | कॉलेजचे मनोगत | प्रमिला भुजबळ |
| १८ | काळ | अंजली झांबरे | ५४ | गंध लावला पाहिजे का ? | साक्षी कासार |
| १९ | भारतातील गरीबी, बेकारी आणि ... | अश्विनी मुटकुळे | ५५ | दैव आणि कर्म | साक्षी कासार |
| २० | मोबाईल संस्कृती | पुजा डोके | ५६ | माझे कॉलेज | पुजा घोंगडे |
| २१ | सावित्रीबाई फुले | प्राजक्ता भांबरे | ५७ | कस विसरु तुला ... | शुभम गोरे |
| २२ | आयुष्य | अर्जुन वाडगे | ५८ | पाखरु | प्राजक्ता कारंजकर |
| २३ | ग्रामीण जीवनातील समस्या | केतन वाघ | ५९ | आई | निता बोरुडे |
| २४ | महाविद्यालय | दिपाली बोरुडे | ६० | मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचं | निता बोरुडे |
| २५ | भूगोल | प्रियंका गुंड | ६१ | विझलो आज जरी मी | सारिका अडागळे |
| २६ | मैत्रिचं नातं | अंबिका घोंगडे | ६२ | माझे वडील | सारिका अडागळे |
| २७ | मातृभाषा | अश्विनी मुटकुळे | ६३ | आठवणी महाविद्यालयीन जीवनाच्या | योगेश बोरुडे |
| २८ | विचारधन | माधुरी वाळके | ६४ | निसर्गाची गाथा | दिपाली बोरुडे |
| २९ | ती एक आई होती | रोहिणी भांबरे | ६५ | मैत्रीण | दिपाली बोरुडे |
| ३० | बाबा | रेवती निसळ | ६६ | घराची प्रतिष्ठा | साक्षी कासार |
| ३१ | २३ डिसेंबर शेतकरी दिन | सोनाली राऊत | ६७ | धरणीमाता | भाग्यश्री वाळके |
| ३२ | डिजिटलायझेशन द्वारे विकास | विकास गोरे | ६८ | परीक्षेला जाता जाता ... | -- |
| ३३ | झाडे लावा झाडे जगवा | सोनाली राऊत | ६९ | कोणत्याही तीन अंकी ... | सोनाली राऊत |
| ३४ | भारतातील आर्थिक मंदी आणि... | अक्षय पवने | ७० | कविता | शम्मा शेख |
| ३५ | बेरोजगार | ऋषिकेश बोडखे | | | |
| ३६ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे | सोनाली राऊत | | | |

# भारतातील बेरोजगारीची समस्या




वाढती बेरोजगारी ही प्रत्येक देशासाठी एक गंभीर समस्या होत असते. त्यामुळे अमेरिकेसारख्या प्रगतशील देशात सुद्‌धा बेरोजगारीचे प्रमाण वाढले की सरकारची डोकेदुखी पण वाढत असते. भारतासाठी मात्र बेरोजगारीचे चित्र भयावह आहे. नीती आयोगाने नुकताच एक आराखडा जाहीर केला होता. या कृती आराखड्यात सरकारकडे अनेक प्रस्ताव देण्यात आले. २०१९-२० सालापर्यंत देशातील ग्रामविकास, संरक्षण, कृषी, आरोग्य, शिक्षण, रेल्वे, रस्ते आणि अन्य भांडवली खर्चाच्या गुंतवणुकीत वाढ करण्याबरोबरच देशात सध्या वाढत असलेल्या बेरोजगारीवर सुद्‌धा भाष्य करण्यात आले आहे. त्यामुळे देशात वाढत असलेल्या बेरोजगारीकडे गंभीरपणे बघण्याची गरज निर्माण झाली आहे.

केंद्रीय कामगार मंत्र्यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, २०१३-१४ मध्ये बेरोजगारीचा दर ३.४ टक्के होता, २०१५-१६ मध्ये तोच दर ३.७ टक्के म्हणजे अगदी कमी प्रमाणातच वाढला आहे. सर्वसाधारण वर्षात ३० दिवस काम केलेला कर्मचारी/कामगार हा 'नियुक्त कर्मचारी' म्हणजेच रोजगारीत असलेला कर्मचारी हा 'नियुक्त कर्मचारी' म्हणजेच रोजगारीत असलेला कर्मचारी असा अर्थ सरकारी 'डेटा मध्ये लावला जातो.

कृषी क्षेत्राच्या संदर्भात, जे तरुण कृषी क्षेत्र सोडुन शहरांत नोकरीच्या निमित्ताने गेले त्यांचा सातत्याने भ्रमनिरास होत आहे. सध्या जवळजवळ १६% शिक्षित तरुण बेरोजगार आहेत. उत्तरेकडील राज्यांत ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. सुयोग्य जीवनपध्दतीची हमी देतील अशा रोजगारसंधी मिळवण्यास त्यांची कौशल्ये कमी पडतात. दुसरीकडे, पेरणी, कापणी, पाखडणी इ. साठी यंत्रांचा वापर होत असल्याने ग्रामीण भागातील स्त्रिया देखील मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहेत. मनरेगा मध्ये कोणत्याही राज्यात स्त्रियांना १०० दिवस रोजगार देण्यात येत नसल्याने ग्रामीण भागातील अधिकाधिक स्त्रिया बेरोजगारीत राहतात. खऱ्या वेतनाची कुंठीतता आणि वेळेत वेतन देण्याची शासनाची अक्षमता यामुळे ग्रामीण भागांतील स्त्रिया रोजगार योजनांपासुन लांबच राहिल्या आहेत.

शहरी भागांत, सचिवालय किंवा इतर न्यून वेतनाच्या नोकऱ्यांमध्ये यंत्रांच्या वापरामुळे स्त्रियांची पिछेहाट होत आहे. शासनाने कामगार-प्रधान उद्योगांना उत्तेजन देणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक प्रकारे वित्तीय सहाय्य केले आहे.

असे उद्योग अनौपचारिक क्षेत्रामध्ये समाविष्ट असून रोजगाराच्या शोधात असलेले अनेक जण या क्षेत्रात सामावले जातात. मात्र, या क्षेत्रात कोणतीही सामाजिक सुरक्षितता नसून काम करणाऱ्याची परिस्थिती देखील अमानवी असते. रोजगाराच्या शोधात असलेले अनेकांपैकी ९४% लोकांना इतर पर्यायांच्या अभावी अनौपचारिक क्षेत्रातच काम करावे लागते.

भारत म्हणजे जगातील सर्वाधिक बेरोजगारांचे जणू एक डबके आहे. आगामी २०१९ च्या निवडणुकांमध्ये बेरोजगारांना रोजगारसंधी उपलब्ध करुण देणे हा प्रमुख राजकीय मुद्दा असेल. ऑक्टोबर मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ६.९% इतका झाला असे सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकोनोमीच्या नोंदीमध्ये दृश्य आहे. सन २०१४ मध्ये बरोजगारांची संख्या १४ कोटी इतकी होती, आता ती ३० कोटी झाली आहे. यामुळे, अर्थव्यवस्था बेरोजगारांना का सामावून घेऊ शकत नाही. याबाबत आश्चर्यभाव निर्माण होतो.

बेरोजगारी फोफावण्यास अनेक बाबी कारणीभूत

आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेचा वृध्दीवर स्थिर नाही हे प्रमुख कारण असुन यालाही काही बाबी कारणीभूत आहेत. गुंतवणुकीचा न्युन दर आणि रोजगार संधी निर्माण करणाऱ्या उत्पादन क्षेत्राचा मंद वृध्दी दर मागील महिन्यात हा उत्पादन वृध्दी दर ४.२ इतका होता.

सार्वजनिक आणि खाजगी या दोन्ही क्षेत्रातील रोजगार संधी आक्रसत आहेत असे लक्षात येते. एकुण १० रोजगार संधीपैकी ६ संधी या औद्योगिक क्षेत्रातील होत्या. परंतु, गेल्या ३ वर्षात मोठ्या उद्योगांची प्रगती धीम्या गतीने झाल्याने या रोजगारित्यांची संख्या केवळ ०.५% नी वाढली.

साधारणपणे, उदारीकरणानंतर सार्वजनिक क्षेत्राने अनेक आर्थिक कृतींतुन अंग काढून घेतल्याने हे क्षेत्र आक्रसले आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासामुळे पतसंस्थांतील रोजगारसंधी गोठल्या आहेत. मात्र, ग्रामीण भागांतील ८२% युवकांचा कल शासकीय नोकऱ्यांकडे आहे. परिणामी, सरकारी नोकऱ्यांमध्ये वेगवेगळ्या समुदायांना आरक्षण मिळावे यासाठी ते प्रयत्न करताना दिसतात.

**राऊत सोनाली**
एस.वाय.बी.एस्सी.

# भारतातील बेरोजगारीची समस्या

आपल्या देशात दर महिन्याला दहा लाख तरुण रोजगार मागणाऱ्यांच्या रांगेत उभे रहात आहेत, पण नवीन रोजगार उपलब्ध होण्याचा दर वर्षाला वीस लाखांच्या आतच अडकला असेल तर मग त्याचे परिणाम काय असणार आहेत ! २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांनी तरुणांनादर वर्षाला एक कोटी रोजगार निर्माण करण्याचा शब्द दिला होता. गेल्या तीन वर्षांत मोदींच्या सरकारने ६० लाख रोजगार देखील उपलब्ध करुन दिले नाहीत. कृषी आणि अन्य क्षेत्रात रोजगार निर्माण होण्यासारखी परिस्थिती नाही. 'मेक इन इंडिया' लोकप्रिय बनवण्याच्या प्रयत्नानंतरही ही योजना पुढे सरकू शकली नाही. दुष्काळी परिस्थितीने बेजार झालेल्या शेतकऱ्यांच्या हाती काही राज्यांनी कर्जमाफी देऊनही काही फरक पडला नाही. गाय आणि अन्य पशुधन खरेदी-विक्रीचा कारभार ठप्प झाला आहे. त्यामुळे पशुपालक आणि संबंधित लोकदेखील बेरोजगार झाले आहेत. मेलेल्या जनावरांच्या कातडी काढण्याच्या पारंपारिक धंद्याकडेही लोकांनी पाठ फिरवल्याने कातडी उद्योगदेखील पूर्ण बसला आहे. नोटाबंदीचा परिणाम छोट्या उद्योगांपासून ते कृषी क्षेत्रापर्यंत सगळ्याच उद्योग क्षेत्रांवर झाला. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या वृध्दीवर लागोपाठ चार तिमाही घसरताच राहिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याप्रमाणेच इंदिरा गांधी यांनीदेखील (१९७१) मध्ये लोकसभा निवडणुकीत जबरदस्त बहुमत मिळवून सत्तारुढ झाल्या होत्या. यानंतर बांगलादेश निर्मितीच्या यशाबरोबरच पाकिस्तानवरचा विजय, यशस्वी अणुचाचणी आणि सिक्कीमचे हिंदुस्थानात विलीनीकरण यासारख्या ऐतिहासिक घटना घडल्या असतानादेखील रोजगार निर्माण करण्यात अपयश आल्याने त्यांच्यासाठी ते एक प्रकारचे ग्रहण सिध्द झाले. या घटनेमुळे रोजगार हा मुद्दा निर्णायक भूमिका निभावत असल्याचे दिसते. आपल्या देशात आजच्या घडीला दर महिन्याला दहा लाख नोकऱ्यांची मागणी आहे, पण त्यापैकी १० ते २० टक्केदेखील नोकऱ्या निर्माण होताना दिसत नाहीत. सरकार उद्योगांना चालना देणारे धोरण राबवत असल्याचा प्रचार होत असला तरी तिथेही रोजगार नोकऱ्यांबाबतीत शिमगाच आहे. सरकार मुद्रा कर्ज योजनेच्या माध्यमातून लधु उद्योग आणि स्वयंरोजगार क्षेत्रात पाच कोटी नवीन रोजगार निर्माण केल्याचा दावा करीत आहे, मात्र याबबतीत खरी वस्तुस्थिती पंतप्रधानांनाच ठाऊक त्यामुळे ते पायाभूत योजना पूर्ण करणे, नव्या योजना सुरु करणे किंवा रेल्वेमध्ये खाजगी गुंतवणूक करणे आणि बुलेट ट्रेन आणि मध्यम आकाराच्या सुरक्षा उत्पादन योजनांना गती देण्याचा प्रयत्न केला

जात आहे.

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी देखील रोजगार हाच मुद्दा सध्याच्या सरकारपुढे सगळ्यात मोठे आव्हान असल्याचे म्हटले आहे. त्यांनी मुलभूत पाया, वीज आणि निर्यात यावर अधिक लक्ष देण्याचा सल्ला दिला आहे. निर्यात क्षेत्रातील आपले अपयश खरे तर आपल्या पचनी पडण्यासारखे नाही. आशिया खंडातल्या अन्य देशांत निर्यात वाढत असली तरी तेवढी पुरेशी नाही. कुटीर, लघु आणि लघु क्षेत्राला नोटाबंदीने जो फटका बसला आहे. त्यातून हा उद्योग भरारी कधी घेणार असा प्रश्न आहे.

देशात बेरोजगारीचा दर साडेचार टक्के झाला आहे. त्यातही बेरोजगारी शहरी भागात अधिक आहे. तिकडे ग्रामीण भागात दुष्काळ आणि पूर यामुळे शेतीचे तीनतेरा वाजले आहेत. त्यामुळे इथेही हाताला काम नाही. खरीप क्षेत्र यंदा गेल्या वर्षाच्या तुलनेत घटले आहे. वर्षभर रोजगार उत्पन्न होण्याच्या प्रमाणात घट आणि हीच परिस्थिती पुढच्या वर्षीदेखील राहण्याची शकता असल्याचे आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने व्यक्त केली आहे. देशातील बेरोजगारांची संख्या कोटींचा पल्ला गाठायला आली आहे. हे लोक नोकरी नसल्याने हताश, निराश आहेत. त्यात दरमहिन्याला आणखी भर पडत आहे. शेतकरी तर हाती काहीच लागत नसल्याने निराश होऊन आत्महत्या करीत आहे. त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करणे आणि नवीन नोकऱ्या उपलब्ध करणे मोदी सरकारपुढे मोठे आव्हान आहे.

वाढती बेरोजगारी ही प्रत्येक देशासाठी एक गंभीर समस्या होत असते. त्यामुळे अमेरिकेसारख्या प्रगतशील देशातसुध्दा बेरोजगारीचे प्रमाण वाढले की सरकारची डोकेदुखी पण वाढत असते. भारतसाठी मात्र बेरोजगारीचे चित्र भयावह आहे. नीती आयोगाने नुकताच एक आराखडा जाहीर केला होता. या कृती आराखड्यात सरकाकडे अनेक प्रस्ताव देण्यात आले. २०१९-२० सालापर्यंत देशातील ग्रामविकास, संरक्षण, कृषी, आरोग्य, शिक्षण, रेल्वे, रस्ते आणि अन्य भांडवली खर्चाच्या गुंतवणुकीत वाढ करण्याबरोबरच देशात सध्या वाढत असलेल्या बेरोजगारीवर सुध्दा भाष्य करण्यात आले आहे. त्यामुळे देशात वाढत असलेल्या बेरोजगारीकडे गंभीरपणे बघण्याची गरज निर्माण झाली आहे.

केंद्रीय कामगार मंत्र्यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, २०१३-१४ मध्ये बरोजगारीचा दर ३.४ टक्के होता. २०१५-१६ तोच दर ३.७ टक्के म्हणजे अगदी कमी प्रमाणातच वाढला आहे. सर्वसाधारण वर्षात ३० दिवस काम केलेला कर्मचारी हा 'नियुक्त कर्मचारी' म्हणजेच रोजगारीत असलेला कर्मचारी असा अर्थ सरकारी 'डेटा' मध्ये लावला जातो या तत्वानुसार सरकारी 'गॅझेट' मध्ये 'नियुक्त कर्मचारी' असलेल्याना वर्षभर काम नसले तरी तो कर्मचारी 'नियुक्त' म्हणून समजला जातो. या उलट पाचव्या 'वार्षिक रोजगार - बेरोजगार सर्व्हे' च्या निष्कर्षाप्रमाणे बेरोजगारीचा दर ५ टक्क्यांपर्यंत वाढलेला आहे. भारतात दर वर्षी १ कोटी ६० लाख तरुण नोकरीच्या शोधात बाहेर पडत असतात. परंतु त्यांच्यासाठी फक्त १५ ते २० लाख नोकऱ्यांची निर्मिती होत असते असे गंभीर चित्र आज या देशात आहे. मध्यंतरी 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' या संस्थेने एक पाहणी केली होती. या संस्थेचे निष्कर्ष बेरोजगारीचे भयानक चित्र स्पष्ट करतात. एका अर्थशास्त्रीय सर्व्हेप्रमाणे भारतात जवळ जवळ ७७ टक्के कुटुंबात कायमस्वरुपी नोकरी करणारी व्यक्ती असत नाही. म्हणजेच रोजंदारी किंवा हंगामी नोकरी असते. तर ६७% कुटुंबे अशी आहेत की त्यांना महिन्याला १० हजारांपेक्षा कमी उत्पन्न असते. निती आयोगाने नुकत्याच जाहीर केलेल्या प्रवार्षिक कृती आराखड्यात रोजगारी निर्मितीचे प्रमाण प्रचंड घटल्याचे स्पष्ट केले आहे. 'सेंटर फॉर मॉनिटिरग ऑफ इंडियन इकॉनॉमी' या संस्थेने नोटाबंदीनंतर केलेल्याएका सर्व्हेप्रमाणे जानेवारी २०१७ ते एप्रिल २०१७ या काळात १५ लाख कामगारांच्या नोकऱ्या गेल्या असा निष्कर्ष काढला. हे कामगार बहुतेक अति लघु उद्योग, लघु आणि मध्य उद्योगांधमील होते. त्याचप्रमाणे आयटी क्षेत्रातील बऱ्याच कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. हे झाले नोकरकपात झालेल्या कामगार यांचे दु:ख, परंतु भारताच्या प्रचंड लोकसंख्येत तरुण पिढीची संख्या खूप मोठी आहे. दरवर्षी अनेक तरुण-तरुणी शिक्षण पूर्ण करुनबाहेर पडत असतात. यामध्ये पदवीधारकांप्रमाणेच, उच्चशिक्षित विद्यार्थी पण असतात. उच्च पदव्या घेतलेल्या विद्यार्थ्यांना जेव्हा नोकऱ्या मिळत नाहीत तेव्हा ते हताश होतात. अशा परिस्थितीत नोकरी शोधून हताश झालेला तरुण समाजासाठी घातक ठरु कशतो. शिक्षण पूर्ण

करुन बाहेर पडलेल्या मुलांना नोकरी मिळत नाही तोच खऱ्या अर्थाने बेरोजगार समजला पाहिजे.

भारतात बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओडिशा, झारखंड आणि उत्तर भारतातील पहाडी राज्यांमधील तरुणांमध्ये बेरोजगारीचा प्रश्न फार भीषण झाला आहे. या राज्यांमध्ये तरुणांची संख्या भरपूर आहे. उद्योगधंदा काढण्यासारखी आर्थिक परिस्थिती नसते. लहान-सहान नोकरी सुध्दा मिळत नाही. अशा परिस्थितीत ही मुले गुन्हेगारी क्षेत्राकडे सहज वळू शकतात. असा निष्कर्ष एका समाजशास्त्रीय सर्व्हेतून निघाला आहे. उत्पादन कृषी आणि सेवा या तीन क्षेत्रात रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ शकते. सध्या कृषी क्षेत्राची स्थिती खालावली आहे. सेवा क्षेत्र काही प्रमाणात विस्तारत आहे. तर उत्पादन क्षेत्र हळूहळू जम बसवू पहात आहे, परंतु वस्तुस्थिती अशी आहे की मेक-इन-इंडिया सारखी महत्वाकांक्षी घोषणा झाल्यानंतरही सुध्दा उत्पादन क्षेत्रात प्रगती झाली. या योजनेचे पुढे काय कितपत प्रगती झाली याची आकडेवारी स्पष्ट नाही. मेक-इन-इंडिया, 'स्टार्ट-अप-इंडिया' 'स्किन इंडिया यासारख्या चांगल्या योजना कागदावरच राहिल्या. त्यामुळे उत्पादन क्षेत्रात रोजगार निर्मिती कागदावरच राहिल्या. त्यामुळे उत्पादन क्षेत्रात रोजगार निर्मिती होऊ शकली नाही.

इंजिनीअरिंगचे शिक्षण घेऊन बाहरे पडलेल्या तरुणांची संख्या भारतात दरवर्षी ८ ते ९ लाख इंनिनीअर्स शिक्षण घेऊन बाहेर पडत असतात. यामधील ६० ते ६५% इंजिनीअर्सना नोकऱ्यामिळत नाहीत. हा निष्कर्ष 'ऑल इंडिया कॉन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन' ने काढला आहे. यामध्ये या सर्व्हेप्रमाणे भारतात अभियांत्रिकी कॉलेजची संख्या अंदाजे ६५० ते ७०० पर्यंत आहे. सर्वच अभियांत्रिक शिक्षण संस्था दर्जेदार किंवा मान्यताप्राप्त नसतात. दर्जेदार आणि चांगल्या स्वायत्त शिक्षण संस्थामधून बाहेर पडलेल्या इंजिनीअर मुलांना चांगल्या नोकरीची उपलब्धता होऊ शकते. सॉफ्टवेअर सेक्टरमध्ये फक्त १८.४३% इंजिनीअर्सना नोकऱ्या मिळू शकतात. तर ३.८४% टेक्निकल आणि मेकॅनिकल इंजिनीअर्सना नोकऱ्या मिळू शकतात. म्हणजेच या सर्व्हेप्रमाणे ७०% इंजिनीअर हे थेट नोकरीत घेण्याच्या पात्रतेचे नसतात.

त्याचप्रमाणे देशात रोजगारांची कमतरता असल्याचे नीती आयोगाच्या कृती आराखड्यात म्हटले आहे. काम केले जाते आणि त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. पुढे उत्पादन कमी म्हणून रोजगार कमी हे चक्र सुरु राहते. सध्या भारतात अशी स्थिती आहे की उच्चशिक्षित मुलांना एक तर रोजगार मिळत नाही किंवा त्यांच्या पात्रतेचे काम मिळत नाही. तर लाखो अकुशल, मुलांना रोजगारासाठी वणवण करावी लागते. 'मेक-इन-इंडिया' ही योजना चांगली आणि महत्वाकांक्षी होती. पण सरकारचे नियोजन आणि पूर्वतयारी नसल्यामुळे ही घोषणा लाखो तरुणांचे फक्त स्वप्नच ठरुन गेली. 'स्किल इंडिया' सारखी चांगली योजना सुरु करुनही कुशल कामगार निर्मिती सरकार करु शकत नाही. ही योजना सुध्दा फोल ठरली.

सत्तेवर आल्यावर दरवर्षी १ कोटी रोजगार निर्मितीचे आश्वासन पंतप्रधान मोदींनी युवकांना दिले होते. परंतु त्या आश्वासनाची पुर्तता न झाल्याने युवा पिढी वैफल्यग्रस्त झाली आहे. हे वास्तव सरकारला नाकारता येणार नाही !

**निसाळ रेवती**
एस.वाय.बी.एस्सी.

## आई

आई म्हणजे मंदिराचा
उंच कळस,
आई म्हणजे
अंगणातील पवित्र तुळस,
आई म्हणजे भजनात
गुणगुणावी अशी संतवाणी,
आई म्हणजे वाळवंटात
प्यावे असे थंड पाणी ...

# महाराष्ट्रातील दारिद्र्याची कहाणी



ही सुमारे २० ते २५ वर्षापूर्वी घडलेली गोष्ट आहे. जपानचा अभ्यासक महाराष्ट्रातल्या खेडे गावातल्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास आणि निरीक्षण करण्यासाठी महाराष्ट्रात आला होता. ते दिवस उन्हाळ्याचे होते आणि त्याने आपल्या पाण्यासाठी दुष्काळी भागातील १० ते १२ गावांची निवड केली होती. मग एका दुपारी तो महाराष्ट्रातल्या काही प्रशयासकीय अधिकाऱ्यांसोबत एका खेडेगावात पोहचला. रणरणत ऊन आजूबाजूला पसरलेलं उजाड रखरखीत माळरान आणि खाच खळगे आणि धुळीनं भरलेला रस्ता गचकी खात तो त्या खेडेगावात पोहचला रस्त्यात अशा परिस्थितीत ही तो जपानी अभ्यासक आपल्या मोडक्या तोडक्या इंग्रजीत महाराष्ट्रातल्या अधिकाऱ्यांना बरेच प्रश्न कुतुहलाने विचारात होता. आणि आपल्या वहीत बऱ्याच नोंदी लिहित होता. महाराष्ट्रातले तरुण प्रशासकीय अधिकारीसुध्दा मोठ्या उत्साहानं त्याच्या प्रश्नांना सविस्तरपणे उत्तरं देत होते. ते जेव्हा गावात पोहचले तेव्हा भर दुपारची वेळ होती आणि गावात उन्हामुळे शुकशुकाट होता. गावाच्या आसपास असलेले कचऱ्याचे ढीग आणि उघड्या गटारी पाहून त्या जपानी माणसानं आपल्या नकाला रुमालच लावला. त्या गावाच्या मध्यभागी एक वडाच मोठ झाडही हात आणि त्याच्या भोवती एक चबुतरा बांधला होता. त्या भागात मंदीराच्या आसपास सावलीमध्ये गावातली जवळपास ३० ते ४० माणसं वेगवेगळ्या गटांमध्ये बसलेली होती. त्या लोकांपैकी बरेच जण निव्वळ शांतपणे गप्पा मारत होते.

५-६ जण झाडाखालच्या सावलीत पोत अंथरुण शांत झोपलेले होते. हे दृश्यपाहून त्या जपानी माणसाला आश्चर्याचा धक्काच बसला. त्यानं दुपारच्या वेळी तरुणांना निवांत बसलेलं कधीच पाहिलेलं नव्हत. मोठ्या कुतुहलाने महाराष्ट्रातल्या प्रशासकीय अधिकाऱ्याला विचारल ही तर दिवसाची वेळ आहे आणि हे इतके सारे तरुण लोक निवांत आणि रिकाम्या हातांनी का बसली आहेत. मग प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्याला उत्तर दिलं. संध्या शेतातली काम संपली आहेत. रोजगराच्या काही मोठ्या संधी उपलब्ध नाहीत म्हणून ती आपला वेळ व्यतित करत आहेत. या उत्तरावर तो जपानी अभ्यासक शांत बसला त्या जपानी अभ्यासकान तिथून १ ते दीड तास बसून त्याचं सूक्ष्म निरीक्षण केलं. त्यानंतरचे पुढचे १०-१२ दिवस तो जपानी अधिकारी त्या दुष्काळी भागात महाराष्ट्रायीन अधिकाऱ्यासोबत फिरत होता. त्या भागातल्या प्रत्येक गावामध्ये त्याला कमी जास्त फरकानं हेच चित्र दिसले. गावात असणारे कचऱ्याचे ढीग, उघडी गटारं, मोकळी फिरणारी डुकरं, आणि गाढवासारखी जनावर, डोक्यावरुन दुरवर पाणी वाहणाऱ्या स्त्रिया प्रत्येक गावात जवळपास हीच परिस्थिती होती. तो जपानी अभ्यासक त्याच्या साध्या आणि मनमिळावू स्वभावामुळे महाराष्ट्रातल्या अधिकाऱ्यांचा चांगला मित्र बनला होता. शेवटी महाराष्ट्रातल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्या जपानी अभ्यासकाला एक कुतुहल म्हणून विचारलं ''मग कस वाटलं तुम्हांला या भागात फिरुन'' हा भाग फारच दुर्देवी आहे. निसर्गाची अवकृपा आहे. या भागात काहीच मोठे उद्योगधंदे नसल्यामुळे कायमच्या रोजगाराच्या संधी ही नाहीत यामुळे या भागात प्रचंड गरिबी आढळते. ती कोरडवाहू आणि पावसाच्याच पाण्यावर अवलंबून आहे.

जेमतेम पोट भरेल एवढच उत्पन्न या भागात होत होंत, पिण्याच्या पाण्याच्या समस्या, रस्त्याच्या समस्या, आरोग्याच्या समस्या, शिक्षणाच्या समस्या इथ आहेत. सरकारकडे मर्यादित साधनसंपत्ती असल्यामुळे इच्छा असूनही काहीच करता येत नाही. यावर तो जपानी अभ्यासक थोडा वेळ शांत राहिला आणि नंतर म्हणाला हे तुमच म्हणणं खरं आहे की हा भाग आणि इथली लोक दुर्देवी आहेत. पण हे दुर्देव या लोकांनी स्वत:च निर्माण केलं आहे. आम्ही जपानमध्ये सर्वसाधारणत: रोज १२ ते १८ तास काम करतो. आमच्या कडे नैसर्गिक समस्यांची कमतरता बिलकुल नाही. सारखे भूकंप होतात, चक्रीवादळामुळे आमच्या किनारी भागांच दरवर्षी प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान होत. पण यामुळे आम्ही कायम खचून जात नाही. दुसऱ्या महायुद्धात आमचा देश राखरांगोळी झाला.प्रत्येक घरातला एक तरी कमावता माणूस त्या युद्धात कामी आला होता. पण प्रत्येकानं कठोर मेहनत करुन जपान पुन्हा उभा केला. शेतीसाठी फारशी अनुकुल परिस्थिती नसली तरी आम्ही उत्तम शेती करतो. शेतीला जोडधंदा म्हणून कमी शिकलेली माणसं खोल समुद्रात जाऊन मासेमारी करतात. आमच्याकडे प्रत्येक जण रात्रंदिवस कामात मग्न असतो. इथं मी पाहिलं. प्रत्येक गावात कचऱ्याचे ढिग आहेत. ती रिकामी असणारी, पत्ते कुटणारी, गप्पा मारणारी आणि लोळत असणारी माणसं एकत्र येऊन आपल्याच गावातील कचरा गोळा करु शकत नाही. भटक्या जनावरांच्या आणि उघड्या गटारांचा बंदोबस्त का करु शकत नाही. इतक्या छोट्या आणि साध्या गोष्टींसाठी ती सरकारवरच का अवलंबून असतात. इतक्या साऱ्या माणसांना संपूर्ण गाव स्वच्छ, सुंदर करायला फार तर १० ते १२ दिवस लागतील इथ तर इतका कडकडीत दुष्काळ आहे. सावलीलाही इथं झाड नाही. आजही लोक आपल्या पूर्वजांनी लावलेल्या झाडाच्या सावलीत बसतांना पुढच्या पिढीसाठी एकही झाड का लावू शकत नाही. आमच्याकडे गुर चारणारी माणस ही गुर चरायला घेऊन जाताना घड्याळायाचे सुट्टे भाग, कॅमेऱ्याचे सुट्टे भाग असलेली एक पिशवी सोबत घेऊन जातात. गुर चरत असताना मिळणाऱ्या निवांत वेळात आमचे जपानी गुराखी उपकरणांचे सुट्टे भाग एकत्र करुन उपकरण तयार करण्याचा जोडधंदा करतात. जपानचा प्रत्येक नागरिक जपानला कुठल्यानं कुठल्या अंगान समृध्द आणि संपन्नशाली करण्यासाठी सतत झटत असतो. पण इथले लोक मात्र मला फक्त सरकारी मदतीकडे लक्ष ठेवून असलेले दिसले. इतके सारे तरुण लोक असे का हात धरुन बसण्यापेक्षा आपल्या स्थानिक समस्यांना हात घालून एकत्र येऊन कठोर मेहनत करुन स्वत:च्या अनेक प्रश्नांच समाधान शोधू शकतात. आरोग्य, पाणी, विज, रस्ता, शिक्षण इ. मुलभूत समस्यांवर जीवन समृध्द करु शकतात. रोजगाराच्या संधी इथंही निर्माण करु शकतात. मित्रांनो त्या जपानी अभ्यासकानं २५ ते ३५ वर्षांपूर्वी व्यक्त केललं मत आजही खर वाटत.

**पाडळकर रेश्मा**
टी.वाय.बी.ए.

# माझा आवडता साहित्यिक : केशवसूत



आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे एक श्रेष्ठ कवी पूर्ण नाव कृष्णाजी केशव दामले काव्यरत्नावली याच्या सूचनेवरुन 'केशवसूत' या टोपण नावाचा स्वीकार केला. जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुड ह्या गावी. शिक्षण खेड, बडोदे, वर्धा, नागपूर व पुणे या ठिकाणी शिक्षणकालातच १९८० मध्ये त्यांचा विवाह झाला. महिकनंतर (१८८९) मुंबईत १८९७ पर्यंत निरनिराळ्या हंगामी नोकऱ्या केल्या. पुढे प्लेगमुळे मुंबई सोडून ते खानदेशात गेले. आरंभी माडगावच्या नगरपालिकेच्या शाळेत दुय्यम शिक्षकाची नोकरी केली. १९०१ पासुन फैजपूरला मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. १९०४ मध्ये धारवाडच्या सरकारी शाळेत मराठीचे शिक्षक म्हणून बदली झाली. १९०४ साली कुबंळीला गेले असताना प्लेगने त्यांचे निधन झाले. त्यांच्यामागून आठच दिवसांनी त्यांची पत्नीही मरण पावली.

केशवसुतांनी विद्यार्थीदशेतच काव्यलेखनास आरंभ केला असला तरी त्यांचा मुख्यकाव्यरचनाकाल १८८५ ते १९०५ हाच होय. या काळातील त्यांच्या सु. १३५ कविता आज उपलब्ध आहेत. नागपूरात असताना रेव्ह. टिळक व कवी वसंत यांचा सहवास त्यांना लाभला होता. काव्य हे त्यांचे जीवनध्येय असल्याने स्वाभाविकपणेच त्यांनी काव्यरचनेच्या नव्या वाटा चोखाळल्या या प्रयत्नात प्रारंभीच्या संस्कृत काव्याच्या आदर्श अल्पकालीन ठरला व पूर्वकालीन मराठी काव्य प्रभाव शून्य ठरले. परंतु इंग्रजीतील स्वच्छंतावादी मनोवृत्तीच्या वर्डस्वर्थ शैली आणि कीटस यासांरख्या कवींचे काव्य मात्र त्यांना प्रेरक व अनुकरणीय वाटले. इंग्रजी अभ्यासक्रमातून व वि.मो.महाजीनींनी विविधज्ञानविस्तारातून प्रकाशित केलेल्या भाषांतरांवरुन इंग्रजी स्वच्छंदतावादी काव्य त्यास काहीसे परिचित झाले होते. त्या काव्याच्या चिंतन मननातून केशवसुतांनी आत्मलेखनात्मक स्फुट भावकविता लिहिली व मराठी कवितेला इंग्रजी काव्यातील आत्मविष्कारांचे नवे व क्रांतिकारक वळण दिले. त्यांच्याकाव्यात व्यक्तिगत स्नेहसंबंध सामाजिक बंडखोरी व गूढ (साक्षात्कारी) अनुभूती अशा विविध विषयांवरील भावानुभवांचा अविष्कार आढळतो. एका दृष्टीने स्वच्छंदतावादी मनोवृत्तीचाच विविध रुपांनी झालेला हा अविष्कार मराठी काव्यक्षेत्रात निश्चितच क्रांतिकारक ठरला ; म्हणूनच केशव सुतांच्या संस्थेने अल्प असलेल्या प्रत्येक प्रकारच्या काव्यरचनेला नंतरच्या काळात प्रकारच्याकाव्यावरच नेला नंतरच्या काळात स्वतंत्र परंपरा लाभू शकली.

नवीनकाव्याबरोबरच काव्यविषयक नवा दृष्टिकोन व नवी अभिरुची निर्माण करण्याची जबाबदारी नव्या कवींवर पडते. केशवसुतांनी अशा जबाबदारीने लिहिलेल्या कवितांपैकी, स्फुर्ति (१८९८), कवितेचे प्रयोजन (१८९९), आम्ही कोण ? (१९०१) आणि प्रतिभा (१९०४) या महत्वाच्या आहेत. त्या एक मानवी जीवनाच्या संदर्भात कवी व कवित्व याच्या कार्याची आदर्शवादी भूमिका केवशसूतांनी मांडलेली असल्यामुळे त्या भूमिकेत चितंरतन प्रेरकता जाणवते. त्यांच्या निसर्गविषयक कवितांवर वर्डस्वर्थ व एमर्सन यांच्या विचारांचा परिणाम झालेला दिसतो. सृष्टीतील सौंदर्य काव्याला प्रेरक मानवी जीवनातील विषमतेचा अभाव असल्याने निसर्ग सहवास सुखद ठरतो. अशा दृष्टीने केशवसुत निसर्गाकडे बघतात. भृंग (१८९०) पुष्पा प्रत (१८९२) व फुलपाखरु (१९००) या त्यांच्या काही महत्वाच्या निसर्गकविता होत. प्रेमविषयक आत्मनिवेदन करणाऱ्या कविताही केशवसुतांनी लिहिल्या क्रांतिकारक सामाजिक विचार ओजस्वीपणे व्यक्त करणाऱ्या त्यांच्या प्रसिध्द कविता

म्हणजे 'तुतारी (१८९३), नवा शिपाई (१८९८) व गोफण केली छान (१९०५) या होत. त्यांच्या सामाजिक विचारसरणीची मुख्यत्वे स्वातंत्र्य, समता, बंधुता व विशाल, मानवतावाद ही आहेत. विशेष म्हणजे पृथ्वीला, सुरलोक साम्य प्राप्त करुन देण्याचे एक महान स्वप्न त्यांच्या क्रांतदर्श प्रतिभेने पाहिले होते. त्याचाही निर्देश त्याच्या काही कवितांतून आढळतो. गूढ अनुभूती व तिची नावीन्यपूर्ण अभिव्यक्ती असलेली झंपूर्झा (१८९३) ही त्यांची कविता विशेष गाजली. त्यांच्या अन्य 'गुढगुंजनात्मक कवितांत' 'म्हतारी' (१९०९) व 'हरपले श्रेय' (१९०५) यांचा समावेश होतो. शैलीच्या दृष्टीने केशवसुतांच्या काव्यात ललित्य कमी आहे. पण काहीशी राकट आणि रांगडी अभिव्यक्ती त्यांच्या काव्यप्रकृतीशी सुसंगत ठरते.

केशवसुतांनी काव्याच्या बाध्यांतही परिवर्तन घडवून आणले. काव्याची खरी प्रकृती कथनाची व वर्णनाची नसुन आत्मलेखनाची आहे. असे आत्मलेखन एकेका उत्कट अनुभूतीचे असते व म्हणून ते 'स्फुट' स्वरुपाचे ठरते ; अशा स्फुट अविष्कारासाठी गणवृत्तापेक्षा मात्रवृत्तेचा अधिक अनुकूल असतात, हे सर्व त्यांनी दाखवून दिले. इंग्रजी काव्यातील सुनीत हा छंद : प्रकार त्यांनी मराठीत प्रथमच रुढ केला. शिवाय काही नवीन मात्रावृत्तेही त्यांनी प्रचलित केली. आयुष्याच्या शेवटीशेवटी आपली काव्यशक्ती नष्ट झाल्याची जाणीव त्यास झाली होती. असे त्यांच्या एका पत्रावरुन वाटते. काव्याशिवाय एक गद्य नाटकही त्यांनी लिहिले होते. पण ते अप्रसिध्द आहे. काही इंग्रजी कविताही त्यांनी रचल्या होत्या.

केशवसुतांचा काव्यसंग्रह त्यांच्या मृत्यूनंतर हरि नारायण आपटे यांनी १९१६ मध्ये प्रकाशित केला. गोविंदाग्रज, बालकवी, रेंदाळकर, सोनाळकर, काव्यविहारी यांसारखे कवी स्वत:ला केशवसुतांचे शिष्य म्हणवून घेतात मंडळ या नावाचे एक मंडळही स्थापन झाले होते. केशव सुत हे आधुनिक मराठीतील सर्वात जास्त वादग्रस्त कवी आहेत. त्यांचे कवित्व, कवीपण, काही दृष्टिकोन, काही कविता, क्रांतिकारकत्व व श्रेष्ठत्व हे सर्वच वादाचे विषय ठरले. एकांगी समीक्षेने पुष्कळदा अशा वादांचा जन्म होतो. ही वादग्रस्तता केशवसुतांनंतरच्या गेल्या सत्तर ऐंशी वर्षात आधुनिक मराठी काव्यात कितीतरी परिवर्तने व प्रयोग झाले. तथापि केशवसुतांच्या काव्याची प्रेरकता व महत्व ही कायमच राहिली महाराष्ट्र शासनातर्फे १९६६ मध्ये केशवसुतांची जन्म शताब्दी साजरी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने केशवसुतांच्या काव्यसंग्रहाच्या हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती १९६७ मध्ये प्रकाशित केली.

आधुनिक कवितेचे जनक केशवसुत मानवतेची ज्याच्या वाणीवृत्तीत रुजलेली होती ते केशवसुत होय.

कवी केशवसुतांचे स्मारक म्हणून या घराला आज वेगळे महत्व आले आहे. गणपतीपुळे येथे दररोज हजारो लोक येतात. त्यातील मोजकीच माणसे मालगुंडला भेट देतात. वास्तू कशी आहे. त्यापेक्षा त्या वास्तुत वास्तव्य कोणी केले हेच महत्वाचे केशवसुतांचे हे जन्मस्थान वैशिष्ट्यपूर्णच आहे. खरे तर कोकणातील इतर अनेक घरांसारखेच वाटणारे हे घर अगदी वेगळे आहे. पाच खोल्यांची ही वास्तू जांभ्या दगडाची असून साग लाकडाचे, कौलारु छप्पर असलेला प्रशस्त दोन्ही अंगास बिलगलेली लंबाकृती पडवी, प्रशस्त ओटी, कोनाडी, खुर्ची, आरामखुर्ची, ओटीच्या पायालगतचे नक्षीदार खांब कवी केशवसुतांची प्रतिमा नवा शिपाई आणि इतर कविता, तत्कालीन वस्तुचे प्रदर्शन – पिंकदानी, चरखा, डेस्क, दौत टाक इ. कालबाह्य झालेल्या वस्तू आजही तेथे पहावयास मिळतात. या वास्तूचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे आज घरात उजव्या हातास असलेली केशवसुतांची जन्मखोली आकाराने लांब, एकच कोनाडा, लहान खिडकी असलेली उबदार खोली पाहताना या खोलीत जन्मलेल्या बालकाने १९ व्या शतकाच्या उबंरठ्यावर उत्तमोत्तम कविता लिहून केलेली क्रांती आठवल्या वाचून राहत नाही.

केशवसुतांच्या या वास्तूमागचे 'स्मृतिदालन' दिसते येथे प्रवेश करताच केशवसुतांच्या सततचे बोल, झपुर्झा, संध्याकाळ, तुतारी इ. अजरामर काव्यशिल्पे दृष्टीस पडतात. वृक्ष लावणारे निघोनिया जाती, तळी विसावती, सात थोर या उक्तीप्रमाणे कवी केशवसुतांना आधुनिक कवितेचे जनक का मानले जाते ? त्या आधी कविता लिहिली गेली नव्हती का ?

या प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कवी केशवसुतांनी एकुण १३२ कविता लिहिल्या त्यांच्याहयातीत हाताच्याबोटांवर मोजता येतील. एवढ्याच कविता प्रकाशित झाल्या त्याच्या मृत्यूनंतर 'केशवसुतांची' कविता हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. सौदयवादी दृष्टिकोन, कौटुंबिक जिव्हाळा, निसर्ग कविता, राष्ट्रभक्ती, अनुभव विश्वावर आधारित कविता हे त्यांच्या काव्याचे विशेष, स्त्री–पुरुष समानता, राष्ट्रीय एकात्मता, सर्व धर्म – समभाव व संवेदन शीलता इ. मूल्ये आधीच त्यांच्या कवितेतून उत्कटपणे साकारलेली होती. स्त्रीला त्यांनी सन्मानतेची वागणूक दिलीच आणि पूर्ण वैचारिक निर्णय स्वातंत्र्यही दिले नात्यात कधी व्यवहार येऊ दिला नाही. हेही विशेषच न्यू इंग्लिश स्कूलमध्ये १८८४ ला त्यांनीदाखल केले. तेव्हा देशभक्त बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर शिक्षक असलेलीही शाळा आहे.याची त्यांना कल्पनाही नव्हती मात्र देशसेवेचे बाळकडू इथेच त्यांना मिळाले. म्हणूनच 'एक तुतारी द्या मज आणून', फुंकीन मी जी स्व प्राणाने भेदून टाकीन सगळी गगने अशी कविता ते लिहू शकले. मराठी इंग्रजी आणि संस्कृत भाषेचा अभ्यास चांगला असला तरी गणिताचे अगदी वावडे म्हणून तिसऱ्या प्रयत्नात वयाच्या २३ वर्षी मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास झाले आणि आपले औपचारिक शिक्षण थांबवून त्यांनी जीवनाच्या शाळेत त्यांनी प्रवेश घेतला. आपल्या चरितार्थासाठी उत्पन्नाची साधने निर्माण केली.

केशवसुतांच्या स्मारकाच्या दृष्टीने काही घडले नव्हते. १९९० साली रत्नागिरी येथे चौसष्टावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले अध्यक्षस्थानी मधू मंगेश कर्णिक यांची निवड झाली होती त्यांनी संमेलनाच्या समारोपाच्या भाषणात केशवसुत स्मारकाची कल्पना मांडली स्मारकासाठी आर्थिक सहाय्य करण्याचे आवाहन त्या सभेतील श्रोत्यांना केले. ८ मे १९९८ रोजी या स्मारकाचे कविवर्य कुसुमाग्रज यांच्या शुभ हस्ते उद्घाटन करण्यात येऊन ते महाराष्ट्राला अर्पण करण्यात आले.

७ नोव्हेंबरमध्ये प्लेगच्या साथीने वयाच्या ३९ व्या वर्षी केशवसुत यांचा बळी घेतला तरीही त्यांच्या कवितांमुळे ते जनमाणसात रसिकमनावर अधिराज्य गाजवत राहिले कवीचे थोरवी त्यांनी स्वत:च्या तर सांगितली.

**'आम्हाला वगळा – गत प्रथ**
**क्षणी होती तारांगणे,**
**आम्हाला वगळा – विकेल**
**कवडीमोलावरी हे जिणे !'**

**मुटकुळे अश्विनी**
एस.वाय.बी.ए.

## आईची माया...

आईच्या मायेत
बाबांच्या छायेत
भावंडाच्या भांडणात
Music वाजत...
लोकांच्या गर्दीत
मनाच्या गाभाऱ्यात
आपुलकीच्या थंडीत
Music वाजत...
पक्षांच्या किलबिलात
झाडांच्या डोलण्यात,
नदीच्या खळखळण्यात
Music वाजत...
ज्ञानाच्या मंदीरात
देवांच्या शरणात
माणसांच्या आनंदात
Music वाजत...

**साक्षी कासार**
तृतीय वर्ष कला

# शेतकऱ्याचे आत्मवृत्त



''लोकहो मी एक अल्पभूधारक शेतकरी आहे'' मी या भूमीचा पुत्र आहे. ही माती माझी आई आहे. वर्षानुवर्षे शेतात खपून घाम गाळून मी धान्य पिकवतो. मी तुम्हा सर्वाचा नम्र सेवक आहे. आज मी तुमच्यापाशी माझे मनोगत व्यक्त करणार आहे.

आपला हा देश कृषिप्रधान आहे. कसेल त्याची जमीन असा कायदा झाला. हेतू हा की, शेतात राबणारा शेतकरी जमिनीचा खऱ्या अर्थाने मालक व्हावा. शेतकऱ्यांची सावकाराकडून होणारी पिळवणूक बंद करण्यात आली व बँकामार्फत शेतकऱ्यांना मदत देऊ करण्यात आली. या साऱ्या गोष्टींचा गाजावाजा भरपूर झाला. पण सामान्य शेतकऱ्यापर्यंत या साऱ्या योजना खरोखरीच पोहोचल्या आहेत का ? याची कुणी कधी खात्री घेतली आहे का ? त्यातच निसर्गाचा लहरीपणा, कधी अवर्षण तर कधी अतिवर्षाव.

हल्ली खेडेगावातून धनदांडग्यांचा म्हणजेच सधन शेतकऱ्यांचा एक नवा वर्ग निर्माण झाला आहे. सारे फायदे हा वर्ग गिळंकृत करीत आहे. हेच लोक वेगवेगळ्या क्लुप्त्या लढूवन सरकारी सोयीसुविधा मिळवतात. मानसन्मान पटकावतात आणि गरिब शेतकऱ्यांवर अन्याय करतात. त्यामुळे धनिक शेतकरी अधिक श्रीमंत होत आहेत. तर गरीब शेतकरी हा अधिकच कंगाल जीवन जगत आहे. गरीब शेतकऱ्याने पिकवलेल्या मालाला काही वेळा योग्य भाव येत नाही. मग कर्जफेड कशी करणार ? हप्त्यांचा तगादा लागतो. शेवटी काहीजण आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात, कर्जबळी ठरतात.

स्वत:चे शेत नसलेल्या मजूराचे हाल तर विचारुच नका. त्याला धड मजूरीदेखील दिली जात नाही. त्याला वेठ बिगारासारखे राबवून घेतले जाते. पावसाळ्यात हे शेतमजूर कसे जगतात, याचा तुम्ही कधी विचार केला आहे ? सारे राष्ट्र ज्यांच्या कष्टावर जगते तो गरीब शेतकरी उपाशी आहे याची कोणास कल्पनाही नसेल.

या सामान्य शेकऱ्याकडे व शेतमुंजुरांकडे सरकारने तसेच शहरी नागरिकांनी देखील लक्ष देणे आवश्यक आहे. खरे भूमिपूत्र असलेले आम्ही गरीब आहोत. स्वतंत्र्य भारताचे नागरिक म्हणून आम्हांलाही मानाने जगू द्या. जय जवान, जय किसान ही घोषणा सार्थ होण्यासाठी योग्य असे जीवन आम्हा सामान्य किसानांना लाभू द्या. एवढीच आमची मागणी आहे.

**बोरुडे दिपक**
एस.वाय.बी.ए.

# स्वप्नपूर्ती ...

स्वप्नांच्या पूर्तीसाठी
प्रयत्नांची माळ हवी
प्रत्येक संकटाला भिडण्यासाठी
जिद्द हवी
मनात गोंधळ आला तरी
जगण्याची आस हवी
इंद्रधनुषी आयुष्य आपल
सात रंगात रंगु द्या
हसता हसता दु:ख विसरण्याची
कला हवी
माणसाला माणूस ओळखण्यासाठी नजर हवी,
प्रत्येक नात्यात एक चूकीची माळ हवी

**बोरुडे दिपक**
द्वितीय वर्ष कला

# नाती हरवत चाललेला समाज

मनुजातीच्या अस्तित्वाचा प्रश्न म्हणजे नाते. प्रश्न असा आहे की, नात्यांनाच आता तडा जातो की काय ? बदलत्या जीवन प्रणालीत हा जीवघेणा प्रश्न उपस्थित झाला आहे. भूतलावर सर्व गोष्टी निर्माण करताना देवाने माणूस देखील निर्मिला, आणि या मानवाला सगळ्या प्राणीमांत्रापेक्षा कुशाग्र बुध्दिमत्ता असलेला मेंदूदेखील दिला. आपण २१ व्या शतकात प्रवेश केला आणि गेल्या दशकापासून ते आत्तापर्यंत आम्ही आमचा दैदिप्यमान विकास केलेला आहे. पण हा विकास होत असताना खरंच या माणसाला माणूस पण राहिलंय का ? हा प्रश्न मनामध्ये मात्र थैमान घालू लागला आहे. सध्याच्या धकाधकीच्या जवीनशैलीत माणसांमधील नात्याचे दोर तुटत चाललेत. एकाच छताखाली रहाणारी माणसे आता घरातल्याच माणसांच्या सहवासाला पारखी झाली आहेत. मी आणि माझे एवढच जगणे त्यांना कळत आहे. प्रत्येक जण स्वत:चाच विचार करत आहे.

अमानुष कृत्यांच दर्शन आपल्याला वृत्तपत्र व वेगवेगळ्या माध्यमातून जेव्हा डोळ्यांसमोर येत तेव्हा अस्वस्थ होऊन जाते. समाजात वृध्द आजी-आजोबांना नातू मारत आहेत, तर कुठे जातीमातीच्या तणावर हत्या होत आहेत. भावाभावांमध्ये भांडणे होत आहेत. पती-पत्नीच वाद आहेत. ऐवढेच नाही तर या समाजामध्ये आता बलात्कारासारखं निंदनीय कृत्य होताना दिसत. ही मुलगी कोणाची तरी बहीण असेल हा विचार तर करण माणसांनी सोडूनच दिल्यासारख वाटतय. कोण कुणाची बहीण आणि कोण कुणाचा भाऊ अशीह त्यांची विचारसरणी झाली आहे. स्त्रियांवरील वाढत चाललेले अत्याचार. माणुसकीच्या नावाला काळीमा फासणाऱ्या या सर्व गोष्टी कधी थांबणार आहेत ? म्हणून आजची स्त्री अबला की सबला हा प्रश्नदेखील निरुत्तरीत आहे. प्रत्येक माणूस विचारी असतो. माणसाला मेंदू असतो अन् त्या मेंदूत अक्कल ही असतेच. पण त्या अकलेचं आज खोबरं झालेल आहे.

त्यामुळे या समाजात या गोड नात्यांमध्ये जिव्हाळ्यापेक्षा एकमेकांकडून वाढलेल्या अपेक्षा यामुळे घरातील संवादाची जागा विसंवादाने घेतली आहे. म्हणून या नात्यांमध्ये चिडचिड, अहंकार, हेवेदावे, मतभिन्नता वाढतेय आणि दिवसेंदिवस हे नात अधिक नाजूक होत चाललय. नात हे अनेक प्रकारच असत. आणि या नात्यांमध्ये जगातील सर्वांत श्रेष्ठ आणि अतिशय सुंदर नात म्हणजे आई-बाबा आणि मुल यांतील नात. हे नात काही वेगळच आहे. या नात्याला तोड नाही. पण सध्याच्या धकाधकीच्या काळात हे नात टिकवायला मात्र आज वेळ नाही.

'शब्द आहे उरी अनेक, तरी ही राही सदा अबोल'. अस दृश्य काही कुटुंबामध्ये आई-बाबा आणि मुलांच्या नात्यांमध्ये आढळून येत. आजकाल शहरांमध्ये मूल शाळेत, कॉलेजमध्ये, नोकरीमध्ये व्यस्त असतात. म्हणून आई-बाबा व मुल यांच्यातील जवळीकता, संवाद कमी होताना दिसतोय. यामुळे मग मनात गैरसमज निर्माण होऊन जिव्हाळा कमी होऊ लागतो. हा जिव्हाळा टिकवून ठेवण्यासाठी आणि नात अधिक घट्ट होण्यासाठी सर्वांत महत्वाच म्हणजे आपुलकी, विश्वास, सौम्य, संवाद आणि आदर या गोष्टी आल्याच पाहिजेत. नात्यांमध्ये विचारांची देवाण-घेवाण महत्वाची असते. नात अबोल झाल असेल तर या नात्याला शब्दांची जोड महत्वाची ठरते. तसेच नात्यातील प्रेम आणि एकमेकांच महत्व किती थोर आहे हे समजण गरजेच आहे.

पूर्वी प्रेम, जिव्हाळा, आपुलकी असलेल्या माणसांच्या पालक व मुलांच्या गोड नात्यात वाद, तिरस्कार या गोष्टी याही होत्या. पण आजच्या घडीला त्याच प्रमाण संतुलित ठेवून हे नात अधिक कस फुलवता येईल हेच कौशल्य आत्मसात करण्याची गरज आहे. आता काळानुसार खूप बदल होत गेलेत. पूर्वीचे विचार आणि आत्ताच्या काळातील विचार यांमध्ये जमीन आस्मानाचा फरक झाला आहे.

एकविसाव्या शतकातील हे आधुनिक जीवन फक्त माणसांच्या जीवन शैलीवरच नव्हे तर माणसांच्या आपापसातील नात्यांवर देखील परिणाम करतय. मैत्रीपूर्ण नात्यात आजकाल दुरावा येत असल्याच दिसतय. यात फक्त अपेक्षांच ओझ आहे. प्रेम-माया अजिबात नाही. मुलही

आपेक्षाच ओझ वाहताना थकतात. ताणतणावाला सामोरी जातात त्यातूनच नैराश्य घेऊन नश्या करण, चिडचिड करण, दिवसभर गेमच्या दुनियते रमण हे खूप जास्त चालत. कधीतरी सुट्टीत एकत्र फिरायला जाण. घरातील छोटे–मोठे निर्णय एकत्र घेण आणि त्याचबरोबर एकमेकांच्या अपेक्षा कमी केल्या तर नात्यात नक्कीच गोडवा येईल. प्रेम जिव्हाळा वाढेल म्हणून म्हणतात ना,

घर असते घरासारखे
नकोच नुसत्या भिंती
तिथे असावा प्रेम जिव्हाळा
नकोत नुसती नाती

एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी माणूस हा गैरमार्गाचा अवलंब करतो. वाटेत येणाऱ्या अडथळ्याला कायमचा संपवतो. अशा वेळेस तो कुठल्याही नात्याला जुमानत नाही. म्हणून माणसांनी आपली मानसिकता बदलावी. नात्यातील दुरावा कमी करण्यासाठी एकमेकांना समजून घेतल पाहिजे. आपुलकीच्या नात्यातील दरी कमी करण्यासाठी प्रथम प्रेमाने, आदराने समजून सांगावे. त्याचे सदुपयोग, दुष्परिणामही समजून सांगावे म्हणजे त्यांना पण या बाबत ज्ञान अवगत झाल्यावर वादविवाद होणारच नाहीत. त्यामुळे आपल्या नात्यातला विश्वास, प्रेम, आदर टिकून राहील.

आपल्याला हव्या हव्या असलेल्या गोष्टी आज आपल्या पायांजवळ लोटांगण घालीत असतात. अशा सुखासीन माणसांना रस्त्यावर भीक मागून पोट भरणारी बालके कशी काय दिसतील ? त्यांच्यातही माणूस नावाचा प्राणी आहे हे कस काय दिसेल ? त्यांच जीवन कोणी फुलवूच शकणार नाही का ? त्याचबरोबर अनेकांचे देह व्यसनांनी जखडलेले आहेत. हे मुक्त होऊच शकणार नाहीत का ? आणि जर होत असतील तर मग कसे आणि केव्हा ?? डॉ. अनिल अवचट (बाबा) यांनी मुक्तांगणातून हे कार्य सुरु केलेलं आहे. पण अशा मुक्तांगणाची आज गावागावांतून खरी गरज आहे.

माणूस किती जगतो याला महत्व नाही तर त्यापेक्षा तो कसा जगतो याला फार महत्व आहे. आयुष्यातील खडतर प्रवासाने यश संपादन हेत असते. सर्व प्रथम विद्यार्थी घडत असताना शिक्षकांनी त्यांच्यासमोर आदर्श ठेवला पाहिजे. त्याचबरासेबर आई–वडिलांनी चांगले संस्कार पेरणे गरजेचे आहे. पालकांनी बेजबाबदार न राहता त्यांच्यामध्ये चांगले संस्कार बिंबवणे खूप गरजेचे आहे. माणसाची सर्वांत महत्वाची गरज नुसते शिक्षण नाही, त्यांचे चारित्र्य आहे. नुसतेच पुस्तकी ज्ञान न घेता चारित्र्य संवर्धन होणेही गरजेचे आहे. त्याने स्वत:चे रक्षण होत असते.

आपल्या भारतात अनेक युगपुरुष होऊन गेले,त्याचबरोबर नारी शक्तीनेही आपले अस्तित्व व सामर्थ्य जनमाणसात उमटवल त्यातलेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, मदर तेरेसा, सावित्रीबाई फुले आदी महान व्यक्ती आहेत. या सर्वांनी स्वत: चंदनाप्रमाणे इतरांच्या आयुष्याला व इतरांना सुगंध दिला आहे. आजही अशा विचारसरणीची माणस आहेत ; पण ती मात्र हातांच्या बोटांवर मोजता येतील एवढीच. बाबा आमटे , मंदाकिनी आमटे महिन्याअखेर भरपूर पगार घेऊन ऐश–आरामात घरी बसू शकले असते. पण त्यांनी तसे केले नाही. झिजणाऱ्या जीवांना नवजीवन देण्याचे काम त्यांनी केल. याच कारण अशाच माणसांना माणूसकीतील माणूसपण कळल होत आणि हे जेव्हा प्रत्येक मानवाला कळेल. तेव्हा नाती हरवत चालेल्या या समाजात खरा माणूस म्हणून ओळखता येईल.

म्हणून पवित्र असलेल्या या नात्यांना मलीन होण्यापासून वाचवा

**मन वळू नये, अशी श्रध्दा हवी**
**निष्ठा ढळू नये, अशी भक्ती हवी**
**सामर्थ्य संपू नये, अशी शक्ती हवी**
**कधी विसरु नये, अशी नाती हवी.**

**वाघ पुनम**
टी.वाय.बी.एस्सी.

# स्त्री - पुरुष समानता

'मुलगी झाली, मुलगी ! नक्षत्रासारखी सुरेख, गोरीपान !' माझ्या डॉक्टर आईने बाळतपणे केल्या केल्या मोठ्याने सांगितले. पुढे ती म्हणाली ''बाळ बाळंतीण सुखरुप'' एवढे ऐकले मात्र. त्या बाईच्या बरोबर आलेल्या महिला मटकन खालीचबसल्या, दुःखाचे उसासे टाकत ! 'कुठून मेली फिंदरी आली छळायला'! एवढा खर्च केला, पण मुलगीच झाली. 'वंशाला दिवा काही जन्माला आला नाही.' वगैरे उद्‌गार मी ऐकले व सून्नच झाले. परवाच्या जनगणनेत स्त्री-पुरुषांच्या गुणोत्तरात, तुलनेने स्त्रीया कमी झाल्याच लक्षात आले तरी स्त्री जन्म झाल्यावर शोक, स्त्री गर्भाची हत्या, स्त्री लिंगी बाळास योग्य लसीकरणाचा अभाव, औषधोपचार व योग्य पालन यांची उकलढकल अजून समाजात आहे. याचे मला आश्चर्य वाटते.

स्त्री! माणसाच्या आयुष्यात सर्वप्रथम येणारा अनुभव !... अर्थात आईच्या रुपाने ! सर्व पशु-पक्षांमध्ये आईला अनन्य साधारण महत्व. 'आई' हे जीवनातील चिरकाल टिकणारे शाश्वत आहे. पुढे, ही मातृसत्ताक पध्दती नामशेष झाली. स्त्रियांना दुय्यम स्थान मिळत गेले. गेल्या शतकानी मात्र तिला विकासाची दार उघडली. 'नासा' मध्ये प्रवेश करणारी आपली कल्पना चावला .... एकमेव महिला वीर होती ना ! भारतवर्षावर लोकशाही राज्यपध्दतीने पंतप्रधान झालेल्या प्रियदर्शनी इंदिरा गांधी जेल मध्ये वातावरण पूर्ण बदलुन कैद्यांनी वेगळे वागणाऱ्या, महिला पोलिस मध्ये भरती होण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या महिला पोलिस अधिकारी किरण बेदी ! भारताची सुवर्ण कन्या पी.टी.उषा.

या अशा व्यक्तिंपुढे मस्तक आपोआप झुकते. अभिमानाने ऊर भरुन येतो.

'यत्र नार्यस्तु पुजन्ते,
रमन्ते तत्र देवता :

असं फक्त भारतीय धर्मग्रंथातच सांगितलय पण खरंखुरं असं असतं का हो ? स्त्रीला सन्मानाने वागणुक इथे दिली जाते का ? पुराणकाळापासुन, समाजाने स्त्री-पुरुष समानतेचा स्वीकार केला आहे. ज्ञानदेवांनी सातशे वर्षापूर्वी स्त्री-पुरुष भेद मानु नये हे.

'स्त्री पुरुष नामभेदे
शिवपन ऐकले नांदे'
या ओळीतून सांगितले.

अजुनही आजच्या घडीला रुग्णालयांत जाऊन गर्भपरीक्षा करणारे व पोटात स्त्रीभ्रूणहत्या करणारे महाभाग आहेत. पंडुरोग, क्षय, एड्स या रोगांना नाहक बळी पडणाऱ्या रुग्णात स्त्रियाच जास्त आहे.

महिला समाजाची वीण घट्ट करते. जवाहरलालजी तर म्हणतात,

'To awaken people, it is the woman who must be awakened. Once she is the move, the family moves, the village, the nation movies.'

एवढी ताकद आहे, या 'आदिशक्ती'त ! भारत २१ व्या शतका आहे. 'Better late than never' आता या पुढे तरी आपण सर्वांनी मुल्यशिक्षणातील मुल्य 'स्त्री पुरुष समानता' हे ब्रीद शिरावर जबाबदारी तोलु या.

**शेलार आकांक्षा**
टी.वाय.बी.ए. मराठी

# लेक वाचवा ...

कोण पाहिजे ?
जन्म द्यायला आईच पाहिजे
राखी बांधायला बहिणच पाहिजे
गोष्टी सांगायला आजी पाहिजे
हट्ट पुरवायला मावशी पाहिजे
पुरणपोळी भरवायला मामी पाहिजे
जिवणाच्या सोबतीला मैत्रिन पाहिजे
आयुष्याच्या साथीला पत्नी पाहिजे
पण हे सर्व करायला आधी
एक मुलगी तर जगली पाहिजे ...!

**बोरुडे योगेश**
तृतीय वर्ष विज्ञान

# राष्ट्रपती राजवट

राष्ट्रपती राजवट ही भारत देशाच्या संविधानामधील कलम ३५२, ३५६, ३६० नुसार लागू केली जाऊ शकते. देशातील कोणत्याही राज्यात शासकीय कारभार संविधानानुसार चालणे शक्य नसल्याचा अहवाल संबंधित राज्याच्या राज्यपालांनी राष्ट्रपतींना दिला किंवा तसा अहवाल नसतानाही राष्ट्रपतींची स्वत:ची तशी खात्री पटली, तरी राष्ट्रपती त्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करु शकतात. संविधानाच्या कलम ३५६ नुसार, एखाद्या राज्यातील प्रशासन घटनात्मक पद्धतीने चालत नसल्यास राष्ट्रपती राजवट लागू केली जाऊ शकते. संविधानाच्या कलम ३६५ नुसार, एखादे राज्य सरकार केंद्राच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करत असल्यासही त्या संबंधित राज्यात राष्ट्रपती राजवट घोषित करणे शक्य असते. कलम ३५६ हयानुसार कोणतेही राज्य सरकार अल्पमतात आल्यास किंवा कामकाज चालवण्यास असमर्थ ठरल्यास ते बरखास्त करुन त्या राज्याचा कारभार थेट 'भारत सरकार / केंद्र सरकारद्वारे चालवला जातो. राष्ट्रपती राजवट ही किमान सहा महिन्यापर्यंत तर कमाल तीन वर्षांपर्यंत असू शकते. राष्ट्रपती राजवटीच्या दरम्यान कोणत्याही पक्षाला सत्ता स्थापनेचा दावा करता येतो. किंबहुना त्या पक्षाने बहुमत सिद्ध केले पाहिजे नविन सरकार स्थापन होताच राष्ट्रपती राजवट आपोआप संपुष्टात येते. पण सहा महिन्यात जर कोणत्याही पक्षाने सत्ता स्थापनेच्या दावा न केल्यास नवीन मध्यावधी निवडणूक घेतली जाते. राष्ट्रपती राजवटीदरम्यान त्या राज्याच्या राज्यपालाला बहुतेक घटनात्मक अधिकार असतात.

राष्ट्रपती राजवट लागू झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत संसदेची मान्यता मिळवणे आवश्यक असते. संसदेच्या मंजूरीनंतर सहा महिन्यांसाठी राष्ट्रपती राजवट लागू करता येते. संसदेने पुढील सहा महिन्यांसाठी मान्यता दिल्यास राष्ट्रपती राजवटीचा कालावधी वाढवता येऊ शकतो. संसदेची मान्यता मिळत असली, तरीही कोणत्याही राज्यात जास्तीत जास्त तीन वर्षांपर्यंत राष्ट्रपती राजवट लागू करणे शक्य असते.

राष्ट्रपती राजवटीत न्यायालयीन वगळता राज्याची सर्व सत्ता राष्ट्रपतींच्या हाती असते. राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून बहुतांश वेळा राज्यपालच राज्याचे शासन चालवतात. राज्यपाल राज्याच्या मुख्य सविचांच्या सहाय्याने शासन चालवतात. राष्ट्रपती राजवटीत संबंधित राज्याच्या विधिमंडळाची कार्ये, अधिकार संसदेकडे सोपवले जातात. राष्ट्रपती स्वत: आदेश देऊन राज्य सरकारच्या सेवेतील कोणत्याही अधिकाऱ्यांना कारवाई करण्यास सांगू शकतात. लोकसभेची बैठक नसल्यास राज्याच्या संचित निधीतून पैसा खर्च करण्याचाआदेश राष्ट्रपती त्या कालावधीमध्ये देऊ शकतात. राष्ट्रपती राजवटीतही उच्च न्यायालयाचे अधिकार अबाधित असतात. संबंधित राज्याच्या विधानसभेचे विसर्जन करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.

**राष्ट्रपती राजवट आणि महाराष्ट्र**

महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट तीन वेळा लावण्यात आली होती. महाराष्ट्रात पहिल्यांदा १९८० मध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. त्यावेळी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार बरखास्त करण्यात आले होते. बरखास्तीनंतर विधानसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यावेळी महाराष्ट्रात १७ फेब्रुवारी १९८० ते ९ जून १९८० पर्यंत राष्ट्रपती शासन लागू करण्यात आले होते. महाराष्ट्रात दुसऱ्यांदा २०१४ मध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. २०१४ मध्ये ३२ दिवसांसाठी राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती. त्यानंतर देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखालील नवं सरकार सत्तेवर येईपर्यंत राष्ट्रपती राजवट लागू होती आणि तिसऱ्यांदा २०१९ च्या विधानसभेच्या निवडणूकीनंतर कोणत्याही पक्षाने बहुमत सिद्ध न केल्यामुळे १२ नोव्हेंबर २०१९ रोजी राष्ट्रपती राजवट लागू झालेली आहे.

**कासार जयश्री**
टी.वाय.बी.ए. मराठी

# राजमाता जिजाऊ



विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे राजे लखूजी जाधव आणि म्हाळसाबाई यांचे पोटी एक दिव्य तेजोमय कन्यारत्न १२ जानेवारी १५९८ ला जन्माला आले. त्या म्हणजे माँ साहेब जिजाऊ. जाधव परिवारात चार मुलांनंतर मुलगी जन्माला आली म्हणून सर्वांना अतिशय आनंद झाला. आणि माँ जिजाऊंच्या जन्मोत्सवाला पाहता-पाहता दिवाळीचे रुप आले. नगरास साखरपान व भोजन दिले गेले. आनंदमय वातावरणात चिंब होत असताना माँ साहेबांचे काका जगदेवराव हे परिवारासहीत तुळजापूरला देवीची ओटी भरण्यासाठी गेले.

अतिशय लाडाकौतुकात माँसाहेबांचे बालपण गेले परंतु बाहूला-बाहूलींचा खेळ खेळण्यात त्यांनी बालपण गमावले नाही. तर काकांच्या आणि मोठ्या भावाच्या मदतीने अनेक मैदानी खेळात त्यातरबेज झाल्या बालवयातच इ.स. १६१० दरम्यान त्यांचा देवगिरी येथे शहाजीराजे यांच्याशी अतिशय थाटामाटात विवाह पार पडला. पुढे इ.स. १६१९ ला पहिले पुत्र जन्माला आले. ते म्हणजे संभाजी राजे (इ.स. १६५४ मध्ये वयाच्या ३५ व्या वर्षी कणकगिरीच्या युद्धात मारले गेले) आणि इ.स. १६३० ला रयतेच्या राजाचा जन्म झाला. (ता.जुन्नर शिवनेरी) शिवाजी महाराजांची जबाबदारी मोठ्या खंबीरपणे माँ साहेबांनी पेलली.

त्यावेळी आदिलशाही, निजामशाही, मोगलशाही यांसारख्या बलाढ्य सम्राज्याखाली संपूर्ण देश दडपला गेला होता. जिकडे तिकडे अन्याय अत्याचार माजला होता. शेतकरी, व्यापारींना रयतेला कोणी वाली उरला नव्हता रयत अगदी गंजून गेली होती.

नेमकी हीच परिस्थिती बदलवण्यासाठी, रयतेला संकटातून बाहेर काढण्यासाठी शहाजीराजे सांगतील ती गोष्ट मानुन शिवाजी महारांना घडविण्याचे महान कार्य केले. त्यांच्यावर योग्य संस्कार केले त्यांना कवेळ महाभारताच्या रामायणाच्या कथा सांगितल्या नाहीत तर गोरगरीब जनतेसाठी शेकरी कष्टकरी त्यांच्या हक्कासाठी लढण्यास भाग पाडले. शिक्षकांच्या मदतीने शिवरायांना मैदानी खेळाचे धडे दिले. आणि पुढे माँसाहेबांच्या अथक प्रयत्नाने शिवरायांच्या नसानसांत मनामनांत स्वराज्याची ज्योत पेटवली. रजे कधीही माँ साहेबांचा आशिर्वाद घेतल्याशिवाय बाहेर जात नसत. शिवाजी महाराजांना सर्वात जास्त सहवास लाभला तो माँसाहेबांचा. त्यामुळे महिलांप्रती त्यांच्या मनात कमालीचा आदर होता. आत्मविश्वास आणि समाजनिष्ठा ही मुल्ये शिवाजी महाराजांच्या मनात निर्माण केली. त्या ह्यातभर अनेक दु:खांचा, संकटांचा सामना करीत राहील्या पण खचल्या नाहीत. डगमगल्या नाहीत. उलट शत्रुसंगे लढण्यासाठी वेळोवेळी शिवाजी महाराजांना प्रोत्साहन दिले. राष्ट्रभक्तीची बीजे त्यांच्यात रुजवली. माँसाहेब धार्मिक होत्या त्यांचा संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर दृढ विश्वास होता. शिवाजी महाराजांनाही त्या अभंग ऐकवत. आपल्या संस्काराने आणि कर्तबगारीने शिवरायांना घडविले. जर जिजाऊ जन्माला आल्या नसत्या तर शिवराय घडले नसते. आणि मग ना मराठा, ना महाराष्ट्र, ना ताठ कणा जगण्याची पशुपेक्षाही होन अवस्था त्या देशातील रयतेची झाली असती.

**कोमल खाकाळ**
तृतीय वर्ष (विज्ञान)

## चारोळी ...

शब्दांची झुंड पडावी अशी काही माणस गोड असतात...
केवढ आपल भाग्य असत, जेव्हा ती आपली असतात...
विसराव म्हटली तरी विसरण तितक सोप्प नसतं...
कारण शब्दानीच शब्दांना गुंफून,
ती आपलीशी झालेली असतात...
चांगला स्वभाव हा गणितातल्या
शुन्यासारखी असतो, त्याचे सोबत असतो
त्याची किंमत नेहमीच जास्त असते !

**अश्विनी परदेशी**
एफ.वाय.बी.एस्सी.

# मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण

परवाच एका मासिकात 'स्त्री सक्षमीकरण' नावाच्या लेखात लेखाशेजारी एक आगळं वेगळं चित्र काढलेलं पाहिलं. एका पाळण्यात चक्क पृथ्वीचा आख्खा गोल होता नी त्या पाळण्याची दोरी एका सशक्त महिलेच्या हाती ! जसा जसा खोलात विचार करु लागले तशी तशी त्या चित्राची संकल्पना मला जमतच गेली. खरंच, स्त्री ही अनंत काळची विश्वाची माता आहे आणि ती सक्षम असली की जगरहाटी उत्तम चालणार ह्यात शंकाच नाही, असंच तर त्या चित्रकाराला म्हणायच नसेल ना ?

अतिप्राचीन भारतीय संस्कृती मातृप्रधान होती इतिहासात स्वत:ची सबलता, कर्तृत्व स्त्रियांनी स्वहस्ते सिध्द केलंय, शककर्ता सातवाहन राजा अभिमानाने स्वत:ला 'गौतमीपुत्र' म्हणुन संबोधत असे. पुढे ही संस्कृती नामशेष झाली. स्त्रियांना दुय्यम स्थान मिळता मिळता, गुलामगिरीचे जोखडचं त्यांच्यावर पडले. अवहेलना, निरक्षता, सतीची पध्दत, बालविवाह अशा सामाजिक लाजिरवाण्या जोखडांनी स्त्री चैतन्यहीन झाली. गलित गात्र झाली व घराच्या चार भिंतीत जीवन कंठू लागली. गेल्या शतकात स्त्रीला शिक्षणाची दारं उघडी झाली. म.फुले, महर्षी कर्वे प्रभृतींच्या प्रयत्नांमुळे ती शिकली. बाहेर पडू लागली. स्वत:च कार्य, भेदणारी माणसं नवी क्षितिजं नवे प्रश्न हाताळु लागली. मी म्हणजे केरवारा, स्वयंपाकपाणी चूलमूल नसुन एक स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे हे कळुन आता ती घर सांभाळुन मुलीबरोबर संगणकही शिकू लागली. अर्थार्जन करुन कुटुंबाच बॅकबोन बनली. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीकडे डोळसपणे लक्ष देऊ लागली.

गेल्या पन्नास साठ वर्षातील भारतीय शिक्षित महिलेची कारकीर्द नव्या पिढीला किती उपयुक्त ठरतेय हे आपण जागोजागी पाहतो. नवा बालचमू व युवापिढी सशक्त करण्याचे काम महिला करतेय व पर्यायाने देश घडवतेय शासनही महीलांना तीस टक्के आरक्षण देऊन शिक्षणासाठी प्रोत्साहीत करत आहे व त्यांच्या एक लाख चाळीस हजार पर्यंतच्या वार्षिक उत्पन्नाला कर सवलत देत आहे. शाळांमध्ये महिला शिक्षकांची संख्या तुलनेने खुपच जास्त आहे.

भ्रताराची सेवा, तोचि आम्हा देव
भ्रतार स्वयंमेव परब्रह्म ।।

असं पूर्वी समजणारी स्त्री आज कुठल्याही क्षेत्रात कमी नाही शिक्षणासाठी लागणारी उत्सुकता, चिकाटी, संयम, अथक परिश्रमाची तयारी उजळणीचा प्रमाणिकपणा, चिवटपणा, लवचिकता हे गुण तिच्यात आहेत. ताणतणाव सहन करण्याची ताकदही निसर्गाने स्त्रीला जास्त दिलीय त्यामुळे अतिजबाबदारीची कामेही स्त्रीया करुन जातात. व्यावसायिक शिक्षणाने तर स्त्रीला अंतर्बाह्य बदलले आहे. त्या हॉटेल मॅनेजमेंट, हॉस्पिटल मॅनेजमेंट सौंदर्यशास्त्र ही शिकतात व कॉर्पोरेट विभागात मॅनेजरही असतात. वैद्यकीय क्षेत्र असो, कलेचे, अंतराळ भ्रमण शिक्षणाचे, पर्यटनाचे, खेळाचे,पोलिसाचे, पाककौशल्याचे वा शेतीचे क्षेत्र असो. स्त्रिया सर्वत्र पुरुषांच्या बरोबरीने आघाडीवर दिसतात. मुंबईत स्त्री, गच्च भरलेली लोकल रेल्वे चालवते. सुनिता विल्यम्स् न डगमगता सहा महीने अंतराळात राहते, किरण बेदी दिल्ली पोलिस आयुक्त होतात, वीणा पाटील केसरी टूर्सच्या संचालक स्मिता तळवलकर एक स्वतंत्र सिनेनिर्माती लतादीदी जगत्विख्यात गायिका, शांता शेळके ..... श्रेष्ठ कवयित्री, वागविलासिनी सरोजिनी वैद्य, इंफोसिसच्या सुधा मुर्ती ..... अशी कितीतरी नावं विकासाचा प्रगतीपथ उजळुन टाकणारी आहेत. पहील्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले, पहील्या महिला डॉक्टर आनंदीबाई गोपाळ जोशी ह्यांची नावं घेतल्याशिवाय तर ही मालिका अपुर्णच राहील.

आजच्या मुलामुलींचे ही खरी आदर्श स्थाने. जणु एक दीपस्तंभ देशाच्या प्रगतीचे पाइकच खानदेशातल्या प्रतिभाताई पाटील जेव्हा भारताच्या पहील्या नागरिकाचा मान पटकावतात, राष्ट्रपतीपद विभूषित करतात तेव्हा मात्र उर अभिमानाने भरुन येतो. डोळ्यात आनंदाश्रू जमा होतात.

एक शिक्षित स्त्री सासरचे व माहेरचे अशी दोन कुटुंबे सावरते. एक शिक्षित आई कुटुंबाचा उध्दार करते. हे ही सर्वज्ञात आहे. कुटुंब म्हणजे विद्यापीठ मानलं तर आई जगातील सर्वात श्रेष्ठ गुरु आहे. जन्मापासून शिकवणारी, संस्कारामध्ये मनं भिजवणारी, गुरु – साने गुरुजी, छत्रपती शिवाजी महाराज ही त्याची बोलकी उदाहरणे.

जिच्या व्यक्तिमत्वावर पूर्ण कुटुंबसंस्था स्थिरपणे उभी असते, ती स्त्री ............ कधी मुलगी, कधी पत्नी तर कधी माता असते. तिला सामाजिक बांधिलकीचे भान असते. अन्याय, भ्रष्टाचार ती खपवून घेत नाही. हुंडापध्दती देवदासी

अशा गैररुढींविरुध्द आजची प्रगती स्त्री बंड पुकारते. समाज जागवते. कचराकुंडीत टाकलेल्या कुण्या अनाथ बालकाला पदराखाली घेऊन त्याचेही पालनपोषण करते. देवालायात देवापाशी सर्वांसाठी सुख मागते. जे करते ते मनापासुन करते. आयुष्य पणाला लावुन करते. म्हणुनच आम्ही...... उद्याच्या सुजाण नागरिकांनी या स्त्री शक्तीला उत्साहाचे टॉनिक देऊन समाज चैतन्यशील ठेवण्याचे ठरवूयात कारण पंडीत नेहरु म्हणत ....

To awaken people, it is the woman who must be awakned. Once she is on move, the family, the village & the nation moves !

**आकांक्षा शेलार**
टी.वाय.बी.ए.

## पाहुणे (कोडे)

पाऊस :

शेतकऱ्याच्या शेतावर
पाहुणा आला
वाळलेल्या शेताला अधार दिला

वारा :

कावळ्याच्या घरात
पाहुणा आला,
काटक्याचे घर मोडून गेला

कावळा :

चिमणीच्या मेणाच्या घरात
पाहुणा आला
सगळे दाणे खाऊन गेला

सर्प, उंदीर :

जमिनीतले घर, दरवाजे दोन,
एक दरवाजाने, पाहुणा आला,
घराचा मालक पळून गेला

**दिपाली बोरुडे**
एफ.वाय.बी.एस्सी

## जी.एस.टी.ची ओळख

'एक देश एक कर' हे तत्त्व झुगारुन एकाऐवजी चार दर्शन करआकारणी. सरकारी अधिकाऱ्यांना विशेषाधिकार, अनेक वस्तूंना केंद्रीय आकारणीत सूट देऊन त्या राज्यावर सोडणे, पेट्रोल-डिझेलवरही समान कर नाहीच, अशी या फेरबदलांची तऱ्हा.

'एक देश एक कर' हे वस्तू आणि सेवा कराचे. म्हणजे गुड्स ॲण्ड सर्व्हिसेस टॅक्स - जीएसटीचे तत्त्व. आधुनिक जगात हा कर सर्वात प्रागतिक मानला जातो आणि १ जुलैपासून अमलात आला. जवळपास दहा वर्षे या कराविषयी आपल्याकडे विस्तृत चर्चा सुरु आहे. कोणामुळे या कराच्या अंमलबाजवणी विरोध झाला. पंतप्रधानपदी मनमोहन सिंग असताना या कराची अंमलबजावणी हाणून पाडणारे आता याच कराच्या अंमलबजावणीसाठी कसे प्रयत्न करीत होते. तेव्हा विरोध होता. पण यावेळी पाठिंबा का आदी प्रश्नांची उत्तरे शोधण्याची. किंबहूना हे प्रश्नदेशील विचारण्याची आता वेळ नाही आणि त्याची गरजही नाही. लोकसभेत मोदी सरकारला असणारे बहुमत लक्षात घेता ही विधेयक मंजूर होण्यात काही अडचण नव्हती. याचा अर्थ २०१७ या वर्षात अंमलबजावणी सुरु झाली. वस्तू आणि सेवा करासंदर्भात नेमलेल्या तज्ज्ञांच्या समितीने जे काही सूचवले होते त्यात मोठे बदल करण्यात आले असून त्यामुळे वस्तू आणि सेवा कराचे अनेक संदर्भ बदलतात.

'एक देश एक कर' हे सूत्र वस्तू आणि सेवा कराचा प्राण असले तरी हा कर अमलात येतानाच तो तब्बल चार पातळ्यांवर सुरु झाला. 'एक देश चार कर' असे त्यास म्हणता येईल. म्हणजे करपात्र वस्तूंचे वर्गीकरण ५,१२, १८ आणि २८ टक्के अशा कर आकारणीत केले गेले. वस्तुत: तज्ज्ञांच्या समितीनुसार सर्व करपात्र घटक देशभर एक समान कर आकारणीनेच बांधले जाणे आवश्यक होते. असे असतानाही आपल्याकडे या कराची सुरुवातच चार विविध कर दरांनी होणार होती यात चैनीच्या वस्तू म्हणजे मद्य, तंबाखू, आदी या २८ टक्के

कराच्या वर्गवारीत येणार होत्या. दैनंदिन गरजेच्या वस्तूंवर ५ टक्के इतकाच दर आकारला जाणार होता. हे अत्यंत अयोग्य आहे. याची कारणे दोन एक म्हणजे या घटकांची वर्गवारी करण्याचा अधिकार सरकारी अधिकाऱ्यांना दिला जाणार होता. हा एक अर्थी विशेषाधिकारच आणि जेथे म्हणून असे विशेषाधिकार असतात तेथे भ्रष्टाचारास हमखास वाव असतो. दुसरा मुद्दा जीवनावश्यक काय हे ठरवण्याचा. उदाहरणार्थ मद्य हे चैनीच्या वस्तूंच्या यादीत हवे असा गुजरात वा बिहार या राज्यांचा आग्रह असताना गोवा वा काही पूर्वकडची राज्ये मद्यास जीवनावश्यक ठरवू इच्छित होते. तसे झाले असते तर एकाच घटकाच्या बाबत एका देशात दोन दर असतील हे सोईचे नव्हते. त्यामुळे या घटकांचा प्रवास कमी कराच्या राज्यातून जास्त कराच्या राज्यात झाला असता. वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीसाठी हे कारण दूर होणार नसते. तर त्या कराचे अपयश ठरले असते.

या करासंदर्भात दुसरे तत्व म्हणजे कोणत्याही घटकाला त्याच्या बाहेर ठेवले जात नाही. ज्या ज्या देशांत वस्तू आणि सेवा कराची यशस्वी अंमलबजावणी होते त्या देशांत देखील हाच अनुभव आहे. याचा अर्थ या कराच्या बाहेर राहील असा एकही करपात्र घटक ठेवला जात नाही. सध्याच्या व्यवस्थेत तसे नाही. पहिल्यांदा जवळपास ४० घटकांना या कराच्या जाळ्यातून सुरुवातीलाच वगळले गेले ती संख्या अगोदर ५१ होती पण नंतर ४० वर स्थिरावली हे असे विविध घटकांना या करांतून वगळणे हे सर्वात मोठे कुपथ्य. या कुपथ्यातही विष ठरणारी बाब म्हणजे करसूट उत्पादन यादीत पेट्रोल आणि डिझेल यांचाही समावेश होता. याचा साधा अर्थ असा की वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीनंतरदेखील आपल्या देशात इंधनांचे दर सर्वत्र एकच राहणार नव्हते. कारण विविध राज्य सरकाराचां पेट्रोल आणि डिझेल यांवर कर लावायचा अधिकार अबाधित राखला जाणार होता.ही बाब अत्यंत धोकादायक आणि वस्तू सेवा कराच्या गळ्यास नख लावणारी ठरु शकते. वस्तू आणि सेवा कराच्या अमलानंतरही प्रत्येक राज्याने पेट्रोल आणि डिझेलसाठी आपापली स्वतंत्र कर आकारणी सुरुच ठेवली. त्यामुळे दराच्या बाबतीत कायमच तफावत राहिली. खेरीज कोणत्याही वस्तूच्या अंतिम दरनिश्चितीत इंधनाचा खर्च लक्षणीय असतो. तोच जर वेगेवगळा ठेवण्याची अनुमती होती तर वस्तूंचे दरही वेगवेगळे राहणार हे उघड होते. ज्या राज्यात पेट्रोल व डिझेलचे दर कमी आहेत त्या राज्यात अन्य राज्यातून इंधन भरणासाठी अधिक वाहने जाऊन शकत होते तसेच इंधनाची तस्करीदेखील हमखास होते. तेव्हा पेट्रोल आणि डिझेल यांना या कर क्षेत्राच्या बाहेर ठेवणे ही अक्षम्य चूक ठरु शकत होती.

हे सर्व टाळावयाचे तर राज्यांच्या उत्पन्नावर दा येण्याचा धोका आजही अनेक राज्ये केंद्राकडून अधिक निधीसाठी गळा काढीत असतात. वस्तू आणि सेवा कराने या राज्यांचा कर आकारणीचा अधिकार काढून घेतला तर राज्योचे हे गळा काढणे अधिक जोमाने होईल. पुन्हा यास राजकीय संदर्भ असतील यानिमित्ताने पुन्हा राजकारण उफाळून येईल. त्याचा धोका वेगळाच.

**प्रणाली बोरकर**
एफ.वाय.बी.ए.

## काळ ...

काळ हा कोणाचाच नसतो,
का रे तू समझत नाही
आज तू हरला म्हणून
अस बिलकुल नाही, की तू जिंकणार नाही
काळ तर कोणाच्याच हातात नाही
तो नेहमी बदलत असतो
कधी आपल्याला परक तर कधी
परक्यांना आपल बनवत असतो
बुडलेला सूर्य पुन्हा उगवणार आहे
तो ही प्रत्येक दिवशी
नव्याने सुरुवात करणार आहे
कोमेजलेलं फूल पुन्हा एकदा नव्याने खुलणार आहे
तू कर अस काहि
की घेतील लोक तुझ नाव हर्षयाशी
तू घे रे उंच भरारी
नको करु तू पर्वा जगाची

**अंजली झांबरे**
एफ.वाय.बी.एस्सी.

# भारतातील गरीबी -बेकारी आणि उपाययोजना



भारत या देशाने भारतातील गरीबी – बेकारी कमी करण्यासाठी काही उपाययोजना केलेल्या आहेत.

गरिबीचे दोन प्रकारे विश्लेषण केले जाते. पहिली निरपेक्ष गरिबी आणि दुसरी सापेक्ष गरिबी जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या किमान गरजांची पूर्तता न करतायेणे याला निरपेक्ष दारिद्र्य किंवा गरिबी या असे संबोधले जाते. उच्च उत्पन्न गटातील लोकसंख्येशी तुलना करता तळाच्या उत्पन्न गटातील किती लोकसंख्या दारिद्र्यात आहे असे पाहिले जाते तेव्हा त्यास दारिद्र्य – गरिबी असे संबोधले जाते.

भारतात नियोजन आयोगाने प्रतिदिनी किती माणशी लागणाऱ्या कॅलरीज या निकषावर आधारित दारिद्र्य किंवा गरिबीचे मोजमाप करण्यावर भर दिलेला आहे. याची ग्रामीण भागातील प्रतिमाणशी २१०० कॅलरीज आणि शहरी भागातील प्रतिमाणशी २४०० कॅलरीज अशी निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच याच्या जोडीला नेमण्यात आलेल्या विविध समित्यांमार्फत गरिबीच्या मोजमापाचे वेगवेगळे निकष ठरविण्यात आलेले आहेत. ज्यामध्ये लकडावाला समिती (१९९३), तेंडूलकर समिती (२००९) आणि रंगराजन समिती (२०१२) यांचा समावेश आहे यातील तेंडूलकर समितीचे निकष नीती आयोगाने स्वीकारलेले आहेत.

सरकारचे धोरण आणि उपाययोजना : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी भारतात आर्थिक नियोजन पध्दतीचा अवलंब केला गेला आणि गरिबी आणि बेरोजगारीच्या समूळ उच्चाटणासाठी विविध धोरणे आणि योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. सुरुवातीपासुन आर्थिक आणि सामाजिक समानता साध्य करणे हा भारतातील नियोजन नितीचा मुख्य उद्देश राहिलेला आहे. आजच्या घडीला जरी भारताने जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असा नवा लौकिक प्राप्त केलेला असला तरीदेशातील गरिबी व बेरोजगारीच्या समस्येचे समूळ उच्चाटन करण्यामध्ये म्हणावी इतकी प्रगती झालेली दिसून येत नाही. अजूनही भारतात जवळपास २७% लोकसंख्या गरीब आहे. आर्थिक वृध्दी जर गरिबी निर्मुलनासाठी सहाय्यभुत ठरणारी नसेल तर आर्थिक विकास साधता येणे अशक्य मानले जाते. जर विकास साधायचा असेल तर होणारी वृध्दी ही विकासात्मक स्वरुपाची असणे गरजेचे आहे. त्याशिवाय गरिबी आणि बेरोजगारीच्या समस्याचे निराकरण करणे शक्य नाही. असा मतप्रवाह गरिबी निर्मुलनासाठी विचारात घेतला जातो.

भारतासारख्या विकसित होत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेपुढे गरिबी आणि बेरोजगारी ही कायम भेडसावणारी समस्या आहे. भारतामध्ये गरिबी आणि बरोजगारीची समस्या ही बहुआयामी स्वरुपाची आहे. गरिबी म्हणजे केवळ जीवनावश्यक वस्तुचा अभाव नसुन निवडीस नकार, संधीचा अभाव, मानवी सन्मानाचा अभाव आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग नसणे होय यांच्या जोडीला भांडवलाची कमतरता. उत्पादक संसाधने आणि उपकरणे याची कमतरता, शेतीवर असणारे अवलंबित्व आणि कुशल मनुष्यबळाची कमतरता, निरक्षरता इत्यादीमुळे भारतातील बेरोजगारीची समस्या अधिकच आवाहनात्मक झालेली आहे. गरिबी आणि बेरोजगारी वर मात करण्यासाठी सरकामार्फत सदय परिस्थितीत विविध प्रकारच्या योजना राबविल्या जात आहेत. ज्यामध्ये Mgnera, nrim, aajevika, sgry इ. रोजगार निर्माण करण्यासाठीच्या योजना राबविल्या जात आहेत. तसेच याच्या जोडीला कुशल मनुष्यबळाची निमित करण्यासाठी National Skill Development Council (NSOC) ची स्थापना करण्यात आलेली आहे. याचा महत्वाचा उद्देश देशात कुशल मनुष्यबळाची निर्मिती करणे हा आहे. आणि यात खाजगी क्षेत्राचाही सहभाग आहे. आजमितीला देशात कुशल मनुष्यबळ निर्माण करता यावे यासाठी NCS, PMKVY, DDUGKY यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतातील कृषी क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या क्रांती घडलेल्या आहेत याचे स्पष्टीकरण करा या क्रांतीमुळेच भारतातील गरिबी निर्मुलन आणि अन्न सुरक्षेसाठी कशी मदत केलेली आहे. (२०१७) अलीकडील काळामधील भारतातील आर्थिक वृध्दीच्या स्वरुपाचे वर्णन पुष्कळदा नोकरीविना होणारी वृध्दी असे केले जाते. याच्याशी तुम्ही सहमत आहात का जेव्हा आपण भारताच्या जनसांख्यिकीय लाभांशाला दिमाखाने प्रदर्शित करतो त्याच वेळेस आपण रोजगारभिमुखतेची कमी कमी होत जाणारी उपलब्धता दुर्लक्षित करतो. असे करताना नेमकी कोणती चूक करत आहोत.

**अश्विनी मुटकुळे**
एस.वाय.बी.ए.

# मोबाईल संस्कृती




पूर्वी अन्न, वस्त्र आणि निवारा ही माणसाची मूलभूत गरज होती. आज मात्र अन्न, वस्त्र आणि निवारा आणि मोबाईल ही माणसाची मूलभूत गरज बनली आहे. काही दिवसांनी मोबाईल जवळ नसलेला माणूस दाखवा आणि १००० रुपये मिळवा, अशी जाहिरात दिसल्यास नवल वाटण्याचे काहीच कारण नाही. कारण दिवसेंदिवस मोबाईलचा उपयोग व त्याचे आकर्षण मोठ्यांपासून छोट्यांपर्यंत वाढत चाललंय. एखाद्या जानत्याप्रमाणे मोबाईल नावाचं जानवं सतत माणसाच्या गळ्यात दिसतंय. एखादा कुत्र्याच्या गळ्यातील पट्ट्यांप्रमाणे मोबाईल नावाचा पट्टा माणसाच्या गळ्यात दिसू लागला आहे.

आज अनेक मुलांना आपल्या आई-वडिलांशी बोलायला पाच मिनिटं वेळ नसतो. परंतु ही मुले तास न तास मोबाईलवर बोलत असतात. जेवताना मोबाईल, टी.व्ही. पाहताना मोबाईल आणि रात्री झोपतानाही या मुलांच्या हातात मोबाईलच असतो. अगदी शेवटच्या घटकेलाही ही मुलं म्हणतील. ''मला पाणी नको, काही नको मला फक्त मोबाईलवर बोलू द्या. कारण मोबाईल हेच माझं ओषध आहे. टॉनिक आहे.''इतकं मोबाईलचं आकर्षण दिवसेंदिवस वाढत चाललयं.

पूर्वी परिक्षेत मुलगा चांगल्या मार्कानि पास झाला की, पालक त्यांना सायकल घेऊन देत. आता पालक मुलांना म्हणतात. ''परीक्षेत चांगल्या मार्कानि पास हो, तुला आम्ही मोबाईल घेऊन देऊ'' मोबाईलचं आकर्षण मुलांप्रमाणेच पालकांमध्येही दिवसेदिवसं वाढत चाललंय. आता घरात रांगणाऱ्या छोट्या बाळाला खेळायला बाहुली, गाडीपेक्षा मोबाईल हवा असतो. दरवर्षी हजारो, लाखो वारकरी पंढरपूरला आषाढी यात्रेला चालत चालत जातात. पण काही लोकांचा मोबाईलवरुन घरी सतत संपर्क चालू असतो. ''आज आम्ही निरेला आलो आहोत. उद्या मुकाकम लोणंदला आहे. पाऊस कमी-जास्त प्रमाणात चालूच आहे.'' हे सगळं पाहिल्यानंतर पंढरपूरचा पांडुरंग ही मनातल्या मनात 'विठ्ठल..... विठ्ठल ...' म्हटल्या शिवाय राहणार नाही.

कारण नसताना विनाकारण ज्याच्यावर बोलले जातं तो म्हणजे मोबाईल.

आजकालची मुलं शाळेतलं अभ्यासाचं पुस्तक एकवेळ हातात घेणार नाही. पण, फेसबुकवर मात्र जास्तवेळ 'चॅटींग' करत राहतात.

हे सगळं पाहिल्यावर मोबाईल आजची संस्कृती आहे की विकृती हेच कळत नाही. शेवटी मोबाईलमुळे दूरची माणसे जवळ आली, पण जवळची माणसं दूर चालली त्याचं काय ? माणसासाठी मोबाईल आहे, मोबाईलसाठी माणूस नाही. हे माणसाने लक्षात घेऊन मोबाईलच्या फार आहारी, आधीन होऊ नये, नाहीतर एक दिवस असा येईल की, घरातल्या घरात एकमेकांशी बोलतानाही माणूस मोबाईलवरुन बोलताना दिसेल.

**पुष्पा डोके**
एफ.वाय.बी.एस्सी.

## व्यक्तिमत्व ...

फुलवायचे असेल आपले व्यक्तिमत्व
तर जीवणी करावे महान कर्तृत्व
प्रथम जोपासावे लागते मित्रत्व
समृध्द करावे लागते वक्तृत्व
वक्तृत्वानेच चालुन येते नेतृत्व
सांभाळण्या कुटूंब असावे लागते पितृत्व
वात्सल्यासाठी ह्रदयात पाहीजे मातृत्व
दान प्रवृत्तीसाठी जोपासावे दातृत्व
क.मि.व.ने.दा. हीच खरी सत्व
जीवण विकासाची मुलभुत तत्व
हिच तत्वे फुलविते,
माणसाचे व्यक्तिमत्व ....

**वाडगे अर्जुन बापु**
तृतीय वर्ष विज्ञान

# सावित्रीबाई फुले



सावित्रीबाई फुले या भारताच्या पहिल्या महिला शिक्षक होत्या. त्यांचे आयुष्य शिक्षण प्रसार व समाज सुधारणेच्या कामात व्यतीत केले. सावित्रीबाईचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. १८४० साली सावित्रीबाईंचा विवाह जोतीराव फुले यांच्यासह झाला तेव्हा त्यांचे वय अवघे ९ वर्ष तर जोतीरावांचे वय १३ वर्ष होते. जोतिबांनी सावित्रीबाईंना शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. स्त्रीयांना दुय्यम दर्जा देणारे समाजव्यवस्थेला न जुमानता सावित्रभबाईंनी स्त्रीमुक्ती व स्त्रीशिक्षणाचा पाया रचला. १ जानेवारी १८४८ ला त्यांनी पती जोतिबा फुले यांच्यासह पहिली मुलींची शाळा सुरु केली.

स्त्रियांनी शिकणे व शिकविणे हे धर्माला अनुसरुन नाही असे काही लोकांना वाटे, अशा लोकांनी सावित्रीबाईंना कठोर विरोध केला. सावित्रीबाई शाळेत जायला निघाल्या की हे विरोधक त्यांच्यावर दगड,शेण, व चिखल फेकत पण सावित्रीबाईंनी या सगळ्याला खंबीरपणे तोंड दिले.

बाल विवाह, सती,केशवपन अशा कित्येक क्रूर प्रथांना त्यांनी विरोध केला. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यातही त्यांनी हातभार लावला त्यांनी अनेक ठिकाणी समाजसुधारणेसाठी भाषणे दिली. सावित्रीबाईनी **'काव्यफुले'** व **'बावनकशी' सुबोध 'रत्नाकर'** हे काव्य संग्रह लिहिले.

१८९६-९७ सालांदरम्यान पुण्यात प्लेगची साथ पसरली होती. सावित्रीबाई प्लेगच्या रोग्यांची सेवा करीत होत्या, तेव्हा त्यांनाही प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ साली प्लेगमुळे त्यांचे निधन झाले.

स्त्रियांच्याअंधाऱ्या जीवनात पेटविल्या ज्ञानाची ज्योती ! म्हणून तर आज जगती अमर आहे. सावित्री पण सावित्रीबाईंनी `आपल्या कार्यात खंड पडू दिला नाही त्यांनी आपले स्त्री शिक्षणाचे पवित्र कार्य सुरुच ठेवले. म्हणून मला म्हणावे वाटते.

सावित्री तू होती भक्कम म्हणूनच आम्ही आज हा सोन्याचा दिन पाहतो !

तुझ्याच ग पुण्याईने आज आम्ही स्वातंत्र्याचा श्वास घेतो !!

पूर्वी महिलांचे काम फक्त चूल अन् मुलं एवढेच होते पण सावत्रीबाई मुळे आज महिला सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे. यामुळे सावित्रीबाईंच्या कार्याचा आम्हाला अभिमान आहे. सावित्रीबाई ह्या उत्तम कवयित्री होत्या त्यांनी ''काव्यफुले'' ''सुबोध रत्नाकर'', ''बावन्नकशी'' या काव्यसंग्रहातून समाज प्रबोधनाचे कार्य केले. पण सावित्रीबाईंनी जे स्त्री शिक्षणाचे रोपटे लावले होते. ते आज फळाफुलांनी बहरले आहे.

सावित्री तुझ्या लेकींच्या पंखात आकाशात झेपावण्याचे बळ आहे.

स्त्री शिक्षणासाठी तू केलेल्या कार्याचेच हे फळ आहे !!

**प्राजक्ता भांबरे**
एफ.वाय.बी.ए.

# आयुष्य ...

कोणी ढकलुन देईपर्यंत कोणाच्याही दारात उभ राहू नका
जबाबदारीने धाडसाने पाऊल उचलायला मागेपुढे पाहू नका
आपल्या स्वत:च्या निर्णयाला परिश्रमाची साथ,
दयायला विसरु नका.
आत्मविश्वासाने सर्व काही कमवता येते
अपयशाने मात्र कधीच खचुन जाऊ नका
चांगल्या गोष्टी ज्यांना मिळतात, जे''वाट'' बघतात
अधिक चांगल्या गोष्टी त्यांना मिळतात,
जे ''प्रयत्न'' करतात ...
पण 'सर्वोत्तम' गोष्टी त्यांनाच मिळतात, जे आपल्या
'प्रयत्नांवर' अतुट विश्वास ठेवतात.
''आयुष्य'' अवघड आहे पण, अशक्य नाही !!!

**अर्जुन वाडगे**
तृतीय वर्ष विज्ञान

## ग्रामीण जीवनातील समस्या

महात्मा गांधीजींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला होता. त्यावेळी काही ध्येयनिष्ठ तरुण खेड्यांकडे वळलेही ; पण स्वातंत्र्यानंतरची पासष्ठ वर्षे उलटून गेल्यावर आज भारतीय खेड्यांचे रुप कसे आहे ? दिवसेंदिवस खेड्याकडून शहरांकडे माणसांचा ओघ वाढत चालला आहे. शहरे लोकसंख्येने अवास्तव विस्तारत आहेत आणि खेडी ओस पडत आहेत. ती अधिकाधिक दरिद्री बनत चालली आहेत. असे का ? अशा कोणत्या समस्या आहेत ग्रामीण जीवनातील ?

आज शहरांत भयंकर गर्दी, जागेचा व पाण्याचा तुटवडा, प्रदूषणाची भेसूर समस्या, अपहरण, हिंसा यांची सततची टांगती तलवार असे असतानाही लोकांचे लोंढे खेड्यांकडून शहरांकडे का वळतात ? चटकन उत्तर मिळते. 'पोटासाठी' ज्याचे गावात शेत नाही या मला नाही त्याला गावात रोजगार नाही ही ग्रामीण भागातील सर्वात मोठी समस्या आहे. पूर्वीची बलुतेदारी नष्ट झाली. पण त्याला पर्यायी उद्योग उभे राहिले नाहीत. एखाद्या छोट्याशा शेतकऱ्याने कष्टाने एखादे पीक काढले. तर त्याला गावात योग्य भाव मिळत नाही. मग त्याला पडेल त्या भावाने तो माल विकावा लागतो किंवा एखाद्या दलालामार्फत माल शहरात पाठवावा लागतो. शेतकऱ्याचा सगळा नफा दलालच खातो.

ग्रामीण भागात आवश्यक सुधारणा पोहोचू शकल्या नाहीत. कित्येक गावात पाण्याची कायम टंचाई असते. वाहतूक व्यवस्था, दळणवळणाची साधने यांचा पूर्ण अभाव असतो शाळा, महाविद्यालय या शैक्षणिक सुविधा नसतात. कित्येक खेडेगावांत रुग्णालये सोडाच, पण वेळप्रसंगी डॉक्टरही उपलब्ध नसतो. शहरात आज मनोरंजनाची साधने विपुल आहेत. स्वाभाविकच तरुण पिढीला याचेच आकर्षण असते. मग ते खेड्यांतून शहरांकडे पळतात. गावे माणसांशिवाय ओस पडतात.

ग्रामीण जीवनातील काही समस्या या तेथील लोकांच्या अज्ञानातुन, अंधश्रध्देतुन निर्माण होतात. गावातील एखाद्या धनिकावर, सावकारावर वा त्याच्या मर्जीवर गावातील गरिबांचे जीवन अवलंबून असते. ग्रामीण जीवनात अजुन जातपात, स्पृश्यास्पृश्यता यांचे प्रस्थ आहे. शहरात येऊन शहरी वातावरणाचा लाभ घेऊनही आपापल्या गावी गेल्यावर हेच लोक पुन्हा आपली जात, धर्म, पारंपारिक चालीरीती सांभाळत राहतात. या साऱ्या दुष्टचक्रातून ग्रामीण समाजाला मुक्त करायचे असेल तर समाजसेवी संस्थांनी आणि सेवाभावी युवकांनी ग्रामीण जीवनाच्या ज्वलंत समस्या सोडवण्यात पुढाकार घेतला पाहिजे.

**वाघ केतन तात्याभाऊ**
एस.वाय.बी.ए.

## महाविद्यालय ...

महाविद्यालय आमचं छान
हे आहे रुई छत्तीसी गावाची शान
विद्यालय आमचं महान
तिथे मिळतो सर्वांना मान
विद्यालय आमचं आहे नदी तिरावर
परंतु राज्य करते प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनावर
विद्यालय आमचे शिस्तीचे नेक
कारण त्याचे प्राचार्य बाबर सरांची देखरेख !
विद्यालय आहे बाबर सरांच्या नियंत्रणात
शिक्षण कार्याला समाजाची उत्तम साथ
विद्यालयाच क्रिडांगण दिसायला लहान
परंतु येथूच खेळाडू बनले महान
विद्यालय म्हणजे ज्ञानाचा साठा
म्हणूनच इथे नाही बुध्दीनिष्ठ प्राध्यापकांचा तोटा
विद्यालय आमचं अध्यापनात महान
म्हणूनच इथे येण्याची विद्यार्थ्यांना लागते तहान ...?

**बोरुडे दिपाली बाळू**
एफ.वाय.बी.एस्सी.

# भूगोल

भूगोलाला इंग्रजीमध्ये Geography हा शब्द आहे. या शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील शब्द Geo आणि Graphiya या शब्दापासून झालेली आहे. या दोघांचा अर्थ Earth किंवा पृथ्वी असा होतो. Graphein या शब्दाचा वर्णन करणे किंवा लिहीणे होतो. या दोन शब्दांचा विचार केल्यास पृथ्वी आणि तिच्या वैशिष्ट्यांचा. पृथ्वीवरील जैवविविधतेचा आणि मानवी उत्क्रांतीचा आणि तिच्या कार्यांचा अभ्यास करणे हा भूगोलाचा उद्देश आहे. मराठीतला भूगोल हा शब्द संस्कृतमधून जसाच्या तसा घेतला आहे. भूगोल म्हणजे पृथ्वीचा गोल. हा शब्द भूगोलाचा अभ्यास या अर्थानेही वापरला जातो. भूगोलशास्त्रज्ञ चार पारंपारिक विचारांतुन भूगोलाच्या अध्ययनावर भर देतात. यामध्ये

१) नैसर्गिक आणि मानवी क्रिया

२) भूवैशिष्ट्यांचा अभ्यास

३) मानव आणि पृथ्वी यांचा सहसंबंध आणि

४) भू-शास्त्र यांचा समावेश होतो. पारंपारिकदृष्ट्या भूगोल आणि भू-वैज्ञानिक यांना स्थळांच्या अभ्याससंदर्भात एकाच वगात ठेवले जाते. जरी भू-वैज्ञानिक हे भू-शास्त्रामध्ये आणि नकाशातंत्रांत पारंगत असले तरी फक्त भौगोलिक नकाशे बनविणे एवढाच त्यांचा उद्देश नसतो. त्यांच्या अध्ययनात पृथ्वी व अवकाश यांच्या मानवाशी येणाऱ्या संबंधाचा अभ्यास करणे इत्यादींचा समावेश असतो. प्रत्येक क्षेत्राच्या प्रगतीत आर्थिक वैद्यकीय सुविधा, हवामान, वनस्पती तसेच भूगोलाचे अध्ययन या सर्वांचा एकमेकांवर प्रभाव असतो. एखाद्या ठिकाणचा फक्त अभ्यास करणे म्हणजे भूगोल नव्हे. आजच्या जगामध्ये भूगोल हा समाज आणि पर्यावरण यांना जोडण्याचे काम करत असलेले दिसून येते.

**दोन मुख्य उपशाखा –** भूगोल हे शास्त्र असून त्याच्या मानवी भूगोल व भौतिक किंवा प्राकृतिक भूगोल अशा दोन मुख्य उपशाखा आहेत. उल्लेखिलेल्या दोन्ही उपशाखांमध्ये पर्यावरण आणि जीवावरण यांच्या निर्मितीचा अभ्यास होतो. यातील मानवी भूगोलाच्या उपशाखेचा मानवी दृष्टिकोनातून मानवाचा पर्यावरणावर होणारा प्रभाव व मानवाचे पृथ्वीवरील महत्व यांचा अभ्यास करणे हा उद्देश आहे, तर भौतिक भूगोलाच्या उपशाखेत पर्यावरण, वातावरण, जलावरण, वनस्पती, जीवन मृदा किंवा माती, जल आणि भूरचना हे सर्व कशाप्रकारे एकमेकांवर प्रभाव टाकतात यांचा अभ्यास केला जातो. या दोन्ही शाखांचा अभ्यास करताना पर्यावरणीय भूगोल या तिसऱ्याच शाखेची निर्मिती झाली. या शाखेत या दोन्ही शाखांचा एकमेकांवर पडणाऱ्या प्रभावातून निसर्ग व मानवाचासंबंध लक्षात येतो.

**भूगोलाचा इतिहास –** भूगोलाचे अध्ययन प्राचीन ग्रीक संस्कृतीधमद्ये केलेले आढळते. ग्रीकांनी शास्त्र व तत्वज्ञान म्हणून भूगोलाचे अध्ययन केले आणि पृथ्वीचा आकार व तिची रचना कशी आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. प्राचीन ग्रीक शास्त्रज्ञ ॲरिस्टॉटलने पृथ्वी गोल आहे असे सांगितले व इरॅथोसिनने पृथ्वीच्या परिघाचे मापन केले. रोमनांनी पृथ्वी हे विश्वाचे केंद्र आहे असे मानून नकाशेसुद्धा तयार केले. विश्वाला ३६० अंशामध्ये विभागून अक्षांश व रेखांशाची कल्पना मांडली. मध्ययुगाच्या काळात रोमन संस्कृती लयाला गेली आणि भूगोलाची ज्ञानसंपदा युरोपकडून मुस्लिम जगाकडे आली. इद्रिसी, इब्न बतूत, इब्न खलादुन यासारख्या वैज्ञानिकांनी त्यांच्या हाजींना ही माहिती भाषांतरित करुन पुरविली. आणि नंतरच्या कालावधीत रोमन व ग्रीकांची सर्व साहित्यसंपदा अनेक शास्त्रज्ञांनी अनुवादित केली व बगदार येथे विश्वविद्यालयाची स्थापना केली.

सोळाव्या व सतराव्या शतकांमध्ये क्रिस्तोफर कोलंबस, मार्को पोलो व जेम्स कूक यांनी पुष्कळ नवीन प्रदेशांचा शोध लावला. त्यांचय अनुभवांवरुन काही नकाशे नव्याने तयार करण्यात आले. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांमध्ये भूगोलाला वेगळ्या अध्ययनशास्त्राचा दर्जा प्राप्त होऊन युरोपमधील प्रमुख विश्वविद्यालयांमध्ये भूगोलाचे अध्ययन होऊ लागले. यात प्रामुख्याने पॅरिस व बर्लिन विश्वविद्यालयांचा समावेश होतो. अठराव्या शतकांमध्ये भूगोलाच्या अभ्यासाकरिता अनेक भौगोलिक संस्था स्थापन करण्यात आल्या. त्यात १८२१ साली स्थापन झालेली रॉयल जिओग्राफीकल सोसायटी, १८४५ साली स्थापन झालेली

रशियन जिओग्राफीकल सोसायटी १८८८ साली स्थापन झालेली नॅशनल जिओग्राफिक सोसायटी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. भूगोलाचा तत्वज्ञानाच्या शाखेपेक्षा विज्ञानाच्या शाखेशी संबंध जोडण्यासाठी रिम्युल कान्ट, अलेक्झांडर दोन हुम्बोल्ट कार्ल रिटर आणि पॉल विडाल डी ला ब्लँचे यांनी योगदान दिले. गेल्या दोन शतकांमध्ये संगणकाच्या नवशोधामुळे भूगलाच्या अध्ययनात आणि इतर संबंधित पद्धतींचा वापर प्रभावीपणे होत आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये विसाव्या शतकापासून पर्यावरणीय सिद्धान्त, प्रादेशिक भूगोल, परिणामीय क्रांती समालोचनात्मक भूगोल अशा विविध मार्गांनी भूगोलाचे अध्ययन होत आहे. भूगर्भशास्त्र, वनस्पति शास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, जनसंख्या अध्ययनशास्त्र यांचा भूगोलाशी घनिष्ट असा आंतर संबंध आहे आणि यामुळे भू-शास्त्राचे सर्वांगाने अध्ययन होण्यास मदत होत आहे.

**गुंड प्रियंका**
टी.वाय.बी.ए.

## मैत्रीचं नातं ...

जिथे खूप सार हासणं
थोडसं रुसण
चेहरा पाहता क्षणी दु:ख
सार ओळखलं जातें
नाही नको म्हणता बोलायला
भाग पाडते
शब्द नाही तर भावना न आपोआप
व्यक्त होतात
अनोळखी व्यक्ती खूप जपली
होवून जातात
हे नातच असत असा काही न स्वार्थ
बाळगता सर्व नाती जपली जातात
बोलायला गेल तर शब्द कमी पडतात
कारण यालाच तर मैत्रीचं नातं म्हणतात ...!

**घोंगडे आंबिका सोमनाथ**
एस.वाय.बी.ए.

## मातृभाषा

मराठी मातृभाषा म्हणजे नक्की काय हो ? तर ज्या भाषेचे आपल्यावर लहानपणापासुन संस्कार झालेले आहेत. ज्या भाषेचा जन्मापासुन आधार घेत आपण ज्ञान प्राप्त करत आहोत. ज्या भाषेच्या आधाराने आपल्या आई वडिलांनी आपल्याला घडवलं. ज्या भाषेतून आपण सतत एकमेकांशी संवाद साधतो भांडतो, गप्पा मारतो इत्यादी गोष्टी करतो ती आपली मातृभाषा होय. मातृभाषेला 'आईच' म्हटलेलं आहे. हल्लीच्या काळात इंग्लिश भाषेचा वापर आपल्याला पदोपदी करावाच लागतो. जागतिक स्तरावर इंग्लिशलाच प्राधान्य आहे हे आपल्याला माहिती आहे. इंग्लिश चांगलं बोलता, लिहिता, वाचता आलंच पाहिजे त्यासाठी इंग्लिश भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी इंग्लिश वाचन-लिखाण करणे. इंग्लिश गाणी ऐकणे. इंग्लिश फिल्म्स बघणे. एकमेकांशी इंग्लिशमधून संवाद साधणे अशा अनेक गोष्टी आपल्यालाच कराव्याच लागतात. पण हे सगळं करताना आपण आपली मातृभाषा विसरतोय का हो ? इंग्लिश भाषेचा प्रभाव आपल्यावर जसा जसा वाढत जातो. तसं तसं आपण सगळ्याच ठिकाणी इंग्लिंश बोलायला सुरुवात करतो मग समोरची व्यक्ती मराठी भाषिक जरी असली तरी आपण इंग्लिश मध्येच फाड फाड बोलतो आणि आपल्या मातृभाषेचा वापर आपण कमी करतो. मग ते आपल्या घरात असो. मित्र-मैत्रिणींशी असो किंवा नातेवाईकांशी असो का बरं आपण असं करतो ? आपली मूळ ओळख जपण्यासाठी आपण प्रयत्नशील का नाही आहोत ? मातृभाषेत बोलताना आपण अनायासे काही इंग्लिश शब्द वापरतोच कारण काही

प्रमाणात संवाद साधायला ते शब्दसोपे जातात. त्यानंतर फेसबुक, व्हॉटस्‌अप, इन्स्टाग्राम, इत्यादी अशा ॲप्स वर सुध्दा अनेक वेळेला आपण इंग्लिशनेच चॅटिंग करतो. कारण इंग्लिश टायपिंग करणे खूप सोपं जातं तिथपर्यंत ठीक आहे. आपण परदेशात टुर वर जातो. तिथे शिक्षणासाठी काही काळ जातो. तिथे शिक्षणासाठी काही काळ जातो किंवा स्थायिक व्हायला जातो. आता आपण ज्या ठिकाणी जास्त काळ राहतो. तिथल्या अनेक गोष्टींचा आपल्यावर परिणाम होत असतो. त्यात तिथल्या प्रातांतल्या भाषेचा सुध्दा आपल्यावर प्रभाव पडत असतो मग हळूहळू आपल्याकडून मातृभाषेचा वापर कमी होत जातो आणि आपण सर्व काळ इंग्लिश मध्येच बोलू लागतो. एवढंच नाही तर तिकडची माणसं ज्या प्रकारे शब्द उच्चारतात तसाच उच्चार आपणही नकळत पणे करु लागतो ते वाईट आहे असं नाही. पण एखाद्या गोष्टींचा आपल्यावर किती प्रभाव पडतोय याचा नीट विचार आपण केलाच पाहिजे. जेव्हा परदेशातली माणसं भारतात येतात. तेव्हा ती माणसं आपपसांत मराठी, हिंदी, गुजराती, तमीळ, तेलुगे या भाषेत बोलतात का ? तर नाही, ती माणसं एकमेकांशी बोलताना फक्त त्यांच्या मातृभाशेतच बोलतात. इंग्लिश चांगलं बोलता आलंच पाहिजे. पण आपण जरा हा विचार करुया की परदेशातल्या माणसांना ही भीती कधी असते काकी मी जर उद्या भारतात गेलो आणि मला हिंदी नाही आलं तर लोकं मला काय म्हणतील ? नाही.

परदेशातली माणसं जर कुठेही गेल्यावर बिनधास्त पणे त्यांच्या माणसांशी त्यांच्याच भाषेत बोलतात. तर मग आपण आपल्या मातीशी एकनिष्ठा का राहू नये ? आणि अगदी चांगलं उदाहरण द्याचं झालं तर ते दक्षिण भारतीयाचं देता येईल काहीही होवो ते लोक आपली भाषा अजिबात सोडत नाहीत. एक तर मातृभाषेतच बोलायचं आणि समजा समोरच्या माणसाला जर नाहीच समजलं तर इंग्लिश मग ना तिथे मराठी, ना हिंदी किंवा अन्य कुठल्याही भाषा नाहीत द.भारतातली लोकं इतकी कट्टर असल्यामुळेच त्यांची संस्कृती आजपर्यंत टिकून आहे. आणि मुळातच आपण एखाद्या गोष्टीचं अनुकरण का करतो ? तर त्या गोष्टीला पण आपल्या नजरेत श्रेष्ठ मानत असतो.

इंग्लिश भाषा वाईट आहे किंवा इंग्लिश बोलणाऱ्यांचा व्देष करावा, इंग्लिश बोलूच नये असं अजिबात नाही. इंग्लिश आलंच पाहिजे आज कित्येकांना इंग्लिश बोलता येत नाही तर नोकरी मिळत नाही. त्यामुळे इंग्लिश ही काळाची गरज आहे. पण इंग्लिश इंग्लिशच्या ठिकाणी आणि आपली मातृभाषा तिच्या ठिकाणी त्यामुळे जिथे इंग्लिश बोलायची गरज आहे. तिथे अस्खलीत इंग्लिश बोलावं पण जिथे सहज संवाद होऊ शकता. ज्या ठिकाणी आपल्या मातृभाषेत आपण बोलू शकतो तिथे आपण इंग्लिश बोलण्याचा खोटा अभिमान न मिरवता स्वाभिमानाने आपण आपल्या मातृभाषेतच बोललं पाहिजे.

कारण इथे ना कोणी श्रेष्ठ आहे, ना कोणी कनिष्ठ इथे सर्व समान आहेत ...............

**मुटकुळे अश्विनी**
एस.वाय.बी.ए.

## विचारधन

आपले जीवन हे फुलासारखेच पण फक्त असंख्य पाकळ्यांचे फूल. फुलासारखेच ते पाकळी पाकळीने उमलत जाते. फुलाच्या उमलण्याचा जसा आलेख काढतायेत नाही, तसेच एखाद्याचे आयुष्य कसे जाईल याचे गणित मांडता येत नाही. फरक एकच असतो. फुलाच्या पाकळ्या गळून पडतात आणि आयुष्याच्या फुलाच्या असंख्य पाकळ्या स्मृतीरुपानं राहतात, नाहीशा होत नाही, ताज्या टवटवीत राहतात. मग त्या सुखाच्या दुःखाच्या कसल्याही असोत आणि हे अगणित पाकळ्यांचे कमळच जेव्हा देठापासून दूर होते तेव्हाच त्याही अनंतात विलिन होतात.

**वाळके माधुरी मोहन**
एफ.वाय.बी.एस्सी.

# ती एक आई होती



पावसाळ्याचे दिवस सुरु होते. पावसाने राज्यात थैमान घातले होते. पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. घरातून बाहेर निघण्याची सोय नव्हती. आणि अशा परिस्थितीत अजय आणि मेघा त्यांच्या चार चाकी कार ने घरी निघाले होते. पावसामुळे समोरचे काही दिसत नव्हते, म्हणुन अजय कार हळु चालवत होता. दोघांना घरी पोहचायला उशीर होणार होता आणि पाऊस त्यांच्या वाटेत अजुन बाधा घालत होता. दोघेही वैतागले होते. पण निसर्गापुढे कोणाचे काही चालले आहे का ? हळूहळू रात्र झाली. ढगाळलेल्या वातावरणामुळे काळोख अगदी गडद झाला. आता सरळ रस्ता संपूर्ण घाटउतार सुरु झाला होता आणि अचानक मध्येच काळ्या अंधाराला चिरत एखादी वीज जणू पावसाच्या प्रचंडतेची जाणीव अजय आणि मेघाला करुन देत होती. पावसाळ्याचे दिवस असल्याणे गाड्यांचा वावरदेखिल कमी झाला होता. घाट उतारावरिल एका वळणावर अजयणे गाडीला जोरदार ब्रेक लावला. जोरदार आवाज आला. कार थोडी घसरली. त्या धक्क्याने कारचा हेडलाईट बंद पडला. कारदेखिल घाटाच्या मध्यावर बंद पडली. मेघाला क्षणभर सुचलेच नाही काय झाले ते ती कावरी-बावरी होऊन अजयवर ओरडली. पण अजयला काळोखात जे दिसलं ते मेघाच्या डोळ्यांनी पाहली नव्हतं. आणि चकमणाऱ्या विजांच्या पांढऱ्या प्रकाशात त्याला एक बाई. त्याच्या कारच्या पुढे उभी असलेली दिसली. अंगावरील कपडे फाटके होते. डोक्यातुन रक्त येत होते. हात पाय रक्ताने माखले होते. जणु त्या बाईचा आत्ताच अपघात झाला होता. ती बाई कारपासुन थोड्या अंतरावर उभी होती. आता तर मेघाचे देखिल तिच्याकडे लक्ष गेले. आणि भीतीपोटी मेघाच्या तोंडून मोठी किंकाळी निघाली ती प्रचंड घाबरलेली होती. अजय तिला समजावत होता. पण तिचे घाबरणे कमी होत नव्हते. तिला धाप लागली होती. ती बाई धावतच अजयच्या कारजवळ आली. मेघाने झटपट खिडक्यांच्या काचा वर घेतल्या इतक्यात त्या बाईचे रक्ताने माखलेले हात कारच्या काचेवर रेंगाळू लागले. अजय देखील मनातुन घाबरत होता. त्याने कार चालु करण्याचा खूप प्रयत्न केला पण कार चालू नाही त्या बाईचे रक्ताने माखलेले हात काचेवर फिरतांना पाहुन मेघा घाबरली होती. तिला सावरणे अजयसाठी कठीण झाले होते. इतक्यात अजयचे लक्ष त्या बाईच्या हातांकडे गेले. त्या बाईचे दोनही हात अजय आणि मेघा समोर जोडले गेले होते. जणू ती बाई मदत मागत होती. अजयने मनाशी काहीतरी विचार केला आणि कारमधुन घाबरतच बाहेर पडला. मेघाही त्याच्या पाठोपाठ उतरली. इतक्यात त्या बाईने अजयचे पाय पकडले आणि रडू लागली. रडत रडत बोलू लागली. माझा अपघात झाला आहे आणि माझी गाडी दरीत अडकली आहे. माझा चार वर्षांचा मुलगा त्या गाडीत अडकला आहे. कृपा करुन तुम्ही त्याला वाचवा आणि पुन्हा रडु लागली. पण अजयने त्या बाईला मदत करण्याचं पक्क केल होतं. तो त्या बाईला म्हणाला. चला ताई दाखवा कुठे आहे तुमची कार मी करतो तुम्हाला मदत आणि ती बाई पुढे चालू लागली तसे तिच्या पाठी आणि मेघादेखिल चालू लागले ते दोघेही दरीच्या एका उंच कड्यावर पोहचले होते.

अजयला तिथून रडणाऱ्या बाळाचा आवाज स्पष्ट येत होता. वरुन पावसाची तिरीप डोळे उघडायची संधी देत नव्हती. अशा मुसळधार पावसात अजय त्या छोट्या जिवाचे प्राण वाचवण्यासाठी स्वत:चे प्राण धोक्यात घालुन एक एक पाऊल दरीत उतरत होता. दरी खोल नव्हती पण तरी जीवघेणी मात्र नक्कीच होती. अजय जसजसा त्या कारच्या जवळ पोहचत होता. तसतसा त्या मुलाच्या रडण्याचा आवाज तीव्र होत होता. अजय आता त्या कारच्या खिडकीजवळ आला होता. त्याला ते मुल तिथे रडताना दिसत होते. त्याने जवळुन अंधरात चाचपडत एक दगड उचलला आणि खिडकीची काच फोडुन त्या मुलाला बाहेर काढले. ते मूलदेखिल अजयच्या हातात येताच रडायचे शांत झाले. अजयने त्याला दरीतून बाहेर काढताना त्याला कारच्या चालकाच्या सिटवर कोणी तरी असल्याचे जाणवले म्हणून तो त्या मुलाला दरीतुन बाहेर काढून मेघाजवळ सोपवून पुन्हा त्या दरीतअडकलेल्या गाडीत नक्की काय आहे ते पाहण्यासाठी दरीत पुन्हा उतरु लागला. कारजवळ गेल्यावर त्याने त्या अपघातग्रस्त कारमध्ये चालकाच्या सीटवर नीट डोकावून पाहिले. त्याने जे पाहीले ते ह्रदयाला धक्का देणारे होते. त्या सीटवर एका बाईचा मृतदेह पडला होता. अजययने अजुन नीट पाहीले तेव्हा तो आणखिनच अवाक् झाला. तो मृतदेह त्याच बाईचा होता. जी त्याच्याकडे तिच्या मुलाचे प्राण वाचवण्यासाठी मदत मागायला आली होती. त्याने कसलाही विचार आणि बोभाटा न करता दरीतुन काढता पाय घेतला. तो दरीतून वर आल्यावर मेघाने आजुबाजुला पाहीले आणि अजयला विचारले कोण होती ती बाई ? ती तुझ्या मागे आली होती. अचानक कुठे गेली ? यावर अजयने एकच उत्तर दिले.

''ती एक आई होती ...!''
मेल्यानंतरही मुलाचं स्मरण करणाऱ्या
माऊलीला आई म्हणतात.

**रोहिणी भांबरे**
टी.वाय.बी.ए.

## बाबा

स्वप्न पूर्ण करायला
दृष्टीला तेज देतो,
आकाशात उंच भरारी घ्यायला
पंखांना बळ देतो,
आयुष्यातले कच्चे दुवे,
पक्के करायला खपतो,
भरकटलेल्या जगात
जगायला वाट दाखवतो
असा हा बाबा
नेहमीच पाठीशी उभा असतो
सूर्याने साथ सोडली तरी
चंद्र बनून प्रकाश देतो

**निसळ रेवती**
एस.वाय.बी.एस्सी.

## २३ डिसेंबर शेतकरी दीन

कडाक्याचे ऊन असो
वा सोसाट्याचा वारा
किंवा बरसत असो
पावसाच्या ओल्याचिंब धारा ...
आमचा बळीराजा शेतात
दिवसभर राबतो
त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत
हे एकच मागणे मागतो ...

**राऊत सोनाली**
एस .वाय.बी.एस्सी.

## डिजिटलायझेशन द्वारे विकास

सर्व ठिकाणी अतिशय वेगाने डिजिटलायझेशन होत आहे. डिजिटल डेटा निर्मीतीच्या खगोलशास्त्रीय गतिमुळे माहिती साठविण्याचा आणि त्यासाठीच्या पायाभुत सुविधांचा खर्च कमी झाला असुन अभुतपुर्व स्तरावर डिजिटलायझेशन शक्य झाले आहे. यालाच चौथी औद्योगिक क्रांती म्हणता येईल. केंद्र सरकार तसेच विविध राज्य सरकारांनी भारताला डिजिटल करण्यासाठी या तंत्रज्ञानाच्या स्वयंप्रेरीत अवलंबानाला सुरुवात केली आहे.

जगामध्ये प्रत्येक क्षेत्रात अतिशय वेगाने डिजिटलायझेशन होत आहे. मग ते क्षेत्र उत्पादन बनवून विकण्याचे असो, दैनंदिन जीवनातील मानवी व्यवहार असो किंवा सरकारने त्यांच्या नागरिकांना दिलेल्या सामाजिक सेवा असोत. या सर्व ठीकाणी अतिशय वेगाने डिजिटलायझेशन होत आहे. डिजिटल डेटा निर्मितीच्या खोगलशास्त्रीय गतीमुळे माहिती साठविण्याचा आणि त्यासाठीच्या पायाभुत सुविधांचा खर्च कमी झाला असून टीतपुर्व स्तरावर डिजिटलायझेशन शक्य झाले आहे. यालाच चौथी औद्योगीक क्रांती म्हणता येईल. केंद्र सरकार तसेच विविध राज्य सरकारांनी भारताला डिजिटल करण्यासाठी या तंत्रज्ञानाच्या स्वयंप्रेरीत अवलंबनाला सुरुवात केली आहे.

व्यवसायाच्या प्रक्रियेमधील पुनर्रचना, तंत्रज्ञान आणि माहिती च्या विश्लेषणाद्वारे गेल्या काही वर्षात. भारतातील शासनाच्या विविध क्षेत्रामध्ये परीवर्तन घडून आले आहे. शासनाच्या विविध योजना आणि त्यांची अंमलबजावणी यांच्या पद्धतीमध्ये तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बदल घडुन आला आहे. तंत्रज्ञानाच्या अवलंबामुळे शासनामध्ये उत्तम प्रणाली अधिक कार्यक्षमता आणि गहन प्रभाव दिसायला सुरुवात झाली आहे.

सरकाने इ-गव्हर्नस आणि डिजिटलायझेशनचे अनेक लहान मोठे कार्यक्रम सुरु केले जे नंतर **'डिजिटल इंडिया'** या कार्यक्रमाच्या पटलावर एकत्र आले. मोबाईल आणि क्लाऊड सारख्या नवीन गोष्टींचा अवलंब वाढत असल्यामुळे शासनामध्ये परिवर्तन घडविण्यासाठी इ-गव्हर्नस मध्ये परीवर्तन या

दृष्टीकोनातुन डिजिटल इंडिया कार्यक्रमाची पुनर्रचना करण्याची गरज भासू लागली. त्यामुळे राष्ट्रीय इ-गव्हर्नस आराखडा २.० मधील इ-क्रांती अतंर्गत ३१ मिशन मोड प्रकल्पांना सुरुवात झाली. सर्व इ-गव्हर्नस प्रकल्पामध्ये इ.क्रांतीच्या, भाषांतर नाही तर परिवर्तन, 'वैयक्तिक सेवा नाही तर एकात्मिक सेवा' 'प्रत्येक एमएमपी मध्ये सरकारी प्रक्रिया पुनर्रचना (जीपीआर) अनिवार्य असणे आवश्यक आहे. 'आय.सी.टी.' मागणी नुसार पायाभुत सुविधा. 'मुलभुतरित्या काउडचा वापर', 'मोबाइलला प्राधान्य' 'जलद गतीने मंजुरी', अनिवार्य मानके आणि शिष्टाचार भाषेचे स्थानिकीकरण', 'राष्ट्रीय जाआयएस (भौगोलिक स्थानिक माहिती प्रणाली)' आणि 'सुरक्षा आणि इलेक्ट्रॉनिक डेटा जतन करणे. यांसारख्या महत्वाच्या तत्वांच्या अवलंबाला सुरुवात झाली.

सरकारी जनकल्याण कार्यक्रमांमध्ये अवैध लाभार्थीची संख्या कमी करण्यासाठी देशाने अद्वितीय अशी ओळख पटविणारी यंत्रणा निर्माण करणे आणि सामाजिक फायदे प्रभावी ठरण्यासाठी आर्थिक बाबींचा समावेश करणे या दोन्हीचा एकत्रितपणे वापर केला. आतापर्यंत सुमारे ४३७ योजनामध्ये थेट लाभ हस्तांतरणा च्या अंमलबजावणी मुळे ८३,००० कोटी रुपयांची बचत झाली आहे. या अंमलबजावणी मुळे २ कोटी ७५ लाख नकली खोट्या किंवा अस्तित्वात नसलेल्या शिधापत्रिका हटविण्यात आल्या. तसेच स्वयंपाकाच्या गॅसच्या अनुदाणासाठीचे ३ कोटी ८५ लाख नकली आणि निष्क्रीय ग्राहक काढुन टाकण्यात आले.

**सार्वजनिक वित्त आणि सार्वजनिक खरेदी डिजिटल होताना** - सर्व प्रकल्पांच्या योजना, सर्व प्राप्तकर्त्या संस्थांसाठी डेटाबेस, कोअर बॅकींग सोल्यूशन सह बॅकांचे एकीकरण, राज्य खजिनदारांचे एकात्मीकरण आणि नियमीत स्वरुपाच्या योजनांच्या अंमलबजावणीतील सर्वात खालच्या स्तरावरील विविध प्रवाहावर लक्ष ठेवणे यासाठी आर्थिक व्यवस्थापन मंच बनवण्यासाठी सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापन प्रणालीचा उपयोग होतो. योग्य वेळी निधी वितरण, निधीच्या वापराचे कार्यक्षम व्यवस्थापन. आणि त्याचा योग्य उपयोग यासाठीही अतिशय महत्वाचे ठरते. PFMS प्रणालीद्वारे २८ मार्च रोजी, ९८ लाख व्यवहारातन, ७२,००० कोटी रुपयांची डिजिटल स्वरुपात देवाण घेवाण झाली. एकाच दिवसांत इतक्या डिजिटल व्यवहारांवर प्रक्रीया करण्याची ही नोंद आहे.

नेहमी वापरल्या जाणाऱ्या कमी किंमतीच्या वस्तु आणि सेवांसाठी एक खिडकी ऑनलाइन खरेदीसाठी २०१६ मध्ये शासनाचे इ-बाजार (GEM) सुरु करण्यात आले त्याचप्रमाणे केंद्रीय सार्वजनिक खरेदीदार पोर्टलची सेवा. इ. प्रोट्युअरमेंट हे जास्त किंमतींच्या वस्तुंसाठी (२ लाख आणि त्यापेक्षा जास्त किंमतीच्या) सुरु करण्यात आले जीइएम मुळे थेट खरेदी, इ-बोली, रिव्हर्स इ-लीलाव, सरकारी कामासाठी ऑनलाईन नोंदणी सुविधा अशा सुविधा मिळाल्या उत्पादन विक्रेते, सेवा पुरवठादार, इत्यादींना थेट खरेदी करता येऊ लागली. तसेच यामुळे सरकारी खरेदीसाठी बाजारपेठ पुरविणे शक्य झाले आहे.

स्वयंप्रेरीत शासन आणि वेळेनुसार अंमलबजावणी (प्रगती) कार्यक्रमामध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी, अंमलबजावणी जलद व्हावी म्हणुन तंत्रज्ञानाचा वापर करुन विभागीय अलिप्तता आणि भौगोलिक सीमा कमी केल्या. सामाजिक क्षेत्रातील योजना आणि पायाभुत प्रकल्प यांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्या बाबत निरिक्षण करण्यासाठी, आढावा घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रगतीचे मुल्यांकन करण्यासाठी, प्रधानमंत्री मोदी हे केंद्र आणि राज्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या थेट संपर्कात राहिले व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारा प्रधानमंत्री मोदी यांनी २५ 'प्रगती बैठका घेऊन, साडेदहा लाख कोटी रुपयांचे २२७ प्रकल्प मार्गी लावले.

सरकारी प्रक्रिया आणि योजनांमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि तंत्रज्ञानाच्या क्षमतांचा उपयोग करुन घेण्याविषयी सरकार प्रयत्न करीत आहे. नीती आयोगामध्ये कृत्रीम बुद्धिमत्तेवरील राष्ट्रीय कार्यक्रम विकसीत करण्याचे काम अनिवार्य करण्यात आले असून, मंत्रालय, शैक्षणिक संस्था,

उद्योग संशोधक आणि स्टार्ट अप कार्यक्रम यांच्या बरोबर चर्चा सुरु आहे. तंत्रज्ञान समजुन घेणे, अर्थव्यवस्थेसाठी तसेच शासनासाठी त्याची उपयुक्तता जाणणे, त्यांचे धोके आणि भविष्यातील विकासाचे मार्गक्रमण याविषयी जाणुन घेण्याचा हा एक दर्जात्मक प्रयत्न आहे. याशिवाय नीती आयोगाने, अत्युच्च तंत्रज्ञानाचे फायदे जाणुन घेण्यासाठी आणि प्रदशिक्षत करण्यासाठी, राष्ट्रीय प्राधान्य असलेल्या क्षेत्रात, विशिष्ट उपयोग प्रकरणी. या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीला सुरुवात केली आहे. याला संकल्पनेच्या पुराव्याचे प्रकल्प (POC) असे म्हटले जाते, आणि कृत्रीम बुदि्धमत्ता वापरुन अचुक शेती करणारे क्षेत्र, ब्लॉकचेक वरील जमिनींच्या नोंदी, कृत्रीम बुदिधमत्तेचा उपयोग करुन सहायक आरोग्यनिदान इत्यादी ठिकाणी याची चाचणी घेण्यात येते. अस्तित्वात असलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच शासनामध्ये राष्ट्रीय अवलंब करण्यासाठी अत्युच्च तंत्रज्ञानाची व्यवहार्यता तपासणे हे या पीओसी चे ध्येय आहे.

गेली कित्येक वर्षे, सामान्य माणसाला सरकारी सेवामध्ये प्रवेश मिळवणे दुरापास्त झाल्यामुळे, भारत हे एक जटील राष्ट्र झाले होते. सर्व क्षेत्रांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा जलद अवलंब केल्यामुळे, मानवी हस्तक्षेपाच्या सर्व प्रकारच्या समस्या दूर होवून गोष्टी सोप्या झाल्या आहेत. याचा शासनाच्या कार्यक्षमतेवर आणि परिणामकारकतेवर मोठा प्रभाव पडला आहे.

**गोरे किरण**
एफ.वाय.बी.ए.

## झाडे लावा, झाडे जगवा ..!!

याड लागलंय ऽऽऽ याड लागलंय ऽऽऽ
हे गाणं म्हणण्याऐवजी
झाड लावलंय ऽऽऽ झाड लावलंय ऽऽऽ
असं म्हणून, तसं वागलो
तर निसर्गसुध्दा,
झिंग झिंग झिंगाट होईल...

**राऊत सोनाली**
एस .वाय.बी.एस्सी.

## भारतातील आर्थिक मंदी व लघुउद्योगांचे भवितव्य

जागतिक बँकेच्या २०१८ च्या क्रमवारित भारतीय अर्थव्यवस्था सहाव्या क्रमांकावरुन घसरुन सातवया क्रमांकावर आली आहे. २०१७ च्या क्रमवारीत भारतीय अर्थव्यवस्थेचे आकारमान २.५६ ट्रिलियन डॉलर्स होते. यामध्ये २०१८ मध्ये अर्थव्यवस्थेच्या आकारमानात वाढ होऊन हा आकडा २.७३ ट्रिलियन डॉलर्स झाला. पण तरीही जागतिक क्रमवारित मात्र भारताची घसरुन झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक पातळीवर वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचे चित्र देशवासियांसमोर उभे केले जात हेते. परंतू जागतिक अर्थव्यवस्थेच्या क्रमवारित भारताची अर्थव्यवस्था घसरल्याने भारत जागतिक महासत्ता होण्यास अजून बराच कालावधी लोटला जाईल, हा प्रश्न देशातील अनेक अर्थतंज्ज्ञांकजून उपस्थित केला जात आहे.

२०१८ मध्ये अरविंद सुब्रमण्यम यांनी केंद्र सरकारच्या मुख्य आर्थिक सल्लागारपदाचा राजीनामा दिला होता. सुब्रमण्यम यांनी म्हटले होते, २०१२ ते २०१७ दरम्यान आर्थिक वाढीच्या दराचे जे आकडे सरकारने प्रसिध्द केले होते, ते प्रत्यक्षात कमी होते. सरकारने सुब्रमण्यम यांचे हे निष्कर्ष फेटाळून लावले हेते, हे विशेष. या वादाच्या गोष्टी बाजूला ठेवल्या तर असे दिसते की, २०२४ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन पर्यंत वाढविण्याचे

जे उद्दिष्ट पंतप्रधानांनी ठेवले होते. ते गाठणे सध्याच्या आर्थिक वाढीचा दर पाहता अवघड दिसत आहे.

भारतीय आर्थिक मंदीमुळे जे कोणी लघुउद्योग आहेत. त्यांच्यामध्ये विराशा पसरली आहे. कारण त्यांना अगोदरच नोटाबंदीचा सामना करावा लागला होता. त्यामुळे त्यांचे उद्योग अगोदरच डबघाईला आले होते. आता पुन्हा एकदा तीच झळ त्यांना बसत आहे. असं काहीस चित्र आपल्याला पहायला मिळत आहे.

या आर्थिक मंदीवर मॅक्स महाराष्ट्राने नक्की उद्योग क्षेत्रात मंदी आहे का ? हे जाणून घेण्यासाठी मॅक्स महाराष्ट्राच्या विशेष कार्यक्रम 'मंदी यात्रे' च्या माध्यमातून उद्योग क्षेत्रातील परिस्थिता जाणून घेतली.

या संदर्भात आम्ही एक तरुण उद्योजक अलिम यांची भेट घेतली. अलिम यांनी मॅक्स महाराष्ट्राशी बोलताना सांगितलेली. पाच वर्षापूर्वी मी व्यवसाय चालू केला होता. माझा व्यवसाय फॅब्रिकेशनचा आहे. अवघ्या वीस हजारांपासून चालू केला होता. आणि हळूहळू तो वाढत गेला. आत्ता पाच वर्षानंतर माझा व्यवसाय खूप वाढला आहे. पण सध्याच्या स्थितीत माझा व्यवसाय मंदावला आहे. माझी उधारी देखील मला भेटत नाही. आणि पैशांची शेलिंग व्यवस्थित होत नाही. त्यामुळे मला चिंता वाढते आणि मला तर नोटाबंदीचा खूप मोठा फटका बसला होता. जवळ-जवळ ६ महिने माझा व्यवसाय बंद होता. अस अलिम यांनी मॅक्स महाराष्ट्राशी बोलताना सांगितलं.

आगामी वर्षभरात आठ वर्षातील सर्वात मोठी मंदी येण्याची शक्यता आहे. जगभरातील एक तृतीयांश फंड मॅनेजरनी या शक्यतेला दुजोरा दिल्याचे बँक ऑफ अमेरिकेला मेरिल लिंचने म्हटले आहे. मेरिल लिंचच्या मते ३४% फंड मॅनेजरनी वर्षभरात मोठ्या प्रमाणात मंदी येण्याचे भाकित वर्तवले आहे.

**अक्षय पवने**
एस.वाय.बी.ए.

## बे-रोजगार

आज २१ व्या शतकात वावरत असताना भारतालाच नव्हे तर संपुर्ण जगाला बेकारीची म्हणजेच बेरोजगारीची समस्या भेडसावत आहे. बेरोजगाराची अशी व्याख्या मला करता येणार नाही. तरीही मला वाटत बेरोजगारी म्हणजे -''आपल्याकडे गुणवत्ता असुन, कौशल्य असुन, प्रचलीत वेतनावर काम करण्याची इच्छा व क्षमता असुनही त्या व्यक्तीला रोजगार उपलब्ध होत नाही त्या व्यक्तीला आपण बेकार किंवा बेरोजगार म्हणु शकतो.''

आज आपण भारताच्या इतिहासातील एका महत्वाच्या टप्प्यावर आहोत. विकासाचे आकडे काहीसे रहस्यमई वाटत आहेत. परंतु कोणीही विकासवाढ झाल्याचा दावा करत नाहीत. एका गोष्टीत मात्र अजीबात वाद नाही की गुंतवणुकीचे आकडे खाली येत आहेत. म्हणजेच आले आहेत या सर्व वादाच्या केंद्रस्थानी आहेत रोजगारीचे आकडे. रोजगाराची आकडेवारी ही मोठ्या प्रमाणात घसरलेली आहे. व बेरोजगारीची आकडेवारी वाढलेली आहे.

बेरोजगारी ही कुठल्याही देशाच्या विकासामध्ये सर्वात मोठी बाधा म्हणुन काम करते भारतात बेरोजगारी हा एक गंभीर मुद्दा आहे. बेरोजगारी ही एका व्यतीलाच नाही, 'तर संपुर्ण समाजाला प्रभावित करते.'

भारतात बेरोजगारी वाढण्याचे कारणे :-

१) **लोकसंख्यावाढ** - देशाच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात होत असलेली वाढ हे बेरोजगारीत वाढ होण्यास प्रमुख कारणांमधील एक कारण आहे.

२) **आर्थिक विकासात मंदी** - देशात मंद गतीने होणारा आर्थिक विकास हे एक प्रमुख कारण आहे. आर्थिक

विकासातील मंदीमुळे रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतात. त्यामुळे बेरोजगारी वाढते.

**३) औद्योगिक क्षेत्राची वाढ मंदावणे –** औद्योगिक क्षेत्राची वाढ मंदावल्यामुळे रोजगार हा मर्यादीत होती. नवनविन कारखाने स्थापन न झाल्यामुळे रोजगारात घट होते.

**४) लघु उद्योगांत घट –** लघु उद्योगांत सध्याच्या काळात मोठी घट झाली आहे.

**''बेरोजगारी कमी करण्याचे उपाय''**

**१) जनसंख्या पट नियंत्रण –** लोकसंख्येवर नियंत्रण ठेवल्यावर बेरोजगारी काही अंशी नियंत्रण ठेवता येते. हीच ती वेळ आहे. जेव्हा लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी काही उपाय करणे गरजेचे आहे.

**२) आर्थिक विकासात प्रगती –** देशात मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास करणे गरजेचे आहे. आर्थिक विकासातील प्रगतीमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो.

**३) औद्योगिक क्षेत्राची वाढ –** औद्योगिक क्षेत्रात वाढ झाल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार वाढत होते. कारखानदारी वाढल्याने मोठ्या प्रमाणात नविन रोजगार प्राप्त होतो.

**४) लघु व मध्यम उद्योगांत वाढ –** भारतातील एकुण लोकसंख्येतील मोठा घटक लघु व मध्यम उद्योगांत कार्यरत आहे. या मोठ्या वर्गाला सरकारने चालणा देणे गरजेचे आहे. या मोठ्या लोकसंख्येला लघु–मध्यम व्यवसायात गुंतवल्याने मोठ्या प्रमाणात रोजगाराचा प्रश्न संपु शकतो.

विसाव्या शतकामध्ये शेतीप्रधान समाजात बदल होवून मोठा समाज औद्योगीक क्षेत्रात वळु लागला आहे. या कृषी क्षेत्रातुन बाहेर पडणाऱ्या या तरुण–तरुणींना योग्य अशी चालना देवून औद्योगीक क्षेत्रात वाढ करणे गरजेचे आहे. त्याच बरोबरीने साहित्य, वाङ्‌मय, कला, शेती, सामाजीक क्षेत्रे लघु–मध्यम – मोठ्या उद्योगांना पुरक अशी धोरणे सरकारने आखने आजच्या २१ व्या यशतकातील प्राथमिकता आहे. त्याबरोबरच तरुणांनी आपापल्या वेगवेगळ्या कल्पना लढवून, आपल्या विचारांनी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत होवून स्वत:चा व देशाचा विकासात हातभार लावायला हवा.

आपला देशात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. पण त्या शिक्षणावर आधारीत रोजगार आपल्या देशात आज उपलब्ध नाही. त्यामुळे तरुणांनी फक्त नोकरीवर आपले लस केंद्रीत न करता वेगवेगळ्या प्रकारे उत्पनाचे मार्ग शोधून रोजगार उपलब्ध करावा. तंत्रज्ञानाच्या आधारे आज घरबसल्या मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहेत. तरी आज आपल्याला ही बेरोजगारी संपवण्यासाठी मोठ्या प्रमाणात काम करण्याची गरज आहे. बेरोजगारी संपण्याचा आपण प्रयत्न करु व मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करण्याचा प्रयत्न करुन देशाला पुढे नेवू.

**ऋषीकेश बोडखे**
टी.वाय.बी.एस्सी. (केमिस्ट्री)

## वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे !!!

भाजप येणार....
काँग्रेस येणार ...
आर खुळ्या ...!
दारात दोन झाडे लाव ....
सावली मात्र नक्की येणार ...!!

**सोनाली राऊत**
एस .वाय.बी.एस्सी.

# आई तुझे थोर उपकार



आई या दोन अक्षरात पृथ्वीचे सार आहे. सौंदर्याचा अभिमान आहे. बुध्दिचे तेज आहे आणि विश्वाचे वैभव आहे. पृथ्वीला स्त्रीची आणि विशेषत आईची उपमा देतात कारण उन्हाळ्यात कडक उन्हाच्या तप्त झळानी पृथ्वीला भेगा पडतात पण पावसाळा आला की त्याच जमीनीतुन तांबुस लोभस अंकूर उगवतात. आई संकटात स्वत: खस्ता खाते पण मुलांचा प्राणापलीकडे सांभाळ करते संकटाशीही दोन हात करण्यात संस्कार आईकडुनच मिळतात संसारात सुख आणि दु:ख म्हणजे प्रकाश आणि अंधाराचा खेळ आहे. संकटाचा अंधार सरला की चांगल्या दिवसांचा सूर्योदय होता. त्यामुळे आई-वडिलांनी संस्कार केलेली मुले संकटात हार पत्करत नाहीत. त्याप्रमाणे सुखातही हुरळून जात नाहीत. पावसाळा हा पृथ्वीच्या सौंदर्यात भर घालणारा तिला वैभवाच साज चढवणारा असतो. तरी पृथ्वी शालीन असते खऱ्या सौदर्याचा शालीनता शोभा देते त्यातच तिचे बुध्दिवैभवही दडलेले असते. असेच बुध्दिवैभव पहायला मिळाले. चीनमध्ये रंगलेल्या मिस वर्ल्ड स्पर्धेत सर्व टप्पे पार केल्यानंतर सर्वात महत्वाचा टप्पा उरला होता. बुध्दिकौशल्याचा यात जी स्पर्धक ज्युरींची मने जिंकते तिच जंगत्सुंदरी ठरते. टॉप फाईव्हला गेल्यानंतर मिस इंडिया असलेल्या मानुषीला एक नाजुक प्रश्न विचारण्यात आला 'सर्वाधीक पगार कुणाला मिळायला हवा क्षणाचाही विलंब न लावता तिने उत्तर दिले 'आईला सर्वाधिक मान मिळायला हवा त्यांना कॅशमध्ये पगाराऐवजी खुप सन्मान आणी प्रेम घ्यायला हवे मिस इंडिया मानुषी ध्विल्लर हिच्या या उत्तराने परीक्षकांसह उपस्थितांचे मने जिंकली आणि अंतीम फेरेतील पाच सौंदर्यवतींमधुन विश्वसुंदरीच्या मुकूटाचा मान तिला मिळाला १७ वर्षानंतर भारतीय सौंदर्यवतीने हा मानाचा मुकूट पटकावला या मिस वर्ल्ड स्पर्धेत जगभरातील ११८ सौंदर्यवतींनी सहभाग घेतला होता. अप्रीतम सौंदर्य आणि अफाट बुध्दिमत्ता याच्या जोरावर मानुषीने या सर्वावर मात करत विश्वसुंदरीच्या मुकुटाला गवसणी घातली मानुषीच्या आई या एका उत्तराने तिला विश्वविख्यात बनविले आता कोणालाही वाटेल 'आई हा शब्द उच्चारायला कसले आले आहेत. कष्ट आणि त्यात कसले आहे. बुध्दिसौंदर्य ? पण आईपण अनुभवायला आणि मुलगी जाणुन घ्यायला दोघांमध्ये जो समंजसपणा असावा लागतो तो संस्कारातूनच जन्माला येतो. मानुषीला घडवण्यात तिच्या आईने घेतलेले कष्ट तिने अनुभवले होते आणि आपले संस्कार मुलीला घडवत आहेत. हे या माऊलीने जाणले होते. म्हणुनच या माऊलीच्या ह्रदयाच्या कप्प्यात मानुषीची प्रतीमा जपलेली होती.

संपत्तीपेक्षा आईचे कर्तव्य फार किमती असते म्हणुनच ती आदरास पात्र असते. तिनेच तिला जगत्सुंदरी बनविले केवढे मोठे हे आईचे उपकार.

**साळवे शामल परशुराम**
एस.वाय.बी.ए.

## दुष्काळ ...

माणसं तडफडत असताना
मदतीला कुणी सरकत नाहीत...
पाण्याचं राजकारण करण्यालाही
हल्ली लोक टरकत नाहीत...!
मना - मनातुन वाहणारा
माणूसकीचा झरा आटला आहे ...
पाण्याच्या दुष्काळासह
भावनांचा दुष्काळ दाटला आहे ...!!

**सोनाली राऊत**
एस .वाय.बी.एस्सी.

# कुष्ठरोग्यांचा देव - बाबा आमटे



जन्म २६ डिसेंबर १९१४

विदर्भातील एका श्रीमंत जमीनदार कुटुंबात 'मुरलीधर' चा जन्म झाला. तो अतिशय हुशार होते. लहानपणी प्रसिध्दी बंगाली कवी रविंद्रनाथ टागोर यांचे 'गितांजली' हे पुस्तक वाचनात आल्यामुळे त्यांचे जीवन पूर्णपणे बदलून गेले. दीन-दुबळे, पिडीत यांच्याविषयी त्यांच्या मनात करुणा व प्रेम निर्माण झाले आणि 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' ही कल्पना त्यांच्या मनात मूळ धरु लागली.

ते जरी एम.ए.एल. एल.बी. झाले होते तरी सामाजिक कामाची आवड अंगी असल्यामुळे भंगीकाम, सूतकताई, सार्वजनीक रस्त्यांची सफाई आदी ते स्वत: करीत व इतरांना त्यासाठी प्रवृत्त करीत. या काळातच 'श्रमाश्रम' स्थापन करुन सामाजिक व धार्मिक विषमता नष्ट, करण्याचा प्रयोग त्यांनी केला होता.

एके दिवशी असेच काम करीत असताना तुळशीराम नावाचा महारोगी रस्त्याच्या बाजूला पडलेला दिसला. त्याच्या जखमातील आळ्या पाहून त्यांना किळस आली पण लगेच त्यांनी स्वत:ला सावरले त्यांनी तुळशीरामला आपल्या बरोबर नेले. सर्व कामे सोडून महारोग्यांची सेवा करण्याचा त्यांनी निश्चय केला.

१९५४ साली कुष्टरोग निवारण कार्यासाठी १० एकर जंगलातील जमीन मिळवून ६ कुष्टरोगी, एक लंगडी गाय पत्नी साधना ताई व दोन मुले यांना घेऊन, आनंद वन निर्माण करण्यासाठी तेथे गेले. या काळात ते बाबा आमटे झाले.

आनंदवनाचे उद्घाटन ऋषी विनोबा भावे यांच्या हस्ते झाले. तेंव्हा ते म्हणाले होते की, 'आता येथे सेवेच रामायण घडेल' बाबा सगळ्या जगाकडे पाठ फिरवून जंगलात आले होते त्यावेळी जगाकडे तू पाठ फिरवली आहेस पण एकदिवस असा येईल की, जग तुझ्या पाठीशी येईल. ही भविष्यवाणी अक्षरश: खरी ठरली आहे. संपूर्ण जगाने त्यांच्या कुष्ठरोग विषयक कार्याचे कौतुक केले आहे.

आनंदवनच्या खडकाळ जमिनीत कुष्ठरोग पिडितांनी विहिरी खणल्या आहेत. आनंदवनाची ४६५ एकर जमीन ओलिताखाली आहे. त्याठिकाणी सर्व धान्ये, तेलबिया फळे यांचे उत्पादन घेतले जाते.कुष्ठरोग्यांनी स्वावलंबी असावे म्हणून बाबांनी तेथे कामाची विशिष्ट पध्दत बनवली. शेती बरोबरच दुधाचे उत्पादन कोंबड्यांची जोपासना, अंड्याचे उत्पादन, रेशीम उद्योग, फुलांची शेती, वनशेती इ. अनेक उद्योग हे कुष्ठरोगी करतात.

कुष्ठपीडितांनी निर्माण केलेल्या अनेक कलात्मक वस्तू पाहून आपण थक्क होऊ. बाबांनी या आनंदवन परिसरात प्राथमिक शाळा, मूक, बधिर शाळा, विज्ञान - कला शेतकी महाविद्यालये सुरु केली आहेत. आनंदवन येथील दवाखाना बाबांचे सुपुत्र डॉ.विकास व त्यांच्या पत्नी डॉ.भारती पहातात. हेमलकसा येथील आदिवासींसाठी बाबांनी फार मोठे काम केले आहे.

या कामाबद्दल बाबांना अमेरिकेतील 'डेमियन डेरेन पारितोषिक' मॅगसेसे अॅवार्ड, फाय फाऊंडेशनचा राष्ट्रभूषण पुरस्कार, भारत सरकारचा पद्मश्री-पद्मविभूषण पुरस्कार सन्मानपूर्वक बहाल केले गेले आहेत.

**स्वप्नाली वाघमोडे**
एस.वाय.बी.ए.

# अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार विजेता : अमर्त्य सेन



३ नोव्हेंबर १९३३ जागतिक कीर्तीचे मानवतावादी बुध्दिप्रामाण्यवादी भारतीय अर्थशास्त्रज्ञ भारतरत्न आणि अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराचे मानकरी कल्याणकारी अर्थशास्त्र, सामाजिक निवडीचा सिध्दांत तसेच दारिद्र्याच्या प्रश्नावर केलेल्या संशोधनाबद्दल त्यांना १९९८ मध्ये नोबेल पुरस्कार देण्यात आला. अमर्त्य सेन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्रातील मुलभूत समस्यावरील पुढील योगदान अतिशय महत्वाचे आहे १) सामाजिक निवडीचा सिध्दांत २) दारिद्र्याचे निर्देशांक ३) कल्याणाचे निर्देशांक आणि ४) दुष्काळाचे विश्लेषण

अमर्त्य सेन यांचा जन्म शांतीनिकेतन येथे एका सुशिक्षित आणि सुसंस्कृत कुटुंबात आशुतोष व अमिता या दांपत्यापोटी जन्म झाला. त्यांचे मातृत्व आजोबा क्षितिमोहन हे विश्वभारतीय संस्कृत व भारतीय संस्कृती हे विषय शिकवीत असत वडील आशुतोष हे डाक्का विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. सेन यांनी डाक्का येथील सेंट ग्रेगरी स्कूलमध्ये सुरुवातीचे शिक्षण घेऊन पुढे विश्वभारतीय इंटरपर्यंतचे शिक्षण घेतले आणि १९५३ मध्ये कोलकत्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून अर्थशास्त्र हा विषय घेऊन ते बी.ए. झाले नंतर ते इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी गेले. १९५५ मध्ये ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिजमधून त्यांनी अर्थशास्त्र विषयात बी.ए. व १९५९ मध्ये एम.ए. ह्या पदव्या आणि डॉक्टरेट प्राप्त केली. पुढे १९५८–६३ या काळात ते ट्रिनिटी कॉलेजमध्ये अधिछात्र होते. १९५५–५८ या काळात जादवपूर विद्यापीठ व १९६३–७१ या काळात दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे अध्यापन केले. नंतर १९७१ – ७७ या काळात त्यांनी इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि १९७७–८८ या काळात ऑफसफर्ड विद्यापीठ येथे अध्यापन केले. अर्थशास्ताबरोबरच त्यांनी तत्वज्ञान विषयाचा अभ्यास केला. त्यांनी १९८८–९८ या काळात अमेरिकेतील हार्व्हर्ड विद्यापीठात अर्थशास्त्र आणि तत्वज्ञान या विषयांचे अध्यापन केले. त्यांची १९९८–२००४ या काळापर्यंत ''मास्टर ऑफ ट्रिनिटी कॉलेज' या पदावर नियुक्ती झाली. या पदावर काम करणारे ते पहिले भारतीय होते. त्यानंतर हार्व्हर्ड येथे लॅमॉट युनिव्हर्सिटीत प्रोफेसर म्हणून त्यांनी काम केले. अर्थात शास्त्रीय धोरणांचे समाजाच्या हितावर काय परिणाम होतात, त्या धोरणांचे मूल्यमापन करणे हे कल्याणकारी अर्थशास्त्राचे उद्दिष्ट होय. त्यांनी १९७० मध्ये लिहिलेल्या आपल्या कलेक्टिव्ह चॉइस अँड सोशल वेल्फेअर ह्या आपल्या ग्रंथात व्यक्तीचे हक्क, बहुसंख्याकांचे शासन आणि व्यक्तीच्या स्थितिगतीबाबतच्या माहितीचे उपलब्धता ह्यासारंख्या प्रश्नांचा परामर्श घेतला आहे. ह्यांतुन संशोधकाना अशा प्रश्नांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली. अमर्त्य यांनी समाजातील दारिद्र्याचे प्रमाण किती आहे. त्यांचे विभाजन कसे आहे. त्यांत वेळोवेळी कसे आणि कोणते बदल झाले आहेत. याचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. दुसरे देशातले दारिद्र्याचे प्रमाण आणि आर्थिक कल्याणाचे प्रमाण ह्यांच्या तुलनेसाठीही निर्देशांक महत्वाचे ठरतात. त्यांनी १९९० मध्ये देशाची क्रमवारी ठरविण्यासाठी तेथील लोकांचे आयुर्मान शिक्षण व उत्पन्न यांवर आधारित, युनायटेड नेशन्स ह्युमन इंडेक्स ही प्रणाली विकसित केली सेन यांचा ''पॉव्हर्टी अँड फेमिन्स ॲनएसे ऑन एन्टायटलमेंट अँड डीप्राइव्हेशन' हा ग्रथ १९८१ मध्ये प्रसिध्द झाला विकासाच्या संदर्भात सेन यांनी क्षमतेची संकल्पना

विकसित केली. ''इक्वॅलिटी ऑफ व्हॉट ? ह्या त्यांच्या लेखात त्यांनी ती मांडली सेन यांनी १९९० मध्ये न्युयॉर्क रिव्हू ऑफ बुक्समध्ये, 'मोअर दॅन १०० मिल्यन विमेन आर मिसिंग' असाएक लेख लिहिला होता. त्यांनी विपुल स्कुटलेखन व ग्रंथलेखन केले. त्यांच्या अन्य काही उल्लेखनीय ग्रंथांत रॅशनॅलिटी अँड फ्रीडम (२००२) आणि एडस सुत्र अनटोल्ड स्टोरीज फ्रॉम इंडिया ह्याचासमावेश होतो सेन यांचा ''द आयडिया ऑफ जस्टिस'' हा ग्रंथ २००९ मध्ये प्रसिध्द झाला जगातील अनेक विद्यापीठांनी त्यांना सन्माननीय डॉक्टरेट पदव्या दिल्या नंतर ''भारतरत्न'' हा सर्वोच्च सन्मान त्यांना प्राप्त झाला (१९९९) २०१२ मध्ये अमेरिकेने त्यांना नॅशनल ह्युमॅनिटी मेडल देऊन सन्मानित केले.

**अंबिका घोंगडे**

एस.वाय.बी.ए.

## राजकीय आरक्षण : कुणासाठी, कशासाठी ?

शिक्षण व सरकारी नोकऱ्या यातील राखीव जागांना कालमर्यादा नसली तरी राजकीय क्षेत्रांत मतदारसंघाच्या आरक्षणाला दहा वर्षांची कालमर्यादा आहे. म्हणुनच मुदतवाढ की फेरविचार यावर चर्चा व्हायला हवी.

गेल्या सत्तर वर्षांत जातीपातीच्या भिंती तोडुन समानतेकडे वाटचाल करण्याऐवजी आपण सामाजिक विघटनाकडे चाललो आहोत. भारत हा देश विसंगतीने आणि विरोधाभासाने खचुन भरलेला आहे. उदाहरणार्थ, भारतीय संविधानाचे अधिष्ठान समता आहे. तर भारतीय समाज हा विषमतेच्या पायावर उभा आहे. समताधिष्ठित संविधानाचा आणि विषमतधिष्ठित समाजव्यवस्थेचा कुठेच मेळ बसत नाही.

संविधानानेच राजकर्त्यांवर टाकली होती. परंतु प्रत्यक्षात आपण पाहत आहोत आणि अनुभवतो आहे की, असुनही संविधानातील समज समाजात झिरपली नाही. पावलोपावली आपण राष्ट्रीय ऐक्याची अखंडतेची शपथ घेतो. तशी सामाजिक ऐक्याची वा अखंडतेची घेतो का ? तर नाही, कारण सामाजिक विषमतेच्या प्रश्नांकडे आपण कधी गांभीर्याने पाहिलेच नाही.

राष्ट्र एक तर समाजही एक हवा. म्हणुनच सामाजिक विषमता संपविण्यासाठी जातिअंताशिवाय पर्याय नाही, हे नाकारुन चालणार नाही. जातिव्यवस्था निर्मूलनाचे कोणकोणते उपाय वा मार्ग असु शकतात. त्याची अनेक समाज धुरीणांनी. समाजशास्त्रांनी आपापल्या पध्दतीने मांडणी केली आहे. त्याची स्वतंत्र चर्चा होईलच. परंतु जाती निर्मूलनाच्या मुळाशी जाताना. नव्याने काही अडथळे निर्माण झाले आहेत. ते आधी दूर केले पाहिजेत. त्यातील जातीवर आधारित आरक्षण हा एक अडथळा असल्याचे सांगितले जाते. ही मांडणीही दोन प्रकारची आहे. एक आरक्षणाला विरोध म्हणुन आरक्षणामुळे जाती बळकट होतात, असे म्हणणे आणि दुसरी मांडणी जातिविहीन समाजरचना प्रत्यक्षात आणायची असेल तर, त्या मार्गात जे जे म्हणुन आडवे येईल मग तो धर्म असेल, रुढी, परंपरा असतील वा जातीवर आधारित आरक्षण असेल ते बाजुला केले पाहिजे किंवा ते संपुष्ठात आणले पाहिजे. आजच्या घडीचा किंवा वास्तवाला सामोरे जाण्यासाठी दुसरी मांडणी अधिक महत्वाची आणि प्रामाणिक वाटते. मात्र याचा अर्थ आरक्षणामागची सामाजिक न्यायाची व समान संधीची संकल्पनाच सदोष होती. असा होत नाही.

सामाजिक न्यायाची ती भूमिका संकल्पना व आशय मारुन न टाकता. पर्यायी व्यवस्था उभी करुन जाती अंताच्या मार्गातील आरक्षण हा अडथळा कसा दूर करायचा त्यावर चिंतन मंथन होणे आवश्यक आहे. हाच धागा पकडुन मागील चार लेखांमध्ये आरक्षण आणि त्याला कोणकोणते पर्याय असू शकतात. यावर मांडणी केली आहे. ती मांडणी प्रामुख्याने शिक्षण व सरकारी सेवेमधील आरक्षणाच्या म्हणजे सामाजिक आरक्षणाच्या संदभात होती. नेहमी एक गोंधळ किंवा संभ्रम निर्माण केला जातो. की संविधानात आरक्षणाची मर्यादा फक्त दहा वर्षांची असताना, सत्तर वर्षांपर्यत ते कशासाठी वाढविले ? वास्तविक पाहता,

संविधानात वर उल्लेख केलेल्या सामाजिक आरक्षणाशिवाय राजकीय आरक्षणाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

राजकीय आरक्षण म्हणजे, लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मागासवर्गीयाचे प्रतिनिधी निवडुन देण्यासाठी करण्यात आलेली राखीव मतदारसंघाची व्यवस्था त्याला मर्यादा होती. ती वेळोवेळी वाढविण्यात आली. हे खरे आहे. हे खरे आहे. त्यात सर्वच राज्यकर्त्यांचा आणि राजकरण्यांचा स्वार्थ होता आणि आहे. आता हे राजकीय आरक्षण कुठुन कसे का ? कुणासाठी आणि कशासाठी आले याचाही थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

ब्रिटिशांनीच भारताची भावी राज्यघटना कशी असावी. यावर विचारमंथन करण्यासाठी १९३०-३२ च्या दरम्यान लंडन येथे गोलमेज परिषद घेतली. त्यात स्वतंत्र भारतात विशेषत: राजकीय व्यवस्थेत वेगवेगळ्या समाजघटकांचे काय स्थान असेल. अस्तित्व असेल हा मुद्दा परिषदेच्या केंद्रस्थानी होता. प्रांतिक व मध्यवर्ती विधिमंडळात कोणाला किती व कोणत्या पध्दतीने प्रतिनिधित्व द्यायचे. यावर मोठा खल आणि कलही झाला. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख यांचा राजकीय वाटा निश्चित होत असताना, त्या वेळी भारतात अस्तित्वात असलेल्या आणि हिंदू असूनही हिंदू नसलेल्या सात कोटी अस्पृश्यांच्या राजकीय हक्काचे काय ? या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रश्नाने गोलमेज परिषदेने वेगेळे आणिवादळी वळण घेतले. धमव्यवस्थेने मानवी अधिकार नाकारलेला सात कोटी समाज म्हणजे ही काही थोडीथोडकी संख्या नव्हती. लोकशाहीत निवडणुक पध्दतीत बहुसंख्येला महत्व असले तरी राजकीय जाण हा त्यातील एक महत्वाचा घटक आहे.

राजकीय जागरुकता असलेला अल्पसंख्याक समाजही सत्तेच्या राजकारणात वरच्या स्थानावर जाऊन बसतो आणि राजकीय भान नसलेला बहुसंख्याक समाज त्यांच्या वर्चस्वाखाली राहतो. भारतात हे होत आले आहे. म्हणुनच भविष्यातील स्वतंत्र भारतातील लोकशाही शासन व्यवस्थेत अस्पृश्य वर्गाला योग्य स्थान मिळवण्यासाठी, त्यांच्यात राजकीय भान आणण्याकरीता डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत त्या वर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली.

**घोडेकर शितल बाजीराव**
टी.वाय.बी.ए.

## जीवनातील सात सत्य ...

आरसा :
खोटे बोलू देत नाही ;
ज्ञान :
घाबरु देत नाही ;
अध्यात्म :
मोहपाशामध्ये अडकवत नाही ;
सत्य :
कमकुवत होऊ देत नाही ;
प्रेम :
द्वेष करु देणार नाही ;
विश्वास :
दु:खी होऊ देणार नाही ;
कर्म :
जीवनात अपयशी होऊ देणार नाही !

**साक्षी कासार**
टी.वाय.बी.ए.

## आई ...

आई ने केली माया
बाबांची आहे मी परी
मुलगी बनुन जन्माला
आले मी तुमच्या घरी ...
वाढवले मला लाडाने
आहे मी तुमची शान
एक दिवस तुम्हाला
वाटेल माझा अभिमान
आहे मी तुमची लेक
होणार उद्या कोणाची सुन
माझ्याकडुन तुमची मन
दुखवण्याची होणार नाही भुल
नशीबवान असतात ते लोक
ज्यांना कन्यारत्न मिळत
मुलीचा जन्म स्विकारायला पण
बापाच काळीज वाघाचच लागत

**साक्षी कासार**
तृतीय वर्ष कला

# भारतीय लोकशाही - दशा आणि दिशा

भारताला स्वातंत्र्य मिळुन ७० वर्षाचा कालावधी लोटला. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक लहान मोठ्या संस्थांनानी बनलेला हा उभा आडवा देश. स्वातंत्र्यानंतरच्या काही काळात एक अखंड देश म्हणुन समोरासमोर आला. ब्रिटीशांकडुन आपल्याला बऱ्याचशा गोष्टी वारशात मिळाल्या. त्यात लोकशाही नावाची अप्रुपाची एक गोष्टही मिळाली.

विविध लहान-मोठ्या आणी एकमेकांमध्ये मैत्रीपेक्षा शत्रुत्वाचाच सिमा जास्त असलेल्या राज्या-संस्थांच्या देशात स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही राज्यपध्दती सुरु झाली. एक देश. एक सविधान एक ध्वज असलेल्या भारत एकच राष्ट्र म्हणुन जगाला माहिती झालं. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणुन भारताची आज ओळख आहे. भारत जगाच्या ज्या दक्षिण आशीया भागात येतो. त्या भागात असलेल्या इतर देशांच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिल. तरी त्याच्या तुलनेत भारत लोकशाही टिकवण्यात बऱ्यापैकी यशस्वी झालेला आहे. असे दिसते. पण खरच तस आहे का ? इथे सर्वच आलबेल आहे का ? की लोकशाहीच्या बुरख्याखली काही वेगळच सुरु आहे ? मला पडलेल्या या प्रश्नाच विश्लेषण आणि त्यावर उत्तर शोधण्याचा एक प्रयत्न मी या दोन भागात या लेखातून करणार आहे. या दोन भागांच सामाईक शीर्षक एकच असलं तरी त्याची भारतीय लोकशाही : दशा हा आपल्या लोकशाहीची सद्यस्थिती सांगणारा पूर्वार्ध आणि भारतीय लोकशाही ; दिशा हा आपल्या लोकशाहीची अदयदशा सुधारण्यासाठी आपण मतदरांनी कोणत्या दिशेने विचार करायला हवा त्याची चर्चा करणारा उत्तरार्ध अशी सोईसाठी विभागणी केलेली आहे.

या लेखनात काही त्रुटी राहील्या असल्याची शक्यता मी नाकारत नाही. कारण मी काही राजकरणाचा जाणकार नाही. तसेच या लेखामध्ये एखाद्या मुद्याची पुनरावृत्ती असण्याची शक्यता आहे. कारण अशा प्रकारच्या लेखात हे टाकता हे खरयं की स्वातंत्र्योत्तर काळात देशाअंतर्गत असलेल्या विविध सरंचनाच्या सीमा पुसल्या गेल्या आणी देशाला चहुबाजुंनी असलेली एकच सीमा मिळाली. आपल्यादेशाला एक सार्वभौम राष्ट्र म्हणुन ओळख मिळाली. १९४७ च्या स्वातंत्र्य मिळालेल्या रात्री पं. नेहरुंनी बहुत साल पहले हमने नियतीसे एक वादा कीया था असं भावूक भाषण केलं होतं. ते भाषण भविष्यातल्या सोनेरी स्वप्नाचं असणं अगदी साहजिक होत. नव्याने मिळालेल्या स्वातंत्र्याच्या आनंदात भविष्यात समोर उभ्या टाकू शकणाऱ्या समस्यांची कल्पना त्यावेळच्या राजकारण्यांना होती की नाही याचं आकलन आता होत नाही.

पुढे काही वर्षांनी संस्थान विलीन होवुन आपापल्या भाषेची अस्मीता जागृत झालेले प्रांत निर्माण झाले सुरुवातीला ताज्या ताज्या मिळालेल्या स्वातंत्र्याच्या कैफात ही नव्याने निर्माण झालेली संस्थानच आहेत. आणी त्यांच्यातला सिमा आणी भाषा प्रश्न पुढे जटील होणार आहे. याची जाणीव झालेली नव्हती. मुसलमानांना त्याच्या मागणीप्रमाणे पाकीस्तान देवुन टाकल्यानंतरही आपल्या देशातल्या मुसलमांनांची धार्मिक समस्या पुढे कीती अवघड होणार आहे. याचीही कुणाला कल्पना नसावी. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी खांद्याला खांदा लावुन लढलेल्या जाती-जमाती-पंथ आणी त्यांच्यातील उच्चनीचतेची भावना अजुन जागी झाली नव्हती. नुकतेच मिळालेल स्वातंत्र्य, त्यासाठी केल्या गेलेल्या कठोर संघर्षाच्या फळाचे गोडवे गाण्यात सर्वच मशगुल होते.

राजकीय स्तरावर सुरुवातीला देशात देशव्यापी म्हणता येतील असे कांग्रेस आणि भारतीय कम्युनिष्ट पक्ष हे केवळ दोनच राजकीय पक्ष होते. तर पश्चिम बंगालतला फॉरवर्ड ब्लॉक. तामिळनाडुतला द्रमुक, काश्मीरातला नॅशनल कॉन्फरन्स केरळातील मुस्लीम लीग पंजाबातला अकाली दल आणी काही दोन-चार राजकीय पक्ष त्या त्या राज्यात कार्यरत होते. पण त्यांची ताकद आणी प्रभाव मर्यादीत होता. देशात आणी राज्यातही खऱ्या अर्थाने प्रभाव हेता तो काँग्रेसचाच.

देशाचा स्वातंत्र्य लढा मुख्यत: काँग्रेसच्याच नेतृत्वाखाली लढला गेल्याने आणी काँग्रेसमुळे स्वातंत्र्य मिळाल अशी लोकांची भावना असल्याने अस अगदी साहजीकच होत. याचाच परिणाम म्हणुन स्वातंत्र्यानंतर बराच काळ काँग्रेसने या देशावर अनभीषिक्त राज्य केल. पुढे आणखी काही वर्षांनी स्वतंत्र लढ्याचा कौफा उकरायला सुरुवात झाली. आणि इतका काळ काँग्रेस सोबत असलेल्या राजकीय व्यक्तीमत्वांना काँग्रेस चाखत असलेली सत्तेची फळे लक्षात घेवुन इतर पक्षातही सत्तेपर्यंत जायचा आकांक्षांना धुमारे फुट लागले. आत्तापर्यंत ब्रिटीश या सामाजिक शत्रुविरुध्द लढण्याचे लक्ष आत्ता पर्यंत संपुष्टात येवुन काँग्रेस हा सामायिक राज्यकीय शत्रु ठरला. येथुन पुढे भारतीय लोकशाहीची विटंबना व्हायला सुरुवात झाली.

लोकशाही मार्गाने काँग्रेसला सत्तेवरुन खेचायचे म्हणजे काँग्रेसच्या मतपेटीला खिंडार पाडायची हे अघोषणात येते. मग मतदारमध्ये भाषा, प्रांत, धर्म, पंथ यावरुन भेद निर्माण करायचा अपरिहार्य मार्ग दिसु लागला आणी इथपासुन आतापर्यंत सख्या बहिणीप्रमाणे सुखाने नांदणाऱ्या देशांतर्गत भाषा आणि प्रांत एकमेकाचे हे एकमेकांचे शत्रु म्हणुन एकमेकांसमोर उभा ठाकले. धर्मावरुन लढाया आणी दंगली आपल्याला काही नवीन नव्हत्या परंतु आता मात्र त्यात राजकरणाने प्रवेश केला जाती जमातींना आपपल्या उच्च निचतेच्या जाणीवा खुणावु लागल्या. हे कमी की काय म्हणुन आहेरे आणि नाहीरे अशीही दरी निर्माण झाली. आणि यातील प्रत्येक गोष्टीच राजकारण कल जावुन त्या त्या गोष्टींच रुपांतर मतपेटीत होवु लागला. जात, धर्म, गरीब, प्रान्त, भाषा, श्रीमंत अशा प्रत्येकाची वोटबँक तयार होवु लागली. आणि याचा अपरीहार्य परीणाम म्हणुन या सर्वांचा कैवार घेण्याच नाटक वठवणारे अनेक राजकीय पक्षनिर्माण झाले लक्षात घ्या १९४७ च्या दरम्यान केवळ हातांच्या बोटांवर मोजता येतील ऐवढ्याच असलेल्या राजकीय पक्षांची संख्या जवळपास ५०-६० पटीने वाढली. सन २०१४ साली झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत देशभरात एकुण ४१८ राजकीय पक्षांनी भाग घेतला होता. यातील बहुसंख्य पक्ष, जात, भाषा, धर्म, पंथ यांच्या पायावर उभे आहेत. राष्ट्रीयत्वाची भावना असलीच तर ती लोकशाहीची तोडं देखल्या का होईना पण जाल राखावी म्हणुन असावी.

तिकडे बराच काळ सत्तेत राहिल्यामुळे सत्तेची ताकद आणि मधुरफळे काँग्रेसच्या लक्षात आली. काँग्रेसनीही डीव्हाइड आणी रुलचे राजकारण सुरु केले. हे असे करण्यात केवळ काँग्रेसचेच नव्हे. तर सर्वांचेच राजकीय पक्ष हिरीरने पुढे येवु लागले. जात पात , पंथ, धर्म आदीमानवाने विचारशक्ती गमावलेल्या लोकांचे कळप आपल्याला वाटणाऱ्या (फक्त खचाचाच बगळा) पक्षांचा मागे उभा राहु लागले. लोकाचं लोकांसाठी लोकांनी चालवलेलं सरकार हे लोकशाहीच्या उदात्त वाटणार तत्व मागे पडुन आपल्या लोकाचं आपल्या लोकांसाठी आणायच आपल्या लोकाचं सरकार अशी नवीन विस्तारीत व्याख्या जन्मु लागली. वरतुन कल्याणकारी वगैरे वाटणारे राज्य ही कल्पना मागे पडुन लागली आणि राजकारण हे लोकांसाठी केल्याचा देखावा करत केवळ सत्तेसाठी होवु लागली. आणि सत्ता फक्त स्वत:च्या स्वार्थासाठीच हे मुख्य तत्व झाले. देशातली काँग्रेसची सत्ता आणि वर्चस्व हळुहळु कमी होवु लागल होत. तरी संपुष्टात आल नव्हत. काँग्रेसच्या कमी होणाऱ्या जागेवर विविध विरोधी तत्वांचे राजकीय पक्ष निवडुन येवु लागले होते. सत्तेसाठी यांची अनैतीक क्षय्यासोबत होवु लागली होती. देशात अशा अनैतीक क्षय्यासोबतींना आघाडी सरकार अस गोडंस नाव देण्यात आल होत आणी मुलामा होता. कधीच न होवु शकलेल्या लोक कल्याणाची भावना जणमानसात होवु लागली.

संकलन -

**शेळके प्रदीप राजेंद्र**

एस.वाय.बी.ए.

# ज्वालामुखी

ज्वालामुखी हे पृथ्वीच्या पृष्ठभागाला पडलेली भेग किंवा नळीसारखे भोक असते. ज्यामधुन पृथ्वीच्या पृष्ठभागातील तप्त शिलारस (मॅग्मा), उष्ण वायु राख इत्यादी बाहेर पडतात. सर्वसामान्य ज्वालामुखी क्रियेत मध्यवर्ती नळीच्या वाटे तप्त शिलारस बाहेर येऊन नळीभोवती लाव्हा आणि राख यांची रास साचते व शंकुच्या आकाराचा उंचवटा तयार होतो. त्यास ज्वालामुखी पर्वत म्हणतात.

ज्वालामुखी हा पृथ्वीवरील निसर्ग निर्मित आपत्ती आहे. ज्यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावर होणाऱ्या ज्वालामुखीतुन उष्ण लाव्हारस, ज्वालाग्राही राख आणि विषारी वायु बाहेर पडतात. पृथ्वीचे ज्वालामुखी उदभवतात. कारण भुकवच हे १ मोठ्या टणक, भुपट टेस्टॉनिक प्लेटस्मध्ये विभागलेले आहे. हे सर्व भुपट गरम, सौम्य थर यावर तरंगत असतात. त्यामुळे पृथ्वीवर ज्वालामुखी आढळतात. जिथे टेक्नॉनिक प्लेट डिकरिजींग किंवा एककमी होतात. आणि बहुतेक पाण्याच्या पाट्या आढळतात. उदा. मध्य-अटलांटिक रिज यांसारख्या मध्यशास्त्रीय रिजमध्ये. वेगळ्या टेक्टॉनिक प्लेटस्मुळे ज्वालामुखी आढळतात. तर पॅसिफिक रिंग ऑफ फायरमध्ये संक्रमित टेक्टॉनिक प्लेटस्मुळे ज्वालामुखी आढळतात. ज्वालामुखीदेखील क्रस्टच्या प्लेटस्वर पसरत आणि पातळ करीत असतील तेथे तयार करु शकतात. उदा. पुर्व आफ्रिकेतील रिज् आणि वेल्स ग्रे-फ्लॉवर वॉटर ज्वालामुखीय क्षेत्र आणि उत्तर अमेरिकेतील रिओ ग्रान्दे रिफ्ट मध्ये.

या प्रकारच्या ज्वालामुखीचा प्रभाव प्लेट व्हॉइसिस ज्वालामुखीच्या छत्रीखाली येतो. प्लेट चौपातुन दुर ज्वालामुखीवाद्यांना देखील आवरणाच्या पोकळी म्हणून स्पष्ट केले आहे. उदा. हवाई या कथाकथित हॉस्पॉटस. पृथ्वीच्या ३०० कि.मी. खोलवर असलेल्या कोर मेन्टल सिमेवरील. गेम्यासह प्रगत उष्ण प्रदेशातुन उदयास येत असतात. ज्वालामुखी सहसा तयार होत नाहीत. जिथे दोन टेक्टॉनिक प्लेट एकापाठोपाठ एक स्लाईड करतात. ज्वालामुखी निकामी केल्याने विषाणुच्या तत्काळ परिसरातच नव्हे तर अनेक धोका उद्‌भवू शकतात. अशी अशी एक धोक्याची जाणीव म्हणजे ज्वालामुखी राख राखण्यासाठी धोकादायक असु शकते. विशेषत: जेट इंजिन असणाऱ्या विमानाच्यापंखावर राखेचे कण जमा होतात. वितळलेले कण नंतर टर्बाइन ब्लेड्सचे संचयित होतात आणि त्यांचे आकार बदलतात. यामुळे टरबाईनच्या प्रक्रियेत अडथळा आणतात मोठ्या उर्देक अशाप्रमाणे तापमानल आणि सल्फ्युरिक ऍसिडच्या टप्प्यांची सुर्यप्रकाश अस्पष्ट करतात. आणि पृथ्वीचे निम्न वातावरण (किंवा ट्रोफोस्फियर) थंड होऊ शकतात. तथापि ते पृथ्वीमधुन निघणाऱ्या उष्णतेचा देखील ग्रहण करतात. ज्यामुळे वरच्या वातावरणामध्ये तापमान वाढते. ऐतिहासिकदृष्ट्या ज्वालामुखीचा हिवाळ्यामुळे आपत्तीमय दुष्काळ पडला आहे.

**ज्वालामुखीचे प्रकार :-**

ज्वालामुखीचे वर्गीकरण लिसा डोरवर्ड द्वारा २४ एप्रिल २०१९ रोजी अद्यतनित ज्वालामुखीचे वर्गीकरण बहुतेकदा त्यांचे जीवनचक्र होय. ज्वालामुखीचे वर्गीकरण बऱ्याचदा त्याचे जीवनचक्र (सक्रीय, सुप्त किंवा नामशेष) दर्शवते. ज्वालामुखी देखील प्रकारानुसार वर्गीकृत करता येतात. म्हणजेच ज्वालामुखीची संरचना आणि रचना (स्ट्रेटो शंकुच्या आणि ढाल. ज्वालामुखीदेखील ते निर्माण होणाऱ्या उद्रेकाप्रमाणे वर्गीकृत करता येतात.

१) **सक्रीय :-** एक ज्वालामुखी सक्रीय म्हणून वर्गीकृत आहे जर तो अस्तित्वात आहे किंवा नजीकच्या भविष्यात उत्क्रांत होणे अपेक्षित आहे. हवाईमध्ये बिग आयलटची निर्मीती करणाऱ्या पाच ज्वालामुखीपैकी एक किलाकार १९८३ पासुन निरंतर उथळत आहे. पृथ्वीवरील सुमारे ५०० ज्वालामुखी सक्रीय आहेत. महासागराच्या खाली डुबलेल्या ज्वालामुखींचा समावेश नाही. दरवर्षी सुमारे ५० ते १० सक्रीय ज्वालामुखी उमलतील.

**२) निष्क्रिय :-** निष्क्रिय ज्वालामुखी सर्वात धोकादायक असु शकतात. कारण, विस्पोट हे हिंसक म्हणून अपेक्षित म्हणून शकतात. एक सुप्त ज्वालामुखी असे एक आहे. जे सध्या अस्तित्वात नाही परंतु ते रेकॉर्ड करण्यायोग्य इतिहासामध्ये उमटत आहे. आणि भविष्यात पुन्हा पुन उमटण्याची अपेक्षा आहे. सक्रीय आणि सुप्त ज्वालामुखी दरम्यानची ओळ कधी कधी धुसर झाली आहे. काही ज्वालामुखी विस्फोटांच्या

दरम्यान हजारो वर्षांपासुन सुप्त राहु शकतात. त्यामुळे भविष्यात तांत्रिकदृष्ट्या ते उद्रेक होण्याची शक्यता आहे. पण तसे होण्यापुर्वी अनेक जन्मानंतर ते लागु शकतात. बिग आयलंडमधील पाच ज्वालामुखीपैकी मोनाने अंतराळाचे ३५०० वर्षापुर्वीचे स्फोट झाले पण ते पुन्हा पुन्हा उमटण्याची शक्यता आहे. परंतु इव्हेंट कधी घडेल याबाबत अंदाज नाही. सुप्त ज्वालामुखी बहुतेकदा सर्वात धोकादायक असतात. कारण लोक त्यांच्या सभोवतालच्या परिसरात आनंदी असतात आणि साधारणपणे विस्फोट येतो तेव्हा अपुरी तयारी होते हे माऊंट व्हॅल्यूमध्ये होते.

**३) नामशेष :–** मोलोकिनी आखाड एक मृत ज्वालामुखी आहे. जो जवळजवळ संपूर्ण महासागरात बुडवून आहे. मृत ज्वालामुखी मत मानले जातात. आणि कधीही पुन्हा उद्भवण्याची अपेक्षा नाही. कोहला, हवाईच्या बिग आयलमधील सर्वात जुना ज्वालामुखी ६०,००० वर्षामध्ये उर्देक झालेला नाही आणि पुन्हा कधीही सक्रीय होणार नाही. अशी अपेक्षा आहे. परंतु हे वर्गीकरण पुर्णत: निश्चित निर्धार नाही. कारण अनेक हवाईसन ज्वालामुखी पुनरुत्थानाच्या एका टप्प्यातुन गेले आहेत.

*** उद्रेकानुसार प्रकार :–**

**१) केंद्रीय ज्वालामुखी :–** ज्वालामुखी उद्रेकाच्या वेळी लाव्हारस एखाद्यानळीसारख्या भागातुन बाहेर पडतो तेव्हा त्यास केंद्रीय ज्वालामुखी म्हणतात.

या क्रियेत ज्वालामुखीतून बाहेर पडलेले पदार्थ नळीच्या मुखाभोवती साचतात. त्यामुळे शंकुच्या आकाराच्या ज्वालामुखीय पर्वताची निर्मिती होते. उदा. किलीमांजारो तांझिया.

**२) भेगीय ज्वालामुखी :–** ज्वालामुखी उद्रेकाच्या वेळी लाव्हारस ज्या वेळेस अनेक भेगातुन बाहेर पडतो त्यास भेगीय ज्वालामुखी म्हणतात. या क्रियेत ज्वालामुखीतुन बाहेर पडणारे पदार्थ भेगांभोवती साचतात. त्यामुळे ज्वालामुखीय पठारांची निर्मिती होते. उदा. महाराष्ट्र पठार

**भापकर शशिकांत बापू**
टी.वाय.बी.ए.

## वेळ नाही

अमाप सुख आहे सगळ्याच्याच पदरात
पण ते अनुभवायला आज वेळ नाही
आईच्या अंगाईची जाणीव आहे
पण आईला आज
आई म्हणायलाच वेळ नाही
सगळी नाती संपवून झालीत
पण त्या नात्यांना
पुरायलाही वेळ नाही
सगळ्यांची नावे मोबाईलमध्ये सेव आहेत
पण प्रेमाचे चार शब्द बोलायलाही आज वेळ नाही
जे पोराबाळांसाठी मेहनत दिवस रात्र करतात
त्यांच्याकडे क्षणभर
बघायलाही आज वेळ नाही
सांगेल कोण कशाला दुसऱ्याबद्दल
जेव्हा इथे स्वत:कडेच
बघायला आज वेळ नाही
डोळ्यांवर आलीये खूप झोप
पण आज कोणाकडे
झोपायला वेळ नाही.

**भांबरे रोहिणी नवनाथ**
टी.वाय.बी.ए.

# पर्यावरण जागृती

वसूंधरेच्या शालूचा उडाला हिरवा रंग,
सिंमेटच्या काट्यानी तो किती जागी फाटावा ?
सुधारणा आणि आधुनिकतेच्या नावाखाली,
आता का तिनेही ''मिनिस्कर्ट'' घालावा ?
नेत्रांना सुखावणारे तिचे रुप.......
आता आग ओकताना दिसतात,
हिरवाईने झाकरणारी छाया आता,
तप्त ज्वाळानी भाजते.....
शीतलता, शुध्द हवा आता नाहीशीच झाली
प्रदुषणाने जीवाची घालमेल वाढली
तापमानाच्या वाढीने सोसेना काहीली
कारण फक्तएकच माणूस
ज्याने माता आणि पर्यावरणांची,
आब नाहि राखली.....
बेसुमार वृक्षतोड ठायी ठायी केली
पण झाडे लावण्याची गरज नाही जाणली
वृक्ष आपले मित्र हेच तो विसरला ....
अन् झाडे लावण्यापेक्षा कापण्यातच सुखावला
पण सारं काही यंत्रानेच साध्य होणार नाही
निसर्गाला अव्हेरुन पुढे जाता येणार नाही
झाडे लावा, झाडे जगवा ....
आज याची खरी गरज आहे
कारण वसूंधरेच्या शालेतच मानवा तुझी लाज आहे
मानवा तुझी लाज आहे.......

मराठी शब्दबंधातील पर्यावरण या शब्दाचा व्याख्येनुसार सजीवांच्या नैसर्गिक परिवारास ''पर्यावरण'' असे म्हणतात. वैज्ञानिक पारिभाषिक कोशानुसार पर्यावरण या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसगिक् परिसरात जगतात, वाढतात तेथील हवा, जमिन, पाणी इतर सजीव, पर्जन्यमान, उंची तापमान इत्यादी सर्वाचा समावेश होतो. मराठभ विश्वकोषातील व्याख्येनुसार विशिष्ट वेळचे पर्यावरण म्हणजे शिलावरण, जलावरण, जीवावरण व वातावरण म्हणजे शिलावरण, जलावरण, जीवावरण व वातावरण या मुख्य भौगोलिक घटकांतील सतत चालू असणाऱ्या प्रक्रिया व आंतरक्रिया यांचापरिणाम होय. मराठी विश्वकोषानुसार सर्व सजीव व पर्यावरण एकात्मपणे परस्पराश्रयी असतात.

सजीवांच्या त्याच्या जीवनसंवर्धनासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवून घ्यावी लागते. अथवा अनुकूल असे बदल करावे लागतात, जे सजीव आपल्यात बदल घडवून आणण्यात कमी पडतात, किंवा काही कारणास्तव ते स्वत:मध्ये बदल घडवू शकत नाही. त्यांना आपल्या प्राणास मुकावे लागते, कारण जो सजीव आपल्यात बदल स्वीकारतो, तोच तेथे तग धरुन राहू शकतो. पर्यावरण आणि मानव याचे परस्पर संबंध नेहमी बदलत असतात. पर्यावरणाचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे. पर्यावरण संरक्षण प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

पर्यावरणाचा हा शब्द परि आणि आपल्या आवरणातील दोन शब्दांनी बनलेला आहे. ज्याच्या आसपास परि म्हणजे सभोवतालच्या शब्दांना सांगा त्याच वेळी 'कव्हरिंग' म्हणजे आपल्या सभोवताल जे आहे.

वातावरण हवामान, स्वच्छता, प्रदूषण आणि सर्व वृक्षांनी बनलेले आहे. आणि या सर्व गोष्टी म्हणजेच पर्यावरणाचा थेट संबंध आहे. आणि या आपल्या दैनंदिन जिवनावर त्याचा परिणाम होतो.

मानव आणि पर्यावरण एकमेकांवर अवलंबून आहे. कमी झालेले प्रदूषण किंवा झाडे या सारख्या पर्यावरणाचे प्रदूषणाचा थेट परिणाम मानवी शरीरावर आणि आरोग्यावर होतो. झाडे वाचविणे, हवामान प्रदूषण रोखणे, स्वच्छता राखणे यासारख्या मानवी सवयींच्या पर्यावरणावर परिणाम होतो. पाणी दूषित करणे, वाया घालवणे, जास्त प्रमाणात झाडे तोडणे इत्यादी वाईट मानवी सवयींचा पर्यावरणावर वाईट परिणाम होतो. याचा परिणाम म्हणून मानवांना नंतर नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागतो.

संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केलेला हा दिवस जागतिक पातळीवर पर्यावरणाविषयी जागरुकता आणण्यासाठी साजरा केला जातो. याची सुरुवात १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून ते १६ जून या कालावधीत आयोजित जागतिक पर्यावरण दिन ५ जून १९७३ रोजी साजरा करण्यात आला.

पयावरणाच्या जैविक घटकामध्ये सूक्ष्म जीवांपासून कीटक, प्राणी आणि वनस्पती आणि सर्व जैविक क्रियाकलाप आणि त्यांच्याशी संबंधित प्रक्रिया असतात, जसे –पर्वत, खडक, नदी, वारा आणि हवामान घटक इ.

सर्वसाधारण अर्थाने हे आपल्या जीवनावर परिणाम करणारे सर्व जैविक आणि अजैविक घटक तथ्य प्रक्रिया आणि

घटनांचा एक घटक आहे. हे आपल्याला व्यापुन टाकते, आणि आपल्या जीवनावरील प्रत्येक घटना यावर अवलंबून असते आणि संपादित केली जाते. मानवांनी केलेल्या सर्व कृतींचा थेट आणि अप्रत्यक्ष वातावरणावर परिणाम होतो. अशा प्रकारे, जीव आणि पर्यावरणामध्येही एक संबंध आहे. जो परस्परांवर अवलंबून आहे.

मानवाच्या हस्तक्षेपाच्या आधारे, पर्यावरणाला दोन भागात विभागले जाऊ शकते. पहिले नैसर्गिक किंवा नैसर्गिक वातावरण आणि मानव निर्मित वातावरण. हा विभाग नैसर्गिक प्रक्रिया आणि परिस्थितीत मानवी हस्तक्षेपाच्या अत्याधिक प्रमाणात आणि घटकानुसार आहे. प्रदूषण, हवामान बदल इ. सारख्या पर्यावरणीय समस्या मानवांना त्यांच्या जीवनशैलीबद्दल पुनर्विचार करण्यास प्रवृत्त करतात.

पृथ्वीवर सर्वात बुध्दिमान जर कोणी असेल तर तो मानव त्यामुळे त्याने आपल्या बुध्दीमत्तेचा वापर करुन पर्यावरणाकडून जसा पाहिजे तसा आपला विकास साधून घेतला. मात्र, परतफेड करण्याचे साफ विसरला एखाद्या व्यक्तिकडून का समाजाकडून जेव्हा आपण मदत घेतो. तेव्हा त्याच्या प्रतिनेहमी कृतज्ञ राहतो, कधीही कृतघ्न होत नाही. हा नियम पर्यावरणाशी मानवाने कधीच पाळला नाही. त्यामुळे 'पर्यावरण वाचवा'' सारखे वाक्ये कानी पडत आहेत.

सर्वप्रथम मी पर्यावरणाचा एक घटक आहे. याचे भान प्रत्येकाने ठेवणे, गरजेचे आहे. ज्याप्रमारे कुटूंबातील प्रत्येक व्यक्ति कुटूंबाचा एक उपघटक असल्याचे भान ठेवून वागतो. त्यामुळेच त्या कुटूंबात सुख, समृध्दी व स्थिरता दिसून येते. कुटूंबातील एक जरी व्यक्ति बेजबाबदारपणे वागला तर संपूर्ण कुटूंबाला त्याचे फळ भोगावे लागते. पर्यावरणाचे सुध्दा थोडाफार तसेच आहे, असे वाटत नाहीत का ? तसे पर्यावरणाचे माझ्यावर फार मोठे कर्ज आहे. आणि ते कर्ज मला फेडायचे आहे. हेही ध्यानात असून द्यावे पर्यावरणाचा ऱ्हास होण्यामागे वाढती लोकसंख्या हे एक प्रमुख कारण आहे. कुटूंबातील संख्या वाढू लागली. कि त्याची घरे वाढतात आणि घरे बांधण्यासाठी जमीन अतिग्रहन करणे व तोडणे क्रमप्राप्तच ठरते. त्यामुळे जंगलतोड होऊन मानवाची वस्ती वाढू लागते आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो. त्यासाठी कुटूंब नियोजनासारख्याकार्यक्रमाचा प्रचार व प्रसार अधिक वेगात करणे आवश्यक आहे. लोकसंख्येला आळा घातल्याशिवाय आपली कोणतीही प्रगती शक्य नाही व आपला देश महासत्ता होणार नाही.

आपण अन्नाशिवाय एखादा दिवस, पाण्यावाचून एखादा तास जिवंत राहू शकतो. मात्र हवेतील ऑक्सिजनशिवाय क्षणभरसुध्दा जिवंत राहू शत नाही. आणि ऑक्सिजन निर्मितीचे सर्वात मोठे कार्य परिसरातील वृक्ष करित असतात. वनस्पती स्वत:चे अन्न स्वत: तयार करतात, आणि हवेतील कार्बनडायऑक्साईड म्हणजे खराब हवा वायू शोषून मानवास उपयुक्त असे ऑक्सिजन म्हणजे शुध्द हवा वायू हवेत सोडतात. त्यामुळे वनस्पती व वृक्षाची लागवड व संवर्धन करणे प्रतेक नागरीकाचे कर्तव्य आहे. जंगलतोड फार मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. जंगल वाचविण्यासाठी व लोकांमध्ये वृक्षाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी सुंदरलाल बहुगुणा यांनी ''चिपको आंदोलन'' चालविणे आणि त्यात यशस्वी सुध्दा झाले. वृक्षांचे महत्व अपारंपार आहे. हे आपले पुर्वजसुध्दा जाणून होते. संत तुकाराम याविषयी म्हणतात ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे'' खरंच वृक्ष हे आपले सगे, सोयरे, नातलग, मित्र परिवारातीलच नव्हे का ? वृक्षांच्या महत्वाविषयी आपले पूर्वज संत महात्मे आणि समाजसुधारकांनी ज्या बाबी सांगितल्या आहेत. ते सामान्यातल्या सामान्य लोकांपर्यत पोहचविणे अत्यंत महत्वाचे आहे.

आपला देश हा शेतीप्रधान देश आहे. येथील तृतीयांश जनतेचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. अधिक उत्पन्न काढण्याच्या स्वार्थासाठी शेतकऱ्यांनी शेतीची जुनी पद्धत बंद केली असून, रासायनिक औषध व खंताचा बेसुमार वापर करित आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस जमिनीचा कस तर नष्ट होतच आहे याशिवाय त्या रासायनिक घटकाच्या प्रतिकूल परिणाम मानवाच्या आरोग्यावर होऊन हानी पोहच आहे. डीडीटी या किटनाशक औषधाचा अतिवापर केल्यामुळे किटकनाशक मानवाच्या शरीरात कशी पोहचली जातात आणि ते पुढच्या पिढीत कसे संक्रमित होतात, त्याचे सत्य कॉर्सने १९६२ मध्ये सायलेंट स्प्रिंग या पुस्तकाद्वारे जगासमोर मांडले होते. उत्पादन कमी निघाले तरी चालणे, परंतु रासायनिक औषध व खंताचा अनावश्यक वापर टाळून सेंद्रीय पद्धतीने शेती करण्याचे ठरविले तरच सर्वांना त्याचा फायदा होतो हे लक्षात घ्यावे.

**वाबळे वर्षा भाऊसाहेब**
एफ.वाय.बी.एस्सी.

# चांद्रयान - २ मोहिम ...

भारतांच चांद्रयान – २ हे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणार आहे. आजवर चंद्राच्या विषुवृत्तीय प्रदेशामध्ये आजवरची चांद्रयानं उतरली आहेत. चंद्राचा विषुवृत्तीय प्रदेश इतर भागाच्या तुलनेत थोडा सपाट आहे. चंद्राचा दक्षिण ध्रुव दऱ्याखोऱ्यांचा आणि खडबडीत पृष्ठाचा आहे. त्यामुळे इतर कोणत्याही देशानं आजवर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर जाण्याचं धाडस केलेलं नाही. या चांद्रयान – २ मोहिमेचं मुख्य उद्देश आहे चंद्राच्यादक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करुन त्यातून एक रोव्हर चंद्राच्या पृष्ठावर सोडणं. अशी आहे चांद्रयान – २ मोहीम चांद्रयान – १ या मोहिमेचा हादुसरा टप्पा आहे. चंद्रावर सापडलेल्या पाण्याच्या रेणूंवर आणखी अभ्यास करण्याची गरज आहे. चंद्राचा पृष्ठभाग चंद्राचा गाभा यांचा अभ्यासकरुन चंद्रावरील पाण्याचे मूळ शोधून काएझ्याचा प्रयत्न केला जाईल. चंद्रावरील भूरचनेचा अभ्यास, तिथल्या खनिजांचा त्याच्या बाह्यवातावरणाचा अभ्यास करणं तसेच तेथे कोणत्या स्वरुपात पाणी उपलब्ध आहे. हे पाहाणं या सुध्दा चांद्रयान – २ मोहिमेच्या उद्दिष्टामंध्ये समावेश आहे. चंद्राच्या पृष्ठावर सॉफ्ट लँडिंग करणारा त्याच्या भूरचनेचा अंतर्गत गर्भाचा आणि वातावरणाचा अभ्यास करणारा भारत चौथा देश झाला आहे. यापूर्वी अशी कामगिरी सोव्हिएत युनियन अमेरिका आणिचीन यांनी केली आहे. मानवाला दीर्घकाळ फायदेशीर ठरेल. अशा गोष्टींचा अभ्यास या मोहिमेत करण्याचा प्रमुख उद्देश आहे.

चांद्रयानाचे तीन भाग आहेत. यामध्ये ऑर्बिटर, लँडर आणिरोव्हरचा समावेश आहे. लँडरच नाव 'विक्रम' असं ठेवण्यात आलं आहे. भारतीय अंतराळ मोहिमेचे जनक मानले जाणारे डॉ. विक्रम साराभाई यांच्या सन्मानार्थ हे नाव देण्यात आलं आहे. रोव्हरचं नाव 'प्रग्यान' असं ठेवण्यात आलं आहे हे सर्व भाग इस्त्रोने तयार केले आहेत. ऑर्बिटर चंद्राभोवती फिरत राहील. विक्रम लँडर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग तंत्राने उतरेल. त्यातून प्रग्यान बाहेर पडेल. आणिचंद्रावरील भूरचनेची माहिती गोळा करण्याचं वेगवेगळे प्रयोग करण्याचं काम करेल नंतर हे यान मॅझिनस–झी सिंपेलीयस – एन या दोन क्रेटर म्हणजे खोलगट दऱ्यांच्या मधल्या भागात उतरेल. दुसरा भाग म्हणजे रोव्हर हे चंद्रावरील दिवसभराच्या मोहिमा आणि वेगवेगळे प्रयोग करण्याचं काम करेल. चंद्रावरचा एक दिवस म्हणजे पृथ्वीवरच्या १४ दिवसांएवढा लांब असतो. तर ऑर्बिटर एक वर्षभर कार्यरत राहील.

जीएसएलव्ही–एमके ३ हे ६४० टन वजनाचे लाँचर भारतानं आजवचर तयार केलेलं सर्वांत जास्त वजनदार लाँचर आहे. हे लाँचर ३१८९० किलो वजनाचं चांद्रयान – २ घेऊन जाईल. या यानामध्ये १३ वैज्ञानिक उपकरणं आहेत. या १३ उपकरणांमध्ये १ उपकरण नासाचं आहे. चांद्रयान चंद्रावर अशोक चक्र आणि इस्त्रोच्या चिन्ह उमटवून परत येणार आहे. रोव्हरच्या एका चाकावर अशोकचक्र आणि दुसऱ्यावर इस्त्रोचे चिन्ह आहे. त्यामुळे रोव्हर उतरल्यानंतर त्यांची प्रतिमा चंद्रावर उमटेल.

चंद्राचा दक्षिण ध्रुव इतका खडबडीत आहे तर मग तिथं चांद्रयान उतरवण्याची का धडपड सुरु आहे. असा प्रश्न पडू शकतो. तर आजवर चंद्राच्या दक्षिण ध्रुवाचा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे या मोहिमेतून काहीतरी नवं सापडेल. असं मानलं जात आहे. या भागाचा मोठा प्रदेश सूर्याच्या सावलीत असतो. आणि सूर्यकिरणं कमी प्रमाणात पोहोचल्यामुळे हा प्रदेश अत्यंत थंड झाला आहे. त्यामुळे कायम अंधारात असणाऱ्या या प्रदेशात पाण्याचे अंश किंवा खनिज असतील असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

**निसळ रेवती**

एस.वाय.बी.एस्सी.

# औषधी वनस्पती - अननस

स्वादिष्ट, गोड, रुचकर असे अननस फळ सर्वपरिचित आहे. हिंदीत अनानास, गुजरातीत अननास, इंग्रजीत पाइनॅपल, लॅटिनमध्ये अननस कोसोसस म्हणून परिचित असलेले अननस 'ब्रोमेलिअसी' कुळातील आहे.

अननसात 'क' जीवनसत्वाचे प्रमाण अत्याधिक असून, ते शीतल फळ म्हणून खाण्यात येते. या पक्व फळापासून रस, मुरंबा, आसव, कढी व शिर्का तयार करतात. 'विनाकापड' निर्मितीसाठीसुध्दा याचा उपयोग होतो. अननसाच्या चकत्या करुन हवाबंद डब्यात राखून ठेवता येतात. अननसाचा दोरा गळ्यातील माणिमालांकरिता उपयोगात आणतात.

उपयोग –

१) पित्त प्रकृतीच्या व्यक्तीसाठी अननस लाभकारी आहे. अननस खाल्यामुळे पित्त शांत होते आणि आराम मिळतो.

२) अननस खाण्यापूर्वी सावधानता बाळगावी, रिकाम्यापोटी अननस खाणे हानिकारक असते. काही प्रसंगी ते विषकारक ठरते.

३) शक्यतो गर्भवती स्त्रियांना अननस खावयास देऊ नये. अननसाच्या अतिसेवनाने गर्भपात होण्याची शक्यता असते.

४) अननस खाताना आतील कठीण भाग काढून फेकून द्यावा. श्वसनाचा त्रास असणाऱ्याने अननस खाऊ नये.

५) बहुमुत्रतेच्या विकारातही अननस गुणकारी ठरते. त्यासाठी पिकलेल्या अननसाच्या तुकड्यावर पिंपरीचे चूर्ण घालून खावे.

**रेवती निसळ**
एस.वाय.बी.एस्सी.

## गझलमित्र ...

गरीबाच्या डोक्यावरची मोळी होणं चांगलं.
कधीकधी फकीराची झोळी होणं चांगलं,
शत्रूच्या छावणीत फितूर होण्यापेक्षा,
देशासाठी बंदुकीची गोळी होणं चांगलं,
कधी कधी आयुष्याची होळी होणं चांगलं
भुकेलेल्या पोटासाठी पोळी होणं चांगलं
शोभेसाठी भरजरी वस्त्र होण्यापेक्षा
उघड्या माय बहिणींची चोळी होणं चांगलं
गरीबाच्या डोक्यावरची मोळी होणं चांगलं.
ज्ञानासाठी समुद्राची होडी होणं चांगलं,
कधी कधी आकाशाची शिडी होणं चांगलं,
नारळाच्या झाडाचं फळ होण्यापेक्षा,
कधी कधी गुलाबाची कळी होणं चांगलं,
गरीबाच्या डोक्यावरची मोळी होणं चांगलं.
जीवनात साखरेची गोडी होणं चांगलं,
कधी कधी पावसाची झडी होणं चांगलं,
विषमतेची विषारी रुढी होण्यापेक्षा,
घरोघरी समतेची गुढी होणं चांगलं,
कधी कधी फकीराची झोळी होणं चांगलं.

**पाडळकर रेश्मा राजेंद्र**
टी.वाय.बी.ए.

## बाप ...

एका छोट्याशा दुकानात जाऊन त्याने
जुन्या छत्रांच्या काड्या
दुरुस्त करुन घेतल्या
आणि मग तो
एका मोठ्या दुकानात शिरला
तिथे मात्र त्याने
मुलांसाठी रंगीबेरंगी रेनकोट घेतले !
माणूस म्हणून तो
गरीब असेलही कदाचित ...
पण एक 'बाप' म्हणून
खूप श्रीमंत वाटला !!!

**राऊत सोनाली जालिंदर**
एस.वाय.बी.एस्सी.

# तरुणा जागा हो ...

आज देशामध्ये सगळीकडे भ्रष्टाचार विरोधात जनलोकपाल असो किंवा स्विस बँकेतील काळा पैसा असो. सगळ्याच बाबतीत सरकार चांगले अडचणीत आहे. आणि चार-पाच महिन्यात घडलेल्या सर्व घटनांवरुन एक गोष्ट लक्षात येते की आज कालचे युवक मोठ्या प्रमाणात आंदोलनामध्ये सहभाग नोंदवत आहेत आणि हाच युवक पुढील पिढीच्या राजकारणाची योग्य ओळख ठरेल.

आज देशाला स्वातंत्र्य मिळुन सुमारे पासष्ट वर्षे झाली तरीही देशासमोरची आव्हाने तिच आहेत. आज इथली सामान्य जनता अन्न, वस्त्र आणि निवारा याच्याच शोधात फिरत आहे. परंतु या सत्तर वर्षात सरकारी अधिकरी आणि मंत्री यांची बरीच प्रगती झाली आहे. उदा. ए.राजा, कलमाडी अशी मोठी यादीच आहे. हे भ्रष्ट नेते करोडो रुपयांचे भ्रष्टाचार करुन तुरुंगाची मस्त हवा खात आहेत. आणि आमची सर्व सामान्य गरीब जनता मात्र हे सगळे हताश पणे पाहत आहे.

आपल्या देशाची लोकसंख्या आज अब्जावर पोहोचली आहे. सरकार मंत्री, सरकारी अधिकारी हे मूठभर लोक गेली सत्तर वर्ष फक्त आम्हाला राबवतात हे मात्र आमच्या लक्षात तरी कसं येत नाही. गेल्या काही वर्षापासून विकासाच्या बाता मारायच्या पण विकास कुठे झालाय हे सांगू शकतात का ? सर्वात जास्त पैसा हा कर्मचारी. मंत्री अधिकारी यांच्यावर खर्च होतो. मग सांगा कसा होणार या देशाचा विकास ? देशाची जनता भ्रष्टाचाराला व महागाईला अक्षरश: वैतागली आहे. रेशनपासून तर मंत्रालयापर्यंत कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी काहीतरी दिल्याशिवाय पूर्ण होत नाही.

जे घडतय ते विपरीत आणि विचलित करणारे आहे. पण ही परिस्थिती बदलायला हवी.इथला तरुण जागा झाला तर ते नक्कीच शक्य आहे. अन्यथा येत्या काळात आपल्या देशाच मात्र काही खरं नाही. ग्रामपंचायत पासून ते संसदेपर्यंत निवडणुका आल्या की मोठी आश्वासने लोकांना देऊन सत्तेवर निवडून यायचे. मग प्रचंड पैसा कमवायचा आणि पुन्हा हाच पैसा पुढील निवडणुकीसाठी वापरायचा. मित्रांनो किती दिवस हे आपण आपल्या डोळ्यासमोर घडत असताना पाहत बसायचं आम्ही आणि आपण सर्वजण राजकारणात यायला हवे व तशीच वेळ आज आली आहे.

आजच्या विज्ञानाच्या युगात इंटरनेट आणि वृत्तपत्रात माध्यमातून जगात मोठ-मोठी आंदोलने झाली. इजिप्त सारख्या देशात तरुणांनी एकत्र येऊन जूलमी राजवटीचा नाश केला तर हे कोण ? आणि भारतात हे अशक्य आहे का ? अहो ! क्रांतीकारकांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. आणि जगातील सर्वात जास्त तरुण वर्ग असलेला देश म्हणून भारताचे नाव आहे. अशा या भारत देशात एक नवी क्रांती घडून येणे मुळीच अशक्य नाही. या देशातील सगळ्यांच तरुणांनी एकत्र येऊन नुसती फूक जरी मारली तरी सरकारची पळता भुयी थोडी होईल. एवढी प्रचंड ताकद आजच्या युवापिढी मध्ये आहे. भ्रष्टाचार आणि महागाई विरोधात सगळ्यांनी एकत्र येऊन लढणे आज गरजेचे आहे.

सभोवताली घडणाऱ्या घटना पाहता या देशाला फक्त युवक तारु शकतात. असा विश्वास वाटतो त्यामुळे तरुणांनी राजकारणाबाबतीत उदासीन न राहता राजकारणात सक्रीय होणे गरजेचे आहे. कारण राजकारणी हे कधीच सार्वभौम नसतात ते जनमतावर अवलंबून असतात. मित्रांनो आपण मोठे संघटन घडवणे आवश्यक आहे. हे संघटन या देशातील युवकच उभे करु शकतील असे वाटते !

**घोडेकर शितल बाजीराव**
टी.वाय.बी.ए.

# वडील ...

वडील म्हणजे उंबराचं झाड असतं
लपलेल्या भावनांचं
जणू खोड असतं ...
वडील म्हणजे समुद्रातलं जहाज असतं
खंबीर आधाराचं
दूसरं नाव असतं...
वडील म्हणजे समुद्रातलं जहाज असतं
पाण्यात न भिजवता
किनाऱ्याला नेत असतं ...
वडील म्हणजे वादळातलं घर असतं
सुखरुप निवाराचं जणू
एक स्थान असतं ...
वडील म्हणजे वादळातलं घर असतं
स्वत:वर वार झेलणाऱ्या
आश्रय दात्याचं एक रुप असतं ...

**राऊत सोनाली जालिंदर**
एस.वाय.बी.एस्सी.

# कॉलेजचे मनोगत

येथे नांदतात श्रमर्षि, या भूमीला क्षरण नाही
येथे ज्ञान गाळते घाम, विज्ञान दानव शरण नाही
येथे कला जीवनमय, अर्थाला अपहरण नाही
येथे भविष्य जन्मत आहे, या सीमांना मरण नाही ....

नमस्कार ! इयत्ता टी.वाय.बी.ए. विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ ! सर्वांच्या चेहऱ्यावर पुढच्या जीवनाबद्दल उत्सुकता तर त्याचबरोबर मला, जुन्या मित्रमैत्रिणींना, आवडत्या गुरुजनांना सोडून नाव लागणार हे दु:ख मग सर्वजन डोळ्यातल पाणी परतवून माझे फोटो काढत आहेत, माझ्याबद्दल जुन्या आठवणी सांगत आहेत. हे चित्र पाहून दरवर्षी सर्वांना माझ्याबद्दल असलेली आपुलकी व प्रेम पाहून मी आनंदित होऊन जाते. अहो, शिक्षणासाठी माझ्याकडे येतात, त्यांना नुसतच मोठ होताना नाही तर शिकून आत्मनिर्भर बनताना मी पाहिले आहे.

माझी स्थापना २०१२ मध्ये करण्यात आली. ज्ञानामार्फत समाजाला सुशिक्षीत तसेच सुसंस्कृत करण्याची धडपड मी पाहिली आहे. ज्ञानादानाचे कार्य अधिकाधिक मोठ्या प्रमाणात करण्यासाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न मी पाहिले आहेत काळाच्या ओघात कित्येक गोष्टी बदलल्या परंतू मी या ७ वर्षाच्या कालखंडात आजपर्यंत एक गोष्ट मात्र कायम आहे. ती म्हणजे शिक्षक निष्ठेने करीत असलले अध्यापन आणि विद्यार्थी उत्साहाने करीत असलेले अध्ययन.

माझ्याकडे येऊन शिकणाऱ्या या विद्यार्थ्यांकरीता माझ्यात भरपुर सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. ग्रंथालय ज्यातील विविध विषयावरच्या,सुप्रसिध्द लेखकांचा, विचारवंताच्या, त्यांनी लिहिलेल्या गोष्टी वाचून व्यापी बुद्धी सद्सद्विवेक बुद्धी जागृत राहते. सेमिनार हॉल मध्ये विविध कार्यक्रम होतात. त्याचप्रमाणे हिंदी दिन, पालक सभा, आई माझ्या महाविद्यालयात अशा अनेक गोष्टी करायला मोकळीक मिळते त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांना खेळ आणि खिलाडू वृत्ती शिकविण्यासाठी व ती जोपासण्यासाठी मोकळे मैदान !

एकीकडे विद्यार्थ्यांना कधी, काय व कसे शिकवावे कुठल्या विद्यार्थ्याची कुठल्या विषयात रुची आहे. कोण कशात कमी पडतय अशा प्रकारची चर्चा तर कधी विविध विषयांवरचा, पुस्तकावरचा, व्यक्तीविषयींच्या शिक्षकांचा अत्यंत ज्ञानप्रकाशदायी चर्चा मी ऐकल्या आहे. स्नेहसंमेलनाच्या वेळी २०१८-१९ ला कवि नारायन सुमंत यांना बोलवण्यात आले तसेच २०१९-२० ला कवि/लेखन बाळासाहेब सौदागर व सौ.गा.कविता सौदागर यांना बोलवण्यात आले होते. स्नेह संमेलनाच्या वेळी सुप्रसिध्द कवि/लेखन/गायक यांना बोलवण्यात येते. तसेच क्रिडा स्पर्धांची तयारी कधीपासून करावी ? तर कधी इंटरनेटवरील विविध विषयांच्या खेळाच्या, टि.व्ही मालिकांच्या चर्चा देखील मी ऐकल्या आहेत.

माझ्यातील सर्व विद्यार्थी सुशिक्षीत होऊन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुसंस्कृत होऊन बाहेर पडतात. आणि माझे, देशाचे नाव मोठे करतात, याचा मला सार्थ अभिमान आहे मुलांमध्ये आपली भारतीय संस्कृती स्वभाषेचा अभिमान, निसर्गाबद्दलची आत्मीयता अशा अनेक मुल्ये रुजविण्यासाठी प्रयत्न माझ्यासह सर्व शिक्षक करीत असतात मातीच्या गोळ्याचे सुंदरशा घड्यात रुपांतर होताना बघण्यात आनंद मला हजारो विद्यार्थ्याच्या रुपाने मिळत असतो स्नेहसंमेलनाच्या वेळी असलेली उत्सुकता, अनेक स्पर्धामध्ये भाग घेण्याची उर्मी, अनेक खेळ खेळताना होणारा व्यायाम व मिळणारा आनंद यासोबत मुलांचा सर्वांगीन विकास होत असतो हे मी अनुभवले आहे. परंतू मुलांनो आजच्या या धावपळीच्या व स्पर्धेच्या जगात तुम्ही घाबरुन जाऊ नका फक्त तुमच्यावरील संस्काराची व तुमच्यावरील देशाची जबाबदारीची आठवण ठेवा नेहमी सत्य, न्याय व नम्र असे वर्तन केले तर नक्कीच आनंदी व यशस्वी व्हाल.

आलसस्य कुतो विद्या, भविदयस्य कुतो धनम् ।
भाधनस्य कुतो मित्र, भमित्रस्य कुतो सुखम् ।।

आळस केल्यास विद्या नाही, विद्या नसल्यास धन नाही, सुशिक्षीत-सुसंस्कृत, सुस्थिर झाल्याशिवाय चांगली संगत, मित्र नाहीत आणि मित्र-मैत्रिणींशिवाय कोणतेच सुख नाही, जगण्यात काहीच अर्थ नाही म्हणूनच आळस झटका, विद्या प्राप्त करा आणि खुप मोठे व्हा.

फक्त धनाने नव्हे तर मनानेदेखील ...!

**भुजबळ प्रमिला आसाराम**
एस.वाय.बी.ए.

# गंध लावला पाहिजे का ?

कपाळी गंध कशासाठी लावायचे ?

ते नेमके कुठे लावावे ?

कपाळी गंध लावण्याची पद्धत हळू-हळू कमी होत चालली आहे. गंध लावून बाहेर जाण्यास आजच्या काळी कमी पणा वाटतो. वास्तविक कपाळी गंध लावण्याचे अनेक फायदे आहेत, त्याचप्रमाणे गंधाद्वारे बुध्दीचे आश्रयस्थान असलेल्या मस्तकाची पूजा करण्याचाही हेतू आहे. म्हणूनच ईश्वर पूजनानंतर पूजकाने आपल्या कपाळी गंध लावण्याची प्रथा पडलेली आहे. ''गंध म्हणजे केवळ कपाळाची शोभा नव्हे तर बुध्दीचे पूजन आहे.'' ईश्वर हे साध्य तर बुध्दी हे साधन असल्याने बुध्दीची पुजा करणे आवश्यक आहे.

गंध हे मांगल्याचे ही प्रतीक आहे. कपाळी गंध लावलेला माणुस आणि गंध न लावलेला माणुस यातला फरक लगेच लक्षात येतो. गंधामुळे माणुस शुचिर्भुत बनतो त्याच्या चेहऱ्यावर मांगल्याचे भाव दिसू लागतात. आकाशाने देखिल यासाठी सुर्य-चंद्ररुपी दोन तिलंका दिवसा व रात्री धारण केले आहे. मात्र हे गंध दोन्ही भुवयांमध्ये (आज्ञाचक्रात) कधी ही लावू नये ते त्या वरील भागात लावावे. कारण आज्ञाचक्राच्या ठिकाणी असलेला सुप्तावस्थेतील तृतीय नेत्र बंद होता कामा नये.

नित्य गंध लावणारा मरणोत्तर वैकुंठलोकी जातो असे धर्मशास्त्र सांगतात. गंध लावण्याचा अधिकार प्रत्येक वर्णातील पुरुषाला आहे ; श्रीकृष्णाचे उपासक उभे गंध लावतात, तर शिव उपासक आडवे गंध लावतात. गंध चंदनाचे, केशराचे रक्तचंदनाचे व गोपीचंदनाचे जसे आवडेल तसे लावावे. बाहेर जाताना गंध लावून जाण्याची लाज वाटत असेल तर निदान देवपुजेनंतर तरी कपाळी गंध आवर्जून लावावे.

स्नान झाल्यावर कपाळी गंध,

टिळा का लावतात ?

आपला देह म्हणजे ईश्वराचे मंदीर आहे. मंदीरात जो सर्वत्र ईश्वरी भाव असतो तसाच देहात रोमारोमात होणारे स्फुरण हे ईश्वरी भावाकडे खेचनारे असते. हे ईश्वरी तत्व विशेष करुन मार्ग स्नानात प्रतीतीय येते भ्रुकुटीचे मध्यभागी आज्ञाचक्रावर सगुण परमेश्वर वास करतो. देहाला मायेची उपाधी असेपर्यंत सगुण परमेश्वराचीच पुजा करणे प्रशस्त असते. म्हणून स्नान झाल्यावर कपाळाचे मध्यभागी असणाऱ्या परमेश्वराच्या मुर्तीस टिळा लावावा. म्हणजे ही सुध्दा एक छोटी देवपूजा असते. ज्यांना कामाचा भरपुर व्याप असून श्वास घ्यायला देखील फुरसत मिळत नाही. अशा माणसांनी स्नान झाल्यावर किमान कपाळी तरी टिळा लावावा. त्या निमित्ताने भगवंताची पूजा होते टिळा लावताना मधल्या बोटाने लावावा मधल्या बोटाचा संबंध हृदयाशी असल्यामुळे या बोटातून प्रवाहित होणारी स्पंदने ह्वदयापर्यंत जाऊन भिडतात. जप करताना सुध्दा मधले बोट वापरतात. त्यामुळे दिवसभर मन शांत व भक्तिभावाने राहते. टिळा लावल्यामुळे मनुष्य सहसा पापकर्माकडे वळत नाही. कारण जो टिळा लावतो तो देवाला मानतो. समाज देखिल त्याच्याकडे सन्मानाने बघत असतो. हिंदू धर्माखेरीज इतर कोणत्याही धर्माचे लोक टिळा लावत नाहीत. या बाबतीत कठोष निषदात असे सांगितले आहे की ह्वदयातून निघणाऱ्या शंभर प्रमुख नाड्यांपैकी सुषुम्ना ही नाडी मस्तकाच्या समोरील भागातून निघते यातूनच मोक्ष मार्ग निघतो जो ऊर्ध्व दिशेने जातो. माणसाचा मृत्यु झाल्यावर जीवाला या मार्गाने गमन करता आला तर त्याला त्वरीत गती मिळते म्हणूनच कपाळी तिलक धारण करतात.

टिळा लावणे :

टिळा लावल्याने समाजामध्ये मान सन्मानाने पाहतात. आर्य धर्मात प्रत्येक शुभ कार्यात टिळा लावणे ही प्रथा आहे टिळा अनेक वस्तू व पदार्थांचा असतो.

उदा. हळदी-कुंकू, केशर, भस्म आणि चंदन हे प्रमुख आहेत.

पण टिळा लावण्यामागे काय भावना असते ?

पुराणामध्ये असे लिहिलेले आहे की संगमाच्या किनाऱ्यावर गंगा स्नान केल्यानंतर साधू पंडिताद्वारे टिळा लावल्यास मोक्ष प्राप्ती होते. कपाळावर टिळा लावण्यामागे अध्यात्मिक महत्व आहे. आपल्या शरीरात सात सुक्ष्म उर्जा केंद्र आहे. जे अपार शक्तीचे भांडार आहे. त्यांना ''चक्र'' असे म्हणतात.

कपाळावर आपण जिथे आपण टिळा लावतो तिथे आज्ञाचक्र असते. हा चक्र आपल्या शरीरावरच्या सगळ्यात महत्वपूर्ण स्थान आहे. इथे आपल्या शरीराच्या प्रमुख तीन नाड्या ! इडा, पिंगला, सुष्मना येऊन मिळतात, म्हणून याला त्रिवेणी किंवा संगम म्हणतात. हे गुरु स्थान आहे. इथूनच पूर्ण शरीराचे संचालन होते. हे आपल्या चेतनांचे मुख्य स्थान पण आहे, याला मनाचे घर पण म्हणतात. त्यामुळे हे स्थान पूर्ण शरीरात सगळ्यात जास्त पूजनीय आहे. योगामध्ये ध्यान करता

वेळी याच ठिकाणी मन एकाग्र केले जाते. टिळा लावल्याने स्वभावात चांगले बदल घडून येतात व पाहण्याचे सात्विक प्रभाव आपल्यावर पडतो.

टिळा खास प्रयोजनासाठी पण लावतात. जसे मोक्षप्राप्ती करायची असेल तर टिळा अंगठ्याने लावतात, शत्रुचा नाश करायचा असेल तर तर्जनीने लावतात, धनप्राप्ती हेतू मध्यभागी लावतात आणि शांती प्राप्तीसाठी अनामिकानी टिळा लावला जातो. साधारणत: टिळा अनामिकेद्वारे लावला जातो आणि त्याच्यात पण चंदनाचाच लावला जातो.

टिळ्यासह तांदूळ लावल्यास आई लक्ष्मी आकर्षित होते व थंडळ सात्विक प्रदान करण्याचे निमित्त लपलेले असते. म्हणून टिळा जरुर लावावा आर्य प्रथेप्रमाणे टिळा लावणे शुभ आहे. टिळा आर्य संस्कृतीची ओळख आहे.

टिळा लावणे हे फक्त धार्मिक नव्हे तर वैज्ञानिक शास्त्र आहे. कपाळावर टिळा लावण्याचे हिंदू धर्मात महत्व आहे. हिंदू धर्मात पुजा करताना टिळा लावण्याची प्रथा आहे. पुजा करताना नव्हे तर प्रत्येक मंगल कार्याची सुरुवात ही गंध लावूनच करण्यात येते. गंध लावल्याशिवाय कोणतेही मंगल कार्य सुरु होत नाही.

कपाळावर टिळा नसणे हे अशुभ मानले जाते. पुजेच्या वेळी कुंकुम टिळा किंवा चंदनाचा टिळा लावतात. हा टिळा कपाळावर किंवा दोन्ही भुवयांच्या मधोमध लावण्याची प्रथा आहे. अनामिकेचा खालचा भाग हस्त ज्योतिषानुसार सुर्यक्षेत्र मानले गेले आहे.

कपाळावर आज्ञा चक्राचे स्थान आहे. सुर्याच्या बोटाने टिळा लावल्याने मुखमंडल सुर्याप्रमाणे तेजस्वी बनू लागते. तसेच आज्ञाचक्रही जागृत व्हायला मदत होते. यामुळे मनाची एकाग्रता वाढायला मदत होते. टिळा लावणारा यशस्वी बनतो.

**साक्षी कासार**
टी.वाय.बी.ए.

# दैव आणि कर्म

दैव = नशीब कर्म = मेहनत

आमच्या गल्लीत एक दुकानदार आहे मी त्याच्या दुकानावर गेलो व त्याला विचारले कि बाबा रे ! तुला एक प्रश्न विचारायचा आहे, त्याचे उत्तर देवू शकतोस का ? तो म्हणाला तुम्ही खुशाल विचारा मी नक्की उत्तर देण्याचा प्रयत्न करीन.

मी विचारले की माणुस मेहनत करतो, मग त्याला यश मिळाले की तो म्हणतो हे देवाने यश पदरात टाकले.

''मला सांग दैव श्रेष्ट की मेहनत ?'' मला वाटले कि त्याची पुरती बोलती बंद होणार, पण त्याने जे उत्तर दिले ते ऐकून मी अवाक (आश्चर्यचकित) झालो.

बोलती बंद झाली पण त्याची नाही माझीच !

त्याने उत्तर दिले, तो म्हणाला : मला सांगा तुमचे बँकेत सेफ डिपॉजीटचे लॉकर आहे ? त्या लॉकरला दोन चाव्या असतात. एक तुमच्याकडे आणि एक बँक मॅनेजर कडे. लॉकर उघडताना त्या दोन्ही चाव्या लॉकर ला लावाव्या लागतात. तरच ते लॉकर उघडते, अन्यथा नाही. बरोबर ना ? मी म्हणालो बरोबर, पण त्याचा मी विचारलेल्या प्रश्नाशी काय संबंध ?

तो म्हणाला जश्या बँक लॉकरला दोन चाव्या असतात तश्याच आपल्या मानवास नियतीने दोन चाव्या दिल्या. एक मेहनतीची (कर्म) चावी. ती आपल्यापाशी असते. तर दुसरी नशीब (दैव) चावी ही त्या परमेश्वरापाशी असते.

आपण आपल्या कडची चावी यशाच्या लॉकरला लावून द्यायची. जेव्हा परमेश्वर त्याकडची चावी यशाच्या लॉकरला लावेल तेव्हाच आपले यशाचे लॉकर उघडेल अन्यथा नाही.

यशासाठी मेहनत व नशीब या दोन्ही चाव्या आवश्यक आहेत त्याशिवाय यशाचे द्वार उघडणार नाही. मानवाने मेहनत करताना त्या परमेश्वराचे सतत नामस्मरण करत रहावे. तरच त्याला यश मिळेल अन्यथा नाही. नुसती मेहनत करुनही उपयोग नाही व नुसती भक्ती करुनही उपयोग नाही.

यश मिळवण्यासाठी मेहनत व भक्ती दोन्ही आवश्यक आहे.

**कासार साक्षी**
टी.वाय.बी.ए.

## माझे कॉलेज ...

असे माझे कॉलेज
जनता कॉलेज
त्याचे नाव आहे
ज्याच्या पवित्र भूमीत
रुईछत्तीसी ते गाव
प्राध्यापक आमचे प्रेमळ
त्याहून प्रेमळ प्राचार्य
त्यांच्या मार्गदर्शनाने उफाळून आलंय
पुणे विद्यापीठात रुईछत्तीसीमधील कॉलेज
विद्यार्थीनी मैत्रीणी माझ्या
सुसज्ज सारे वर्ग
जणु इथच अवतरलय
अवकाशातील स्वर्ग
ग्रामीण विद्यार्थ्यांच्या पायथ्याशी
घातली घडी शिक्षणाची
गरज आहे आम्हाला
तुमच्या सर्वांच्या आशीवार्दाची
तुमचे गुण घेऊन समाजात जाऊ आम्ही
तुम्ही म्हणाल,
अशी पाखरे येती स्मृती ठेवूनी जाती
परंतु तुटणारनाही कधी तुमची
आमच्या मनातील नाती

**घोंगडे पूजा विठ्ठल**
एफ.वाय.बी.एस्सी.

## कस विसरु तुला ...

आस नाही मला कशाची,
कारण ओढ आहे फक्त तुझी
क्षितीजाच्या रंगासारख प्रेम करतो तुला
अगं, सांग ना विसरु कस तुला ?
बेधुंद झालो मी तुझ्यात,
विसरायला लागलो मला माझ्यात
काही नको ग मला,
फक्त थोडी जागा दे तुझ्या ह्रदयात
कायमच ह्रदयात ठेवायचयं तुला
अंग, सांग ना विसरु कस तुला ?
प्रेम माझ तुझ्यावर खोट नाही
नसेल तु सोबत जर जगण्याची आस उरत नाही
प्रेम करतो मी फक्त तुला,
अंग, सांग ना विसरु कस तुला ?
एकदा दे माझ्या हातात हात
आयुष्यभरासाठी देईन तुला साथ
भावनेच्या ओघात वाहू असलो जरी मी
कधीच तुझ्यावरच प्रेम होणार नाही कमी
मनातल्या मनात कुठ तर लपवेन तुला,
अंग सांग ना विसरु कस तुला ?

**शुभम गोरे**

## पाखरु ...

डोंगराच्या पायथ्याशी एक गाव होत इटुकल
झाडाच्या सावलीत घर होत पिटुकलं
सोडून त्या गावाला
आईच्या पदराला प्रेमाच्या सावलीला
शहरात आल एक पाखरु
गर्दीत हरवल ते लेकरु
स्वच्छंदी बालपण, हसर तारुण्य
नदीचा खळखळाट, पहाटेचा किलबिलाट
गोष्टी सारख अंधारात गडप झालं
मोर्चे दंगलतल्या या शहरात

अनोळखी लोकांच्या चेहऱ्यात
आवाजांच्या खडखडाटात, दिव्यांच्या झगमगाटात
बिथरलं ते पाखरु
पंख असुन अवसान गेलं
त्या वाईट नजरेनी घायाळ झालं
उसनं बळ घेऊन आकाशात भरारत आहे
पायथ्याशी असलेल्या गावाला डोंगरावर
नेण्याच्या मनाच्या त्या उन्मत्क तयारीत आहे

**कारंजकर प्राजक्ता**
एस.वाय.बी.एस्सी.

## आई ...

प्रसुतीच्या असह्य वेदना सहन करीत
जन्म देणारी प्रत्येकाचीच असते आई,
भुकेलेल्या तहानल्याची ओढ असते आई,
बाळाच्या भल्यासाठी कष्टाचे डोंगर उपसणारी
असते आई,
दुर गेलेल्या बाळाची डोळ्यात प्राण आणुन
वाट पाहणारी असते आई,
दु:खात असणाऱ्यास मन मोकळं करायची
जागा असते आई,
बाळाला कुशीत घेणारी मायेची पाखर
असते आई,
जीवनाच्या वाटेवरची दिशा असते आई,
ठेचाळणाऱ्या प्रत्येकांच्याच ओठावर असते आई
दुखाच्या गावामधली
आधाराची छाया असते आई,
प्रेमाचा सागर, ममतेचा अखंड पाझर असते आई
आपल्या पिलांना पंखाखाली घालणारी
वात्सल्याची मुर्ती
युगायुगांची माता
असते आई ...!!

**बोरुडे निता अनिल**
द्वितीय वर्ष विज्ञान

## मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचं ...

मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचं...
धावत जाऊन पुन्हा माझ्या रोजच्या
बाकावर बसायचं....
रोज सकाळी मोठ्या आवाजात
राष्ट्रगीत म्हणायचं...
नव्या वहीचा वास घेत पहिल्या पानावर
स्वच्छ अक्षरात आपलं नाव लिहायच.
मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचं...
मधली सुट्टी होताच वॉटरबॅग सोडुन
नळाखाली हात धरुनच पाणी प्यायचं.
कसा बसा डबा संपवत चिंचा-बोरं खायचं ...
सायकलच्या चाकाला स्टंप बनवून
खोडबर पाटीने क्रिकेट खेळायचं
उदया पाऊस पडुन शाळेला सुट्टी मिळेल का ?
हा विचार करत झोपी जायचं..
घंटा व्हायची वाट बघत का बसेना
परंतु मित्र-मैत्रिणी सोबत सायकलची
रेस लावुन घरी पोहचायचं
ती पळत जाण्याची मजा अनुभवायला
मला पुन्हा एकदा शाळेत जायचं....

**बोरुडे निता अनिल**

## विझलो आज जरी मी...

विझलो आज जरी मी,
हा माझा अंत नाही
पेटेन उद्या नव्याने
हे सामर्थ्य नाशवंत नाही ...!
छाटले जरी पंख माझे
पुन्हा उडेन मी
अडवू शकेल मला,
अजून अशी भिंत नाही
माझी झोपडी जाळण्याचे

केलेत कैक कावे ....
जळेल झोपडी अशी,
आग ती ज्वलंत नाही...
रोखण्यास वाट माझी,
वादळे होती आतूर
डोळ्यांत जरी, गेली धूळ,
थांबण्यास उसंत नाही...
येतील वादळे, खेटेल तुफान
तरी वाट चालतो ...
अडथळ्यांना भिवून अडखळणे
पावलांना पसंत नाही

**अडागळे सारिका नंदू**
तृतीय वर्ष (विज्ञान)

## माझे वडील ...

वडील म्हणजे एक झाड,
पावलोपावली आधार देणार आणि सांभाळणार...
वडील म्हणजे कष्ट, मेहनत,
सर्वांच्या सुखासाठी झडगणारी ...
वडील म्हणजे एक चैतन्य,
नेहमीच उत्साही ठेवणारं...
वडील म्हणजे एक हक्काची जागा,
मन मोकळ करण्याची....
वडील म्हणजे थोडी भीती,
चूक करताना वाटणारी...
वडील म्हणजे विनयता,
लहानांनाही मोठ करणारी ...
वडील म्हणजे प्रेमाचा समुद्र,
नेहमीच भरतीकडे वाहणारा ....
वडील म्हणजे निरंजन,
ह्रदयाच्या देव्हाऱ्यात जपावं असं...

**अडागळे सारिका नंदू**
तृतीय वर्ष (विज्ञान)

## आठवणी महाविद्यालयीन जीवनाच्या ...

एक हूरहूर मनात दाटलेली,
महाविद्यालयीन जीवनाची सांगता झाली
सर्वजण उंच स्वप्नांच्या आकांक्षा घेवून निघालेला,
आयुष्याच्या नव्या लढाईसाठी सज्ज झालेला !

कोणी उच्च शिक्षण घेवून होईल स्थायिक,
कोणी समाजसेवा, तर कोणी देशसेवेत जाईल
कोणी विवाहबध्द होऊन हाकतील संसाराचा गाडा,
विश्वभ्रमंतीला जाईल एखादा निसर्गवेडा !

सोशल मीडीयावर राहतील सगळे जोडून,
दिवसांमागून दिवस जातील, नाते जाईल मोडून,
एक दिवस अचानक फोन खणखणेल
जुन्या आठवणींना काळजावर प्रकाश पडेल !

तो दिवस असेल फक्त स्वत:च्या भावनाचा,
तो दिवस असेल फक्त आठवणींच्या जीवनाचा,
फक्त जुन्या सोनेरी क्षणाचा सहवासाचा,
गमती-जमतीचा, दंगा-मस्तीचा, अनुभवलेला आठवणीचा

अश्या या अविस्मरणीय आठवणीची आयुष्यभर साथ,
कट्ट्यावरील बोंलाना नाही कुणाची मात,
लेक्चरला बुडवून बसावेसे वाटायचे गार्डनला,
पण मित्रांच्या चहाच्या भांडणानात निघायचो कटिंगला !

सगळं जसच्या तसं आठवतं,
अगदी क्षणापूर्वी घडल्यासारखं,
पण आता
गेले ते आवडते दिवस,
राहिल्या त्या लाडक्या आठवणी ...

**बोरुडे योगेश पोपट**
टी.वाय.बी.एस्सी.

## निसर्गाची गाथा ...

जगायचे कसे
शिकवते माती
सृजनाची गती
सोबतीला ...!
वृक्ष, झाडे , वेली
प्राणवायू देती
पाखरांशी नाती
सर्वकाळ ...!
उगवते होऊ
मातीसम आता
सावलीची गाथा
गाऊ सारे ...!
माळरानाचेही
करु आता लाड
निसर्गाची वाढ
करु चला ... !
भुकेचा तो प्रश्न
सोडवते माती
जीवनाला गती
देई सदा ...!
माय मातीलाच
मानुनिया गुरु
निसर्गाची करु
राखणी गा ...!
नातीहुनही मोठा
म्हणू नये कोणी
मातीतच पाणी
झिरपते ...!
चला होऊ माती
निसर्गाचा धर्म
झाडापरी कर्म
करु आता ...!
माझ्या कवितेने
झाड व्हावे आता
निसर्गाची गाथा
गाथा जावे ...!

**बोरुडे दिपाली बाळू**
एफ.वाय.बी.एस्सी.

## मैत्रीण ...

एक तर मैत्रीण अशी हवी
जरी न बघता पुढे गेले तरी
मागून आवाज देणारी
आपल्यासाठी हसणारी
वेळ आलीच तर अश्रूही पुसणारी
स्वत:च्या घासतला घास
आठवणीने काढून ठेवणारी
वेळ प्रसंगी आपल्या वेड्या मैत्रिणीची
समजूत काढणारी
वाकडं पाऊल पडताना मात्र
मुस्काटात मारणारी
यशाच्या शिखरांवर आपली पाठ थोपटणारी
सगळ्यांच्या गलक्यात
आपणास आठवणीनं
आपण नसताना व्याकुळ होणारी खरंच !
अशी एक तरी जीवा भावाची
मैत्रीण हवी जी आपणास मैत्रीण म्हणणारी

**बोरुडे दिपाली बाळू**
एफ.वाय.बी.एस्सी.

## घराची प्रतिष्ठा ...

सुख हे घराचे छत आहे
प्रेम हा घराचा पाया आहे
पैसा हा घराचा पाहुणा आहे
नम्रता ही घराची प्रतिष्ठा आहे
समाधान हे घराचे सुख आहे
गर्विष्ठपणा हा घराचा वैरी आहे
शांतता ही घराची लक्ष्मी आहे
जिव्हाळा हा घराचा कळस आहे
व्यवस्था ही घराची शोभा आहे
मानुसकी घराची भिंत आहे
गोड शब्द हे घराचे धन दौलत आहे
चारित्र्य संपन्नता ही घराची आखणी आहे
दुजाभाव नसने ही घरातील समई आहे
आत्मविश्वास हे घरातील देवस्थान आहे

**कासार साक्षी**
टी.वाय.बी.ए.

## धरणीमाता ...

ती पावसात भिजत होती,
तिला म्हटलं छत्री खाली ये
तरी म्हणे, मला पावसाचा आनंद घेऊ दे,
सर्व सीमा तोडुन स्वच्छंद भिजू दे,
पावसाला थांबवावा कसे कोडे पडले होते
पाऊस येतच होता, ति भिजतच होती
पावसाने तिला त्याच्यात सामावले होते,
जणू पावसाने तिला व तिने पावसाला
खुप जाणून घेतले होते
तिच्या वरुन पाणी पुढे सरसावुन जात होते,
तिने कधी पावसाला अडवले नव्हते.
त्यांचे नाते अतुट होते
पुर्ण सृष्टी दोघांमध्ये विलीन होती
ती दुसरी कोणी नव्हे धरणीमाता होती

**वाळके भाग्यश्री महादेव**
टी.वाय.बी.एस्सी.

## परीक्षेला जाता जाता ...

परीक्षेला जाता जाता
एकच इच्छा मनी असते
पेपरला तेच विचारले जावे
जे मला येत असते
पण कुणास ठाऊक
नेहमी उलटे होत असते
जे वाचलेले नसते
तेच पेपरात विचारले जाते
खरं तर नाराज होऊन
चालायचे नसते
विचारलेल्या प्रश्नांना

## कोणत्याही तीन अंकी संख्येचा वर्ग काढण्याची सोपी पध्दत ...

उदा :- (१९४)२
पायऱ्या :-

१) १९४ या संख्येचा पुढची कोणतीही जवळची संख्या घ्यावी
उदा... २००

२) २०० - १९४ = ६ या दोनसंख्यामधला फरक ६ म्हणून
१९४ + ६ = २००
१९४ - ६ = १८८

३) आता २०० व १८८ या संख्यांचा गुणाकार करा.
२०० × १८८ = ३७६००

४) आलेल्या गुणाकाराची व २०० व १९४ या संख्यामधल्या फरक ६ चा वर्ग ३६ यांची बेरीज केल्यास (१९४)२ चा वर्ग प्राप्त होतो.
३७६०० + ३६ = ३७६३६

**राऊत सोनाली जालिंदर**
एस.वाय.बी.एस्सी.

## कविता ...

काहीतरी ठोकायचे असते
पण ज्याला उत्तरानुरुप
ठोकता येत नसते
त्याला शेवटी पुन्हा
ॲडमिशन लाईनमध्ये
उभे रहायचे असते.

**शेख शम्मा तैन्नूर**
एफ.वाय.बी.एस्सी.

# हिंदी विभाग



भगवान मूर्तियो या मंदिरों में नही है ।
भगवान हमारी अनुभूति में ही विराजमान है ।
हमारी आत्मा ही भगवान का मंदिर है ।
सभी के शरीर में आत्मा रुपी मंदिर में
अनुभूति रुपी भगवान विराजित रहते है ।
बस इंसान इन्हें महसूस नहीं कर पाता
और दुनियाभर में खोजता रहता है ।
जबकि भगवान हमारे अंदर ही मौजूद है ।

**– आर्य चाणक्य**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शिर्षक | लेखक/कवी |
|---|---|---|
| १ | हिंदी भाषा की उपयोगिता | मयुरी गोरे |
| २ | राजभाषा हिंदी | सोनाली राऊत |
| ३ | वर्तमान शिक्षा प्रणाली | प्रणाली बोरकर |
| ४ | प्राकृतिक आपदा | प्राजक्ता भांबरे |
| ५ | कॉलेज | नीता बोरुडे |
| ६ | काव्यशास्त्र | साक्षी कासार |
| ७ | जनसंख्या | करण धनवट |
| ८ | संविधान के आर्टीकल १४ | राहूल शाडगे |
| ९ | अनुच्छेद ३७० | अभिषेक घोलप |
| १० | यादे | निता बोरुडे |
| ११ | रिश्ते | निता बोरुडे |
| १२ | मेहनत | अंजली झांबरे |
| १३ | मै बोझ नही हूँ पापा | निता बोरुडे |
| १४ | जीवन ज्योती | -- |
| १५ | औरत बोझ नही | अश्विनी परदेशी |
| १६ | शायरी | प्रांजली साळवे |
| १७ | प्रेरणा | सोनाली राऊत |
| १८ | बेटी बचाओ | अश्विनी परदेशी |
| १९ | मंजील | अश्विनी परदेशी |
| २० | दोस्ती का मतलब | शुभांगी रायकर |
| २१ | आँसू | -- |
| २२ | जितेगी तो बस खुशिही | शुभांगी रायकर |
| २३ | मंजिल | निता बोरुडे |
| २४ | जीना या मरना | सोनाली राऊत |
| २५ | बेटी | सोनाली राऊत |
| २६ | जिंदगी | सोनाली राऊत |
| २७ | हिंदी है एक सितारा | सोनाली राऊत |
| २८ | हिंदी हमारी राष्ट्रीय भाषा | प्रिती खाकाळ |
| २९ | यारो उम्र गुजार दी | निता बोरुडे |
| ३० | सुबह | रेवती निसळ |
| ३१ | बातों ही बातों में | रेवती निसळ |
| ३२ | पैसे से माँ नही ... | भाग्यश्री वाळके |

# हिंदी भाषा की उपयोगिता !

हिंदी भाषा विशाल जनसमूह की भाषा है । जो सीमाओ के बंधन तोडकर आज वैश्विक स्तरपर अपनी पहचान बना रही है । वैसे तो, प्रत्येक भाषा की विशेषता होती है की वही व्यक्ति के विचारों और मनोभावों को स्पष्ट एवं प्रभावी रुप से व्यक्त करने का एक माध्यम होती है । लेकिन हिन्दी भाषा की कतिपय विशेषताएँ (विशेषताएँ शुध्द है ।) उसे अन्य भाषाओं से अलग और खार बनाती है ।

हिंदी प्रयोग के लिए सर्वाधिक उपयुक्त भाषा मानी जा रही है । हिंदी भाषा का व्याकरण संस्कृत से ही अनुप्राणित है । स्वाभाविक रुप से इसके व्याकरणिक नियम प्राय: अपपाद – रहित है । इसलिए स्पष्ट है और आसान है ।

''हिंदी भाषा को संस्कृत की बडी बेटी कही जाती है ।'' इसमें स्वरों और व्यंजनों को अलग–अलग व्यवस्थित किया गया है । इसके अतिरिक्त सभी वर्णों को की उच्चारण स्थानादि की विशेषताओं के आधार पर रखा गया है ।

हिंदी भाषा की लिपि (देवनागरी) विश्व की सर्वाधिक वैज्ञानिक लिपि है । इसमें प्रत्येक ध्वनि के लिए एक निश्चित लिपि चिन्ह का प्रयोग होता है और एक लिपि चिन्ह एक ही ध्वनि का प्रतिनिधित्व करता है । हिंदी की वर्णमाला ध्वन्यात्मक वर्णमाला है ; जिसमे हर ध्वनि के लिए लिपि चिन्ह है । इस प्रकार यह इतनी सामर्थ्यवान भाषा है कि हम जो कुछ भी बोल सकते है । वह सब हिंदी में लिख भी सकते है ।

हिंदी का शब्द कोष बहुत विशाल है । जहाँ एक–एक वस्तु, कार्य, भाव आदि को व्यक्त करने के लिए सैकडों शब्द विद्यमान है । हिंदी को शब्दकोश में शब्दों की संख्या २.५ लाख से भी अधिक है और यह लगातार बढती ही जा रही है । हिंदी भाषा की विशेषता ये भी है की इसने अन्य भाषाओं के शब्दों को ग्रहन करने में कभी कोई संकोच नही किया । जब और जहाँ आवश्यकता हुई हिंदी भाषा में नए शब्द शामिल होकर हिंदी के अपने हो गये और हिंदी की समृध्दि बढती गई ।

''लिपट जाता हूँ मम्मी से और जैसी मुस्कुराती है ।
मैं उर्दू में गजल कहता हूँ हिन्दी मुस्कुराती है ।''

हिंदी भाषा में लेखन और उच्चारण में स्पष्टता है । हिंदी भाषा की एक विशेषता यह भी है कि इसमे निर्जिव वस्तुओं (संज्ञाओ) के लिए भी लिंग का निर्धारण होता है । हिंदी एक व्यावहारिक भाषा है । इसमें अग्रेजी की भाँति कई – कई रिश्तो के लिए एक ही अलग शब्द है ।

हिंदी भारत की राजभाषा है ।

हिंदी आज दुनिया की दूसरी सबसे अधिक बोली जाने वाली भाषा के रुप में प्रतिष्ठित है । बीबीसी की एक खबर के अनुसार इस समय विश्व में ५४.५ करोड हिंदी बोलने वाले है । गैर हिंदी भाषी देशों के लोग भी हिंदी सीख रहे है ।

हिंदी पुरे भारत और दुनिया के कई देशो जैसे अमेरिका, कनाडा, मॉरीशस, सुरीमाम फिजी, गुसाना, मलेशिया, त्रिनिदाद एवं टोबैगो, नेपाल आदि में बोले और समजी जाने वाली भाषा है । प्रयोग की दृष्टि से भी हिंदी इतनी समुध्द है की इसकी पाँच उपभाषाएँ और कम से कम सोलह बोलियाँ प्रचलित है जिनमें से कई बोलियों और उपभाषाओं मे भी प्रचुर साहित्य उपलब्ध है । हिंदी बहुत सरल है और लचीली भाषा है । जिसे सीखने में विशेष कठिनाई नहीं होती । इस समय विश्व के लगभग १५० विश्व विद्यालयों में हिंदी पढाई जा रही है जो हिंदी के बढते प्रयोग और प्रभाव का संकेताक है । जिस्सदेह हिंदी या सर्वाधिक तीव्रता से प्रसरित हो रही भाषाओं में से एक है ।

सबसे बडे खर्च इंजिन गुगल ने भी हिंदी को अब अपनी सभी सेवाओं में एक माध्यम के रुप में शामिल किया है । कंप्युटर और इंटरनेट पर भी हिंदी का प्रयोग बहुत तेजी से बड रहा है । आज प्राय: हर विषय पर सामग्री हिंदी में प्राप्त की जा सकती है । सोशल मीडिया में हिंदी का प्रयोग करने वालों की संख्या दिन–प्रतिदिन बढती जा रही है । फेसबुक टविट्र आदि में हिंदी के पर्याप्त संशोधन और प्रसाधक उपलब्ध है । ऐसे समय में जबकि भारत तेजी से विकास के पथ पर अग्रेसर है और सारी दुनिया की निगाहें भारत की ओर लगी है । भारत के विकास के साथ ही दुनिया में हिंदी का महत्व बढना भी निश्चित है ।

जिस देश को अपनी भाषा और साहित्य के गौरव का

अनुभव नहीं है वह कभी समृध्द नहीं है सकता । डॉ. राजेंद्र प्रसाद जी ने यहाँ कहा है । आईये देश को पुन: विश्वगुरु बनाने के साथ ही, हिंदी को भी विश्वभाषा बनाने का संकल्प ले । भाषा की उत्पत्ती के सबन्ध में यह सबसे प्राचीन सिध्दान्त है ।

हिंदी भाषा के उज्वत स्वरुप का ज्ञान कराने के लिए यह आवश्यक है उसकी गुणवत्ता क्षमता शिल्प कौशल्य और सौंदर्य का सही–सही आकलन किया जाए ।

१. संसार की उन्नत भाषाओं में हिंदी सबसे अधिक व्यवस्थित भाषा है ।
२. वह सबसे अधिक सरल भाषा है ।
३. वह सबसे अधिक लापीली भाषा है ।
४. हिंदी दुनिया की सर्वाधिक तीव्रता से प्रसारित हो रही भाषाओं में से एक है ।
५. हिन्दी का साहित्य सभी दृष्टियों से समृध्द है ।

भारत के स्वातंत्र्यता–संग्राम की वाहिका और वर्तमान में देशप्रेम का अमुर्त वाहक हैं । भारत की सम्पर्क भाषा हिन्दी की विकास की अन्य विशेषताएँ है । हिन्दी पत्रकारिता का आरम्भ भारत के उन क्षेत्रों से हुआ जो हिन्दी भाषी नहीं थे ।

हिंदी को राष्ट्रभाषा बनाने के आन्दोलन अहिन्दी भाषाओ (महात्मा गांधी, दयानन्द सरस्वती आदि) ने आरम्भ किया ।

हिंदी पत्रकारिता की कहानी भारतीय राष्ट्रीयता की कहानी है । जब–जब हिन्दी पर दबाव पडा वह अधिक शक्ति शाली होकर उभरी है हिन्दी के विकास में पहले साधू–संत एवं धार्मिक नेताओ का महत्वपुर्ण योगदान रहा ।

हिंदी और भारत भाषाओं के बिना अधुरा है ऐ भारत । आज भी हिंदी देश के कोने–कोने में बोली जाती है । अहिंदी भाषी भी थोडी–बहुत और टुटी–फुटी हिंदी बोल और समज सकता है । स्वतंत्र भारत की संविधान सभा ने १४ सितम्बर १९४९ को ही हिंदी भाषा को भारत संघ की राजभाषा के रुप में मान्यता दे दी ।

''निजभाषा उन्नति अहै, सब उन्नति को मुल ।
बिनु निज भाषा ज्ञान के, मिटे न हिय को सुल ।।''

**मयुरी गोरे**
प्रथम वर्ष विज्ञान

## राजभाषा हिंदी

''हर भाषा एक तारा...
जो देता ज्ञान का उजियारा...
हर एक तारा है न्यारा...
हिंदी एक है सितारा ...
सबसे प्यारा सबसे न्यारा ...
जिससे जगमगता देश सारा ।।''

वस्तुत हमारी भाषा का नाम हिंदी ईरानियों की देन है । संस्कृत की ध्वनी फारसी में यह बोली जाती है । जैसे सप्ताह को हप्ताह, सिंधू को होन्दूर, सिंधू नदी के कारण ही हिन्दू शब्द की उत्पत्ती हुई । कालांतर में सिंधू नदी के पास का संम्पूर्ण भाग हिन्द कहा जाने लगा । हिन्दी भाषा का इतिहास लगभग एक हजार वर्ष पुराना माना गया है । राजभाषा का अर्थ संविधानद्वारा स्वीकृत सरकारी कामकाज की भाषा । किसीभी देश का सरकारी कामकाज जिस भाषा में हो ऐसा कोई निर्देश संविधान के प्रवधानो द्वारा दिया जाता है । वह उस देश की राजभाषा कही जाती है ।

हमारे भारत में हिंदी भाषा का उपयोग ज्यादातर लोग करते है । हिंदी भाषा हमारे देश की राजभाषज्ञ होने के सहित राष्ट्रभाषा, परिनिष्ठीत भाषा, संचार भाषा, आंतरराष्ट्रीय भाषा, संपर्क भाषा है । हिंदी भाषा का काल इ.स. १००० से आजतक का है । हिंदी भाषा के निर्माण से लेकर आजतक हिंदी में काफी परिवर्तन हो चुका है । हिंदी को ५ उपभाषाये और १८ बोलियों में वर्गीकृत किया ।

''अपनी हिंदी है एक सितारा

आसमान में चमके तारा
वही तारा है हमारा
वही है हमारी हिंदी भाषा
हिंदी है हमारी राष्ट्रभाषा ।।''

हमारा देश स्वतंत्र्य होने के बाद हमारे देश की राजभाषा कौनसी भाषा को बनाये यह प्रश्न था । हिंदी भाषा का प्रयोग उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, दिल्ली, हरियाणा, राजस्थान, बिहार, छत्तिसगड, उत्तराचंल आदि राज्यों के राष्ट्रभाषा के रुप में किया जाता था । बहोत कम राज्यों में हिंदी नहीं बोली जाती थी । थोडे लोगों को हिंदी सिखाना आसान था । इस वजह से १४ सितबर १९४९ को हिंदी भाषा को राजभाषा का दर्जा मिला । और इन थोडे राज्यों में हिंदी का प्रसार करने के लिए कुछ संस्थाओं कि स्थापना हुई । १) काशी नागरी प्रचारणी सभा वाराणसी । २) हिंदी साहित्य संम्मेलन प्रयाग । ३) दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा मद्रास (चेन्नई) । ४) राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा । ५) महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे । इन संस्थाओं द्वारा हिंदी धभाषा का प्रचार हो रहा था । और वर्तमान में भारत में जनसंचार का प्रमुख माध्यम हिंदी भाषा है । संचार का अर्थ होता है – एक सूचना को दुसरों तक पहुचाना । राजभाषज्ञ बनने के बाद से राष्ट्रभाषा होने कारण हिंदी भाषा का उपयोग भारत की जनसंख्या टेलिव्हिजन, रेडिओ, न्यूज (समाचार) के लिए प्रचुर मात्रा में किया जाता है ।

''हिंदी है हमारी जान,
हिंदी है हमारी शान,
हिंदी बस्ती जन–मन में
हिंदी बहती है रग–रग में ।।''

हिंदी भाषा की जितनी माँग है, इंटरनेट पर उतनी उपलब्धता नहीं है । लेकिन जिस रफ्तार से भारत में इंटरनेट का विकास हुआ है उसी तरह से हिंदी भी इंटरनेट पे छा रही है । समाचार पत्र से लेकर हिंदी ब्लॉग तक अपनी उपस्थिति दर्ज कर रहा है । साधूवाट तो गुगल को भी जाता है , जिसने हिंदी में खोज करने की जगह उपलब्ध कराई । इतना ही नहीं विकीपिडिया ने भी हिन्दी को महत्ता को समझते हुए कई सारी सामग्री का सॉफ्टवेअर अनुवाद हिंदी में प्रदान करना सुरु कर दिया है, जिससें हिंन्दी भाषी को किसी भी विषय की जानकारी अहम लोकप्रिय भाषा बन कर उभरी है । मेरा मानना है जब लोग अपने विचार और लेखन हिंदी मे भाषा की सारी सामग्री हिंदी में भी इंटरनेट पर मिलने लगेंगी । हिंदी का विकास हमारे जीवन में आवश्यक और अपरिहार्य था । विशाल हिंदी प्रदेश का सांस्कृतिक विकास उर्दु में संम्भव न था । सन १९२८ में 'ख्वाजा हसन' निजामी कुरान का हिंदी अनुवाद कराया तो उन्होनें भूमिका मे बताया की उत्तर भारत में अधिकांश मुसलमान हिंदी जानते हैं ऊर्दू नहीं ।

''नए साल का संकल्प करे
हिंदी का सम्मान करें
हिंदी में ही बात करें
हिंदी की शान बढे ।।''

कबीर, जायसी, तुलसीदास, सूरदास, केशव, बिहारी घनानंद आदि हिंदी के कवि होकर गये है । और इनके साहित्य अजरामर है । और उनसे लोगो को अच्छा जीवन व्यतीत करने की प्रेरणा मिलती है । संचार माध्यमों में हिंदी के बढते प्रयोग से निश्चित ही हिंदी का भविष्य उज्ज्वल दिखाई देता है । हिंदी फिल्मों ने हिंदी के प्रचार में अपना प्रयाप्त योगदान दिया है । इन जनसंचार माध्यमों के कारण आज हिंदी धीरे – धीरे अपनी राजभाषा का दर्जा प्राप्त कर रहीं है ।

आज वर्तमान में सरकारी नोकरी के लिए जो भी केंद्रशासन कि परीक्षा और साक्षात्कार होते हैं वह हिंदी में होते हैं । आज हिंदी बहोत महत्वपूर्ण भाषा है । हिंदी भाषा का भविष्य उज्ज्वल है ..।

**सोनाली राऊत**
द्वितीय वर्ष विज्ञान

# वर्तमान शिक्षा प्रणाली



भारत की वर्तमान शिक्षा प्रणाली को परतंत्र काल की शिक्षा प्रणाली माना जाता है । यह ब्रिटिश शासन की देन मानी जाती है । इस प्रणाली की वजह से आज भी सफेद कॉलरों वाले लिपिक और बाबू ही पैदा हो रहे हैं । इसी शिक्षा प्रणाली की वजह से विद्यार्थियों का शारीरिक और आत्मिक विकास नहीं हो पाता है ।

प्राचीन काल में शिक्षा का बहूत महत्व था । सभ्यता, संस्कृति और शिक्षा का उदय सबसे पहले भारत में हुआ था। प्राचीनकाल में शिक्षा का स्थान नगरों ओर शोरगुल से बहुत दूर वनों के गुरुकुल में होता था । इन गुरुकुलों का संचालन ऋषि-मुनि करते थे । प्राचीन काल में विद्यार्थी ब्रह्मचर्य का पालन करते थे । अपने गुरु के चरणों में बैठकर ही पूरी शिक्षा प्राप्त करते थे ।

कुछ इसी तरह के विद्यालय तक्षशिला और नालंदा थे । यहाँ पर विदेशी भी शिक्षा प्राप्त करने के लिए आते थे । फिर मध्ययुग आया तब भारत को लंबे समय तक परतंत्रता भोगनी पडी थी । मुसलमानों के युग में अरबी-फारसी शिक्षा का प्रसार हुआ । जब १८ वी और १९ वी शताब्दी आई तो शिक्षा को केवल अमीर और सामंत ही ग्रहण कर सकते थे । स्त्री शिक्षा तो लगभग खत्म ही हो गई थी ।

हमारा भारत १५ अगस्त १९४७ को आजाद हुआ था । हमारे कर्णधारों का ध्यान नई शिक्षा प्रणाली की तरफ गया क्योंकि ब्रिटिश शिक्षा प्रणाली हमारी शिक्षा प्रणाली के अनुकूल नहीं थी । गांधी जी ने शिक्षा के विषय में कहा था कि शिक्षा का अर्थ बच्चों में सारी शारीरिक, मानसिक और नैतिक शक्तियों का विकास करना होता है । शिक्षा प्रणाली में सुधार लाने के लिए अनेक समितियाँ बनाई गयी ।

कमेटी द्वारा एक विशाल योजना बनाई गई जो तीन साल के भीतर ५०% शिक्षा का प्रसार कर सके । सैकेंडरी शिक्षा का निर्माण किया गया । विश्वविद्यालय से ही समस्या को सुलझाने के प्रयास किये गये । बाद में बेसिक शिक्षा समिति बनाई गई जिसका उद्देश भारत में बेसिक शिक्षा का प्रसार करना था । अखिल भारतीय शिक्षा समिति की सिफारिस की वजह से बच्चों में बेसिक शिक्षा को अनिवार्य कर दिया गया था ।

शिक्षा के क्षेत्र में परिवर्तन लाने के लिए कोठारी आयोग की स्थापना की गई । इस आयोग ने राष्ट्रीय स्तर पर नई योजना लागु करने की सिफारिश की । इस योजना की चर्चा-परिचर्चा लंबे समय तक चली थी । देश के बहुत से राज्यों में इस प्रणाली को लागू किया गया था । इस प्रणालीसे दस साल तक दसवीं कक्षा में सामान्य शिक्षा होगी ।

इसमें सभी विद्यार्थी एक जैसे विषयों का अध्ययन करेंगे । इस पाठ्यक्रम में दो भाषाएँ गणित, विज्ञान और सामाजिक पाँच विषयों पर अध्ययन किया जायेगा । लेकिन विद्यार्थियों को शारीरिक शिक्षा से भी परिचित होना चाहिए । सातवी की परीक्षा के बाद विद्यार्थी अलग-अलग विषयों पर अध्ययन करेंगे । अगर वो चाहे तो विज्ञान ले सकता है । कॉमर्स ले सकते है और औदयोगिक कार्यों के लिए क्राफ्ट भी ले सकता है ।

नवीन शिक्षा प्रणाली को रोजगार को सामने रखकर बनाया गया है । हम लोक अक्सर देखते है कि लोग विश्वविद्यालय और महाविद्यालयों में भाग तो लेते है लेकिंन पढने में उनकी रुचि नहीं होती है । ऐसे लोग समाज में अनुशासनहीनता और अराजकता पैदा करते है । नई शिक्षा नीति से हमें यह लाभ होगा कि ऐसे विद्यार्थी दसवी तक ही रह जायेगे और वे महाविद्यालय में प्रवेश नहीं ले पाएंगे ।

जो विद्यार्थी योग्य होंगे वे कॉलेजों मे प्रवेश ले सकेंगे । दसवी करने के बाद विद्यार्थी डिप्लोमा पाठ्यक्रमों में प्रवेश लेकर रोजगार प्राप्त कर सकेंगे । लेकिन अगर हमें, नवीन शिक्षा प्रणाली को सफल बनाना है तो स्थान-स्थान पर डिप्लोमा पाठ्यक्रम खोलने पडेंगे । जिसमे दसवी करने के बाद विद्यार्थी कॉलेजों की तरफ नहीं भागें । इससे शिक्षित लोगों की बेरोजगारी में कमी आएगी और शिक्षित लोगों का समाज में मान-सम्मान होगा । इस शिक्षा प्रणाली से विद्यार्थियों का सर्वांगीण विकास होगा और यह भविष्य के निर्माण के लिए भी सहायक होगी । इस प्रणाली को पूरी तरह से सफल बनाने का भार हमारे शिक्षकों पर है । सरकार को इस बात पर ध्यान देना होगा कि योग्य विद्यार्थी ही शिक्षक बने क्योंकि वो ही उत्तम शिक्षा दे पाएंगे । नई शिक्षा नीति में इस बात पर बल दिया गया है, योग्य शिक्षक ही शिक्षा जगत में प्रवेश कर सकते हैं । इसके साथ इस बात पर भी बल दिया गया है कि विद्यार्थियों को रोजगार के अधिक से अधिक अवसर मिले ।

**प्रणाली बोरकर**
द्वितीय वर्ष

# प्राकृतिक आपदा

''प्राकृतिक आपदाओं से डरने की आवश्यकता नहीं वरना उनसे निपटने के लिए तैयार रहने की आवश्यकता है ।'' एक प्राकृतिक आपदा, पृथ्वी की प्राकृतिक प्रक्रिया से उत्पन्न बडी एक घटना है । यह जीवन और संपत्ति के एक बडे नुकसान का कारण बनती है ।

ऐसी आपदाओं के दौरान अपना जीवन खो देने वालों की संख्या से कहीं अधिक संख्या ऐसे लोगों की होती है, जो बेघर और अनाथ हेने के बाद जीवन का सामना करते हैं । यहाँ तक कि शांति और अर्थव्यवस्था भी प्राकृतिक आपदा से बुरी तरह से प्रभावित हो जाती है ।

एक प्राकृतक आपदा एक प्राकृतिक जोखिम का ही परिणाम है (जैसे की हिमस्खलन, भूकंप, ज्वालामुखी, बाढ, सूनामी, चक्रवाती तूफान, बर्फानी तूफान, ओलावृष्टि आदि) जो की मानव गतिविर्धियो को प्रभावित करता है । मानव दुर्बलताओं को उचित योजना और आपातकालीन प्रबंधन का अभाव और बढा देता है, जिसकी वजह से आर्थिक मानवीय और पर्यावरण को नुकसान पहुँचता है ।

आज पृथ्वी में अनेक तरह की प्राकृतिक आपदा से हर साल जान-माल का बहुत भारी नुकसान होता है । ये आपदाएँ अचानक आकर कुछ पलों में सब कुछ स्वाहा कर देती है । मनुष्य जब तक कुछ समझ पाता है, तब तक यह आपदा उसका सब कुछ तबाह कर चुकी होती है । इन आपदाओं से बचने के लिए ना ही उसके पास कोई कारगर उपाय है न ही कोई कारगर यंत्रणा.

एक प्राकृतिक आपदा एक प्राकृतिक प्रक्रिया है और यह सत्य है कि हम इसे रोक नहीं सकते लेकिन कुछ तैयारी करके, हम अपने जीवन और संपत्ति की नुकसान की भयावहता को कुछ कम कर सकते हैं । ''ग्लोबल वार्मिंग'' जो सभी समस्याओंकी जड है, सबसे पहले हमें उस को कम करना चाहिए । ऐसी किसी भी आपदा के पश्चात पैसे की पर्याप्तता हमारे जीवन के पुननिर्माण में मुख्य्य भूमिका निभा सकती है । इसके लिए आवश्यक रुप से बीमा पॉलिसियाँ होना चाहिए ।

प्राकृतिक आपदा से बचाव के लिए वैज्ञानिकोकों अग्रिम वार्मिंग सिस्टम का अविष्कार करना चाहिए । निर्माण करते समय हमें इस बात से आश्वस्त होना चाहिए कि उक्त निर्माण भूकंप का सामना करने के लिए पर्याप्त मजबूत है । लोगों को ऐसी किसी भी आपदा के दौरान निकासी के बारे में शिक्षित करना चाहिए । इस प्रकार कुछ सावधानियां बरत कर हम प्राकृतिक आपदाओं से होने वाले नुकसान को कम कर उसकी भरपाई करने का प्रयास कर सकते हैं ।

**प्राजक्ता भांबरे**
द्वितीय वर्ष विज्ञान

# कॉलेज ...

कॉलेज के ये मधुर पल
फिर ना वापस आयेंगे ।
सच तो ये है दोस्तों
कल हम सब जुदा हो जाऐंगे ।
भूल सकेंगे क्या कभी
हम कॉलेज जीवन की कहानी ।
याद करेंगे, आहे भरेंगे
आयेगी जब याद पुरानी ।
आज तुम हो, आज हम है
और यह कॉलेज मंदिर हमारा ।
कल कहाँ रहोगे तुम, कहा रहेंगे हम
फिर न होगा शायद मिलना हमारा ।
आज तक कितने आकर चले गये
कल कितने आनेवाले हैं,
आज कहाँ जो पढते हैं, मस्ती करते हैं ।
कल वो भी जुदा होने वाले हैं ।
हम ना रहेंगे, तुम ना रहोंगे,
हमेशा याद रहेगा ये कॉलेज हमारा,
Let's enjoy !!

**निता बोरुडे**
द्वितीय वर्ष विज्ञान

# काव्यशास्त्र

'काव्यशास्त्र' काव्य और साहित्य का दर्शन तथा विज्ञान है । यह काव्यकृतियों की ज्ञानराशि है । काव्यशास्त्र के लिए पुराने नाम 'साहित्यशास्त्र' तथा 'अलंकारशास्त्र' है और साहित्य के व्यापक रचनात्मक वाङमय को समेटने पर इसे 'समीक्षाशास्त्र' भी कहा जाने लगा । संस्कृत आलोचना के अनेक अभिधानो में अलंकारशास्त्र ही नितान्त लोकप्रिय अभिधान है । इसके प्राचीन नामों में 'क्रियाकलाप' (क्रिया-काव्यग्रंथ, कल्पविधान) वात्स्यायन द्वार निर्दिष्ट ६४ कलाओं मे से अन्यतम है । राजशेखर द्वारा उल्लिखित 'साहित्य विद्या' नामकरण काव्य की भारतीयकल्पना के उपर आश्रित है, परंतु ये नामकरण प्रसिध्द नहीं हो सके ।

युगानुरुप परिस्थितियों के अनुसार काव्य और साहित्य का कथ्य और शिल्प बदलता रहता है, फलत: काव्यशास्त्रीय सिद्धान्तों में भी निरन्तर परिवर्तन होता रहा है । भारत में भरत के सिद्धान्तों से लेकर आज तक और पश्चिम में सुकरात और उसके शिष्य प्लेटो से लेकर अद्यतन 'नवआलोचना' (नियो-क्रिटीसिज्म) तक के सिद्धांतो के ऐतिहासिक अनुशीलन से यह बात साफ हो जाती है । भारत में काव्य नाटकादि कृतियो को 'लक्ष्य ग्रंथ' तथा सैद्धांतिक ग्रंथी को 'लक्षण ग्रंथ' कहा जाता है । ये लक्षण ग्रंथ सदा ग्रंथ के प्रश्चभ्दावनी तथा अनुगानी है और महान कवि इनकी लीक को चुनौती देते देखे जाते हैं ।

मूलत: काव्यशास्त्रीय चिंतन शब्दकाव्य (महाकाव्य एवं मुक्तक) तथा दृश्यकाव्य (नाटक) के ही सम्बन्ध में सिद्धान्त स्थिर करता देखा जाता है । अरस्तू के 'पोयटिक्स' में कॉमेडी, दैजेठी, तथा एपिक की समीक्षात्मक कसौटी का आकलन है और भारत का नाट्यशास्त्र केवल रुपक या दृश्यकाव्य की ही समीक्षा के सिद्धान्त प्रस्तुत करता है । भारत और पश्चिम मे यह चिन्तन ई.पू.तीसरी चौथी शती से ही प्रौढ रुप में मिलने लगता है जो इस बात का परिचायक है की काव्य के विषय में विचार विमर्श कई सदियों पहले ही शुरु हो चुका था ।

'अलंकारशास्त्र' मे अलंकार शब्द का प्रयोग व्यापक तथा संकीर्ण दोनों अर्थो में समझना चाहिए । अलंकार के दो अर्थ मान्य है ।

१) अलङ्क्रियते अनेन
इति अलङ्कार :
(काव्य में शोभा के आधायक उपमा, रुपक आदि ; संकिर्ण अर्थ) ;

२) अलङ्क्रियते इति
अलङ्कार:
(काव्य की शोभा ; व्यापक अर्थ)

व्यापक अर्थ स्वीकार करने पर अलंकारशास्त्र काव्यशोभा के अधापक समस्त तत्वो – गुण, रीति, रस, वृत्ती, ध्वनि आदि का विजएक शास्त्र है । जिसमें इन तत्वों में स्वरुप तथा महत्व का रुचिर विवरण प्रस्तुत किया गया है । संकीर्ण अर्थ मे ग्रहण करने पर यह नाम अपने ऐतिहासिक महत्व को अभिव्यक्त करता है ।

साहित्यशास्त्र के आरम्भिक युग में ''अलङ्कार'' (उपमा, रुपक, अनुप्रास आदी) ही काव्य का सर्वस्व माना जाता था जिसके अभाव में काव्य उष्णताहिन अग्नि के समान निष्प्राण और निर्जीव होता है । 'अलंकार' के गंभीर विश्लेषन से एक ओर 'वक्रोक्ति' का तत्व उभ्दूत हुआ और दूसरी और अर्थ की समीक्षा करने पर 'ध्वनी' के सिद्धान्त का स्पष्ट संकेत मिला । इसलिए रस, ध्वनी, गुण आदि काव्यतत्वों का प्रतिपादक होने पर भी अलंकार 'प्राधान्य दृष्टि के कारण ही, आलोचनाशास्त्र का नाम ''अलङ्कारशास्त्र'' पडा और वह लोकप्रिय भी हुआ ।

अलंकारों की विशेषत: उपमा, रुपक, स्वाभावीक्ति तथा अतिशयोक्ति की, उपलब्धि ऋग्वेद के मंत्रो मे निश्चित रुप से होती है, परन्तु वैदिक युग में इस शास्त्र के अविर्भाव का प्रमाण नहीं मिलता । निरुक्त के अनुशीलन से 'उपमा' का साहित्यीक विश्लेषण यास्क से पूर्ववर्ती युग की आलोचना की परिणत फल प्रतीत होता है । यास्क ने किसी प्राचीन आचार्य के उपमा लक्षण का निर्देश ही नहीं किया है, प्रत्युत कर्मोपमा, भुतोपमा, रुपोपमा, सिद्धोपता, अर्थोपमा (लुप्तोपमा) जैसे मौलिक उपमाप्रकारों का भी दृष्टांतपुर: सर वर्णन किया है । इससे स्पष्ट है

कि अलंकार का उदय यास्क (सप्तम शती ई पु) से भी पूर्व हो चुका था । काश्यप तथा वररुचि ब्रम्हदत्त तथा नंदिस्वामी के नाम तरुण वाचस्पति ने आद्य, आलंकारिको में आवश्य लिए है परंतु इनके ग्रंथ और मत का परिचय नहीं मिलता । राजशेखर द्वारा 'काव्यमीमांस' में निर्दिष्ट बृहस्पती, उपमन्यु, सुवर्णनाथ, प्रचेतायन, शेष, पुलस्त्य, पाराशर, उतथ्य आदि अष्टादश आचार्यो में से केवल भरत का ''नाट्यशास्त्र'' ही आजकल उपलब्ध है । अन्य आचार्य केवल काल्पनिक सत्ता धारण करते हैं । इतना तो निश्चित है कि यूनानी आलोचना के उदय शताद्रियों पूर्व ''अलंकारशास्त्र'' प्रामाणिक शास्त्रपद्धति के रुप में प्रतिष्ठित हो चुका था ।

काव्यकृति मूलत: तिहरे आयाम से जुडी है – काव्य, काव्यकर्ता (कवि), काव्यनुशिलक । जहाँ तक नाट्यरुप काव्य का सम्बन्ध है, काव्यकर्ता के साथ उसमें नाट्य प्रयोंगकर्ता नटादि का भी समावेश हो जाता है । काव्यशास्त्रीय चिन्तकों का ध्यान इन सभी पक्षों की और सदा जाता रहा है । सबसे पहला प्रशन जो कवि के संबंध मे उठता है, वह यह है की कवि या कलाकार अन्य मानव, धर्मोपदेशक, दार्शनिक, वैज्ञानिक, राजनितिक विचारक से किस घात में विशिष्ट है और क्यों खास प्रकृति के व्यक्ति ही कवि या कलाकार बन पाते हैं ? दुसरे शब्दों मेंख कवित्वशक्ति के हेतु क्या है । सुकरात और प्लेटो कवित्वशक्ति को दैवी आवेश की देन मानते हैं, अध्ययन और अभ्यास का प्रतिफल नहीं । भारत के काव्यशास्त्री काव्यरचना में प्रतिभा को प्रधान हेतु मानते हुए भी इसके साथ व्युत्पत्ति और अभ्यास को भी कम महत्व नही देते । परम्परावादी आलोचक केवल प्रतिभा को काव्यशक्ति का हेतू नहीं मानते हुए भी इसके साथ व्युत्पत्ति और अभ्यास को भी कम महत्व नहीं देते । परम्परावादी आलोचक केवल प्रतिभा को काव्यशक्ती का हेतू नहीं मानते । उधर पश्चिम के रोमैंटिक विचारक कलाकृति की मूल प्रेरणा एकमात्र प्रतिभा को ही मानते है । फिर भी इस बात में सभी चिंतक एकमत है कवि विशिष्ट प्रतिभाशील व्यक्ति है जो अपनी प्रतिभा के माध्यम से काव्य के रुप में नई सृष्टी की उद्भवना करता है ।

दुसरा महत्वपुर्ण प्रश्न है,

कविता का प्रयोजन क्या है ?

आखिर कवि कविता क्यों करता है ? इस सम्बन्ध में चिंतकों के दी दल है – परंपरावादी चिंतक काव्य का लक्ष्य या प्रयोजन नैतिक उपदेश की प्रतिष्ठा मानते हैं । काव्य द्वारा कवि किन्हीं मूल्यों की स्थापना करना चाहता है, ठीक उसी तरह जैसे धार्मिक उपदेशक । किन्तु फर्क यह है कि उसकी कृति शैलीशिल्प की दृष्टि से रमणीय और रसमय होने के कारण धर्मग्रंथों या नीतिग्रंथों से विशिष्ट बन जाती है । स्वच्छंदतावादी चिंतक इसे नहीं स्वीकारता । वह कवि को उपदेशक नही मानता । उसके अनुसार कवि सृष्टी, अपनी अनुभूतियों का सारभत तत्व और उसके अंतम् में उमडते – घुमडते भावों का स्वत: बहा हुआ परिवाह मात्र है । पूर्व और पश्चिम के प्राय: सभी मतमतांतर इन दो खेवों में मजे से समेटे जा सकते हैं ।

काव्य का सबसे महत्वपूर्ण पक्ष वह कृति है, जो हमारे समक्ष चाक्षुब (नाटक में), श्रावण तथा बौद्धिक सन्निकर्ष का माध्यम बनती है और इस माध्यम से वह हमारे मन या संवित् (चेतना) को प्रभावित करती है । अत: काव्यशास्त्रीय चिंतन में यह वह प्रधान पक्ष है जिसके अनेक पहलुओं को लेकर पूर्व और पश्चिम के विचारक पिछले अढाई हजार वर्षो से उहापोह करते आ रहे हैं । सबसे पहला सवाल जो काव्य के कथ्य के विषय में उठता है, वह यह है कि काव्य में वर्णित घटनाएँ आदि कहाँ तक वैज्ञानिक सत्य से मेल खाती है । यह प्राय: सभी समीक्षक स्वीकार करते हैं, कि काव्य में तथ्य–कथन–प्रणाली का आश्रय नहीं किया जाता । उसमें जिस सत्य का समुद्घाटन होता है, वह वास्तविक सत्य न होकर संभाव्य सत्य होता है । इसी आधार पर काव्यविरोधी कवि की कल्पना को भ्रामित या सत्य से बहुत दूर घोषित करते है । प्लेटो ने तो इसे सत्य से दूहर । दूर सिद्ध किया है । भारत के विचारकों ने काव्यकृति को भ्रान्ति नहीं माना है, यदयपि एक स्थान पर भट्ट लोल्लट ने रससूत्र की व्याख्या करते हुए नाटक के अभिनय में राम आदि का अनुकरण करते नटों में राम आदि के भ्रांतिज्ञान का संकेत किया है । पश्चिम में इधर मनोविज्ञान के विकास के परिप्रेक्ष में काव्यशास्त्रीय चिंतन ने

